सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, ६ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १८८ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



भारताच्या चिरकाल टिकलेल्या गतिशील संस्कृतीचा उगम खेड्यातूनच आहे. 'वसुधैव कुटुम्बकम्'ची भावना त्याच भागात पल्लवित झाली होती. अनंत काळापासून चालत आलेल्या आपल्या देशाच्या अखंड परंपरा देशाला समृद्धशाली बनवणाऱ्या आहेत.

**- भारतरत्न स्व. नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# जागतिक तणावातही जीडीपी सुसाट

## वार्षिक विकास दर ७.७ टक्के; चौथ्या तिमाहीत गाठला उच्चांक

**नवी दिल्ली, ५ जून**

रशिया-युक्रेन युद्ध आणि मध्यपूर्वेतील संघर्षामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली. त्यातच अमेरिका-इस्रायलने इराणविरुद्ध युद्ध पुकारल्याने जागतिक स्तरावर इंधनाची टंचाई निर्माण झाली. पर्यायाने जगातील प्रमुख अर्थव्यवस्था संकटात आल्या. मात्र अशा आव्हानात्मक काळातही भारतीय अर्थव्यवस्थेची घोडदौड कायम असल्याचे केंद्र सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. भारताचा २०२५-२६ या आर्थिक वर्षातील विकास दर (जीडीपी ) ७.७ टक्के, तर चौथ्या तिमाहीत जीडीपीची वाढ ७.८ टक्के इतकी नोंदवण्यात



आली आहे.

केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने २०२५-२६ या आर्थिक वर्षातील आणि जानेवारी ते मार्च या चौथ्या तिमाहीतील जीडीपीचा दर जाहीर केला. त्यानुसार मागील आर्थिक वर्षातील जीडीपी ७.७ टक्के, तर चौथ्या तिमाहीतील जीडीपी ७.८ टक्के इतका नोंदवण्यात आला. जागतिक पतसंस्थांनी नोंदवलेल्या अंदाजापेक्षा वार्षिक जीडीपीचा दर अधिक राहिला आहे. सरकारने शुक्रवारी प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार अर्थव्यवस्थेचे एक मजबूत चित्र समोर आले आहे. मजबूत तिमाही कामगिरीमुळे २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा एकूण आर्थिक विकास दर ७.७ टक्क्यांच्या उच्चांकावर पोहोचला आहे. मागील आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये अंदाजित केलेल्या ७.१ टक्के विकास दरापेक्षा हा आकडा लक्षणीयरीत्या चांगला आहे. ही गती स्पष्टपणे दर्शवते की देशाची आर्थिक उलाढाल मजबूत असून विकासाची घोडदौड वेगात आहे. बदलत्या भूराजकीय परिस्थितीत आणि

> **नवीन आकडेवारी अर्थव्यवस्थेच्या विविध घटकांमध्ये एक संतुलित चित्र सादर करते. आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती हे एक मोठे प्रश्नचिन्ह आहे. तथापि, या अनिश्चितता असूनही, एप्रिल महिन्यात भारतीय निर्यातीने उल्लेखनीय लवचिकता दर्शविली आहे.**
>
> **- व्ही. अनंत नागेश्वरन**
> मुख्य आर्थिक सल्लागार

जागतिक तणावातही भारतीय अर्थव्यवस्था बळकट असल्याचे स्पष्ट झाले आहे. *(वृत्तसंस्था)*

### पायाभूत सुविधांचा विस्तार

**वास्तविक जीडीपी, किंवा स्थिर किमतींवरील जीडीपी, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ३२३.१२ लाख कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. हा आकडा आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीच्या २९९.८९ लाख कोटींच्या पहिल्या सुधारित अंदाजापेक्षा (एफआरई) लक्षणीय वाढ दर्शवतो. स्थिर किमतींवरील ही मजबुती दर्शवते की अर्थव्यवस्थेच्या पायाभूत सुविधांचा विस्तार होत आहे.**



### देशाची अर्थव्यवस्था सुसाट

**अर्थव्यवस्थेने नाममात्र जीडीपीच्या (चालू किमतींवरील) आघाडीवरही आपली गती कायम ठेवली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जीडीपी ३४६.३६ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, जो आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ३१८.०७ लाख कोटी रुपये होता. जीडीपीची ही आकडेवारी पुष्टी करते की भारतीय अर्थव्यवस्था योग्य दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. ७.७ टक्के वार्षिक विकास दर भारतीय बाजारांसाठीच नव्हे, तर देशाच्या सातत्याने सुधारत असलेल्या आर्थिक दृष्टिकोनालाही बळकटी देत आहे.**

# व्याजदर स्थिर; महागाईवर करडी नजर

## आव्हाने संधीत बदलणार : संजय मल्होत्रा

**नवी दिल्ली, ५ जून**

जागतिक बाजारात खनिज तेलाच्या किमती भडकल्याने देशांतर्गत बाजारात पेट्रोल, डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महागाई उच्चांक गाठण्याची शक्यता आहे. सध्या स्थितीत भारताची अर्थव्यवस्था अत्यंत मजबूत असून, सध्याच्या आव्हानांचे संधींमध्ये



रूपांतर करण्याला प्राधान्य आहे. महागाईचा दर वाढण्याची परिस्थिती असली तरी व्याजदर स्थिर ठेवण्याचा निर्णय पतधोरण बैठकीत घेण्यात आल्याची माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेचे (आरबीआय) गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शुक्रवारी पत्रपरिषदेत दिली.

मल्होत्रा यांनी स्पष्ट केले की, भारताची आर्थिक परिस्थिती अत्यंत मजबूत असून, आरबीआयने व्याजदरात कोणताही बदल न करण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०२६-२०२७ साठी किरकोळ महागाईचा अंदाज ०.५० टक्क्यांनी वाढवला असून हा आकडा ५.१ टक्क्यांवर आणला आहे. तथापि आरबीआयचे ४ टक्क्यांचे महागाईचे लक्ष्य कायम ठेवले आहे. महागाईचा दर कायम राहिल्यास आगामी काळात व्याजदरात वाढ केल्याशिवाय पर्याय राहणार नाही. *(वृत्तसंस्था)*

### अल निनोची भीती प्रमुख चिंता

**गव्हर्नर मल्होत्रा यांच्या मते, पुरवठ्यातील धक्क्यांचा दीर्घकालीन परिणाम आणि त्याचा किमतींवर होणारा थेट परिणाम ही सर्वात मोठी चिंता आहे. याव्यतिरिक्त, संभाव्य कमकुवत मान्सून आणि एल निनो परिस्थितीमुळे महागाईवर होणाऱ्या संभाव्य परिणामाबद्दलही केंद्रीय बँक सावध असल्याचे त्यांनी सांगितले. मान्सूनची प्रगती आणि खनिज तेलाच्या दरावर आरबीआयचे पुढील पाऊल अवलंबून असल्याचे ते म्हणाले.**

### महत्त्वाचे

#### आरबीआयच्या पतधोरणानंतर सेन्सेक्स घसरला

**मुंबई** : शेअर बाजारातील शुक्रवारचा व्यवहार कमालीच्या चढ-उतारानंतर किरकोळ घसरणीसह बंद झाला. रिझर्व्ह बँकेने व्यक्त केलेले महागाई आणि आर्थिक वाढीचे अंदाज, तसेच विदेशी भांडवल आकर्षित करण्यासाठी आणि रुपयाला बळकटी देण्यासाठी जाहीर केलेल्या उपाययोजनांचा गुंतवणूकदारांनी प्रामुख्याने विचार केला. रिझर्व्ह बँकेने अपेक्षेप्रमाणेच आपला मुख्य रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवला. मात्र, पश्चिम आशियातील प्रदीर्घ संघर्ष, ऊर्जेच्या वाढत्या किमती आणि जागतिक पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे आर्थिक वाढ आणि महागाईसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे, असे बँकेने स्पष्ट केले.

#### अंदमानच्या सागरात नैसर्गिक वायूचा साठा

**नवी दिल्ली** : ऑइल इंडिया लिमिटेडने अंदमान बेटांजवळ ३५५ मीटर खोलीवर नैसर्गिक वायूचा साठा शोधला आहे. समुद्र मंथन मिशनअंतर्गत लागलेला शोध भारताच्या ऊर्जेची मागणी पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचा असल्याचे केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सांगितले. देशातील अग्रगण्य सरकारी तेल उत्खनन कंपनी ऑइल इंडिया लिमिटेडने अंदमान समुद्रात खोल समुद्रात नैसर्गिक वायूचा शोध लावून एक मोठे यश मिळवले आहे. केंद्रीय मंत्री पुरी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, अंदमान बेटांच्या पूर्व किनाऱ्यापासून १५ किलोमीटर अंतरावर आणि ३५५ मीटर खोल पाण्यात असलेल्या श्री विजयपुरम-३ नावाच्या अन्वेषण विहिरीमध्ये नैसर्गिक वायूचा शोध लागला आहे. ऑइल इंडियाने इओसीन थरात १९०० मीटरपेक्षा जास्त खोलीवर प्राथमिक उत्पादन चाचण्या घेतल्या, तिथे नैसर्गिक वायूची पुष्टी झाली. सध्या, कंपनी वायूची रचना आणि ऊर्जा मूल्याचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी वायूचे नमुने गोळा करत आहे. अतिखोल पाण्यात मोठ्या संख्येने विहिरी खोदून भारताच्या सागरी खोऱ्यांमधील हायड्रोकार्बन साठ्यांचा पूर्णपणे वापर करणे, हे समुद्र मंथन मिशन मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

# 'नीट' परीक्षेत गैरप्रकार नकोच!

**मुंबई** - देशात सातत्याने गाजत असलेल्या 'नीट' परीक्षेच्या पृष्ठभूमीवर, महाराष्ट्रात आगामी परीक्षा अत्यंत पारदर्शक, सुरळीत आणि तणावरहित वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी हाय- अलर्टवर राहावे, असे कडक निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. परीक्षेत कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा देत मुख्यमंत्र्यांनी सायबर सुरक्षा आणि कडक देखरेखीवर भर दिला आहे. 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी आयोजित एका उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. गेल्या काही काळातील नीट परीक्षांच्या घोटाळ्यांचे धागेदोरे महाराष्ट्रातील पुणे आणि लातूर येथे प्रकर्षाने जोडले गेले होते. वैद्यकीय शिक्षणाचे हब असलेल्या लातूर आणि पुण्यात रॅकेट सक्रिय असल्याचे समोर आल्यानंतर विरोधकांनी तत्कालीन सरकारला पुरते धारेवर धरले होते. याच पृष्ठभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बैठकीत पुणे आणि लातूर येथील परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात यावे, असे थेट आदेश दिले आहेत. या दोन्ही जिल्ह्यांत परीक्षा केंद्रांवर उमेदवारांची ओळख पडताळणी आणि तपासणी अत्यंत काटेकोरपणे केली जाणार आहे.



याशिवाय, गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवरील सीसीटीव्ही यंत्रणा २४ तास कार्यरत ठेवून त्याचे थेट नियंत्रण केले जाईल. कोणताही गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलिस यंत्रणा आणि शिक्षण विभागाला सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# विजय तेंडुलकर हे जेम्स लेनचे प्रतिरुप : बलकवडे

**पुणे, ५ जून**

पेशवे माधवराव यांच्या नेतृत्वाखाली नाना फडणीस आणि महादजी शिंदे यांनी दक्षिण भारतातील मोहिमांमधून माळवा, उत्तर भारतात मराठ्यांचे वर्चस्व पुन्हा प्रस्थापित केले. विजय तेंडुलकरांनी मात्र नाना फडणीसांना खलनायक केले. खरंतर विजय तेंडुलकर हे जेम्स लेनचे प्रतिरूप आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक तथा भारत इतिहास संशोधक मंडळाचे सचिव पांडुरंग बलकवडे यांनी केले.

ज्येष्ठ इतिहास संशोधक ग. ह. खरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त हिंदुस्थानातून इंग्रजी सत्तेच्या समूळ उच्चाटनाचे नाना फडणीस आणि महादजी शिंदे यांनी केलेले प्रयत्न या विशेष व्याख्यानात बलकवडे बोलत होते. ते म्हणाले की, महादजी शिंदे, तुकोजी होळकर आणि नाना फडणीस यांनी एकेक प्रदेश काबीज करत इंग्रजांची संपूर्ण देशावर सत्ता स्थापण्याची स्वप्न कितीतरी वर्षे धुळीस मिळवली होती. घाशीराम कोतवालासारखे नाटक काढून एका नायकाच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याचा अधिकार विजय तेंडुलकरांना कोणी दिला होता, असा प्रश्नही बलकवडे यांनी यावेळी विचारला.

# भारत-अमेरिका कराराची लवकरच अंमलबजावणी

**विशाखापट्टणम, ५ जून**

भारत आणि अमेरिकेदरम्यान द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्याची पुढील महिन्याच्या मध्यापर्यंत अंमलबजावणी होऊ शकते, असे केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी शुक्रवारी सांगितले.



कराराला लवकरच अंतिम स्वरूप दिले जाईल, सध्या त्यातील अपूर्ण मुद्द्यांना पूर्णत्व देण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू आहेत, असे गोयल म्हणाले. व्यापार कराराचे केवळ एक टक्का काम बाकी असून लवकरच उर्वरित मुद्दे निकाली काढले जातील. व्यापार कराराच्या वाटाघाटीसाठी अमेरिकेचे शिष्टमंडळ भारतात आले होते. २ ते ४ जूनदरम्यान या चर्चा पार पडल्या. मीदेखील अमेरिकेच्या शिष्टमंडळाला गुरुवारी भेटलो. अमेरिकेचे उच्चस्तरीय पथक या महिन्याच्या अखेरीस भारत दौऱ्यावर येणार असल्याचेही गोयल यांनी स्पष्ट केले.




# मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे शैक्षणिक सवलती लागू होणार

### राज्य शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

### उच्च व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांना आर्थिक आधार

**मुंबई, ५ जून**

मराठा समाजाच्या शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गाला उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक सवलती आणि योजनांचा लाभ आता मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे उच्च व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.

रोजगारक्षम कौशल्यांना चालना देण्यासाठी मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना देखील मराठा समाजातील युवकांसाठी सुरू करण्यात येणार आहे. याशिवाय विविध शैक्षणिक बाबींशी संबंधित शुल्काची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येणार असून, त्यामुळे विद्यार्थ्यांवरील आर्थिक भार कमी होण्यास मदत होईल. ओबीसी विद्यार्थ्यांना ज्या सर्व मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक सवलती मिळतात, त्या सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही पात्रता प्रदान करण्यात आली आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (सीएपी) पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयांमधील रिक्त राहिलेल्या जागांवर किंवा प्रवेश नियंत्रण समितीच्या मान्यतेने संस्थास्तरावर प्रवेश घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांनाही सर्व शैक्षणिक सवलती लागू राहतील. *(तभा वृत्तसेवा)*

#### मराठा समाजाला लागू होणाऱ्या आठ सवलती

1. दहावीनंतरच्या शिक्षणासाठी शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ
2. इयत्ता ९ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती
3. मराठा युवकांसाठी मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना
4. विविध शैक्षणिक बाबींशी संबंधित शुल्काची प्रतिपूर्ती शासनामार्फत
5. -परराज्यातील अनुदानित व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या मराठा विद्यार्थ्यांनाही योजनांचा लाभ
6. ओबीसी विद्यार्थ्यांना लागू असलेल्या सर्व मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मराठा विद्यार्थ्यांनाही पात्रता
7. सीएपी प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या किंवा संस्थास्तरावरील जागांवर प्रवेश घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांनाही सर्व शैक्षणिक सवलती
8. भविष्यात ओबीसी प्रवर्गासाठी लागू होणाऱ्या नव्या शैक्षणिक सवलती, योजना आणि सुविधा मराठा समाजालाही आपोआप लागू होतील.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### हिरेमठ व वालावलकर यांचा मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार

**सोलापूर, दि. ५ जून-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळातील लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ यांची महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रभारी प्रमुख लिपिकपदी नियुक्ती झाल्याने तसेच कनिष्ठ श्रेणी लिपिक महेश वालावकर यांची प्रभारी लेखापालपदी म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांचा महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक मनीष बांगर, संतोष बुलबुले, सुरेश कासार, रजनी राऊळ, तरंगिणी कोंडा, सारंग अंजीखाने, अबरार डोंगरी, मारुती भोसले, अविनाश शिंदे, अमोल गायकवाड, रियाज आतार, लक्ष्मीण पुजारी, नागेश जगदाळे, भालचंद्र साखरे, नाशिर खान, सचिन साखरे आदी उपस्थित होते.



### रामेश्वर बुक बँकच्यावतीने ५० विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**सोलापूर, दि. ५ जून-**

कै. संगप्पा याळगी प्रतिष्ठान संचलित रामेश्वर बुक बँक वतीने महात्मा बसवेश्वर सामाजिक संघटनेचे सहकार्यने अक्कलकोट रोड कामगार वस्ती, समाधान नगर मध्ये यंदाच्या वर्षी प्रथमच बाळव्वा मुगसाने यांच्या हस्ते व संस्थापक मल्लिनाथ याळगी यांच्या उपस्थित पन्नास विद्यार्थी, विद्यार्थिनीना वह्या वाटप करण्यात आले. याचा खर्च एक दानशुर व्यक्तीने केला आहे त्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर हे सामाजिक कार्य केले. यामध्ये मोलाचे सहकार्य पुनम पाटील, संजय पाटील यांचे लाभले. कार्यक्रम यशस्वी साठी भिमाशंकर मुगसाने, कल्लप्पा शिंपी, नागेश याळगी, राम मुगसाने, राजेद्र भागानगरे, नवनाथ माळी संतोष याळगी, बडुरे, धानप्पा याळगी आदि परिश्रम घेतले.

### पत्नीसोबत भांडण करणाऱ्या पतीला मारहाण; तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ५ जून-**



पत्नी सोबत भांडण करणाऱ्या पतीला लोखंडी सळईने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी तिघा जणांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अबुबकर महिबुब शेख, सर्फराज महेबुब शेख आणि महेबुब शेख अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत शोएब गुलाम मोहियुद्दिन मोमीन (रा.४०२,कोतकुंडे रेसीडेन्सी, साखर पेठ, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली.यातील फिर्यादीचे १ जून रोजी सायंकाळच्या सुमारास त्यांच्या पत्नीसोबत घरगुती वाद झाला होता. त्याकारणावरुन वरील आरोपी लोखंडी सळई घेवून फिर्यादीच्या घरी आले. पत्नीस तेरे को क्या हुवा असे म्हणाले. त्यावेळी फिर्यादी त्यांना समजावून सांगत असताना वरील आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करुन लोखंडी सळई व चावीने डोक्यावर व तोंडावर मारून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार सय्यद हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीवरील दोन मित्रांच्या मृत्यूस कारणीभूत, फरार टेम्पो चालकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. ५ जून-**

भरधाव टेम्पोच्या धडकेत दुचाकीवरील दोन मित्रांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अपघात करून फरार झालेल्या अज्ञात टेम्पो चालका विरूद्ध विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी ईस्माईल मौला ढवळगी (रा.सलगरवाडी) यांनी फिर्याद दिली.हा अपघात हत्तुर बायपास ब्रिजजवळ २ जून रोजी पहाटे ३ वाजता घडला होता. यातील फिर्यादीचा भाऊ रहेमान ढवळगी व त्याचा मित्र राजू शेख (दोघे रा.सलगरवाडी, डोणगाव रोड सोलापूर) हे दोघे मोटारसायकलवरून घरी येत असताना हत्तुर बायपासजवळ एम.एच.१३ ई.पी. २३४० या क्रमांकाच्या टेम्पोने जोरात धडक दिली. यात रहेमान ढवळगी हा जागीच ठार झाला तर राजू शेख याचा शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. फौजदार पवार हे पुढील तपास करीत आहेत.

### सुशील नगरात घरफोडी; सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह १ लाख ८० हजाराचा ऐवज चोरीस

**सोलापूर, दि. ५ जून-**

बंद घराचा कडी कोयंडा उचकटून अज्ञात चोरट्याने कपाटातील दागिने व रोख रक्कमे सह भिंतीवरील सीसीटीव्ही कॅमेरा मिळून १ लाख ८० हजाराचा ऐवज चोरून नेल्याची घटना विजापूर रोड येथील सुशील नगरात ३० मे रोजी उघडकीस आली . दरम्यान याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुरुवार रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत सविता चंद्रकांत कांबळे (रा. सुशिल नगर, विजापूर रोड) यांनी फिर्याद दिली आहे . फिर्यादी या २९ मे रोजी घराला कुलूप लावून कामा निमित्त परगावी गेल्या होत्या .ही संधी साधून अज्ञात चोरट्याने बंद दाराचा कडी कोयंडा उचकटून घरात प्रवेश केला. त्यानंतर आतील कपाट फोडून त्यातील १७ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र, ६ ग्रॅमचे ७ पिस, रोख रक्कमेची चोरी केली. चोरी करून जात असताना त्याची नजर सीसीटीव्ही कॅमेरावर पडली. आपण केलेली चोरी सर्व कॅमेऱ्यात कैद झाली असेल म्हणून चोरट्याने कॅमेरचा तोडून तोही चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे .गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस शिपाई अजय परदेशी करीत आहेत.

# ८४ पेट्रोल पंप, ८ हॉटेल्सवर धाडी : जिल्हा पुरवठा अधिकारी

### जिल्ह्यात मुबलक इंधन; नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

पेट्रोल, डिझेल व एलपीजीचा राज्यातील अनेक जिल्ह्यात नुसता गोंधळ सुरू असताना सोलापूर जिल्ह्यात मात्र सर्व कंपन्यांकडून पेट्रोल, डिझेल व एलपीजीचा पुरवठा सुरळीतपणे चालू ठेवल्याने सर्वसामान्य नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, काही भागात पेट्रोल, डिझेल, गॅस तुटवडा जाणवत असल्याच्या तक्रारी आल्यास त्या ठिकाणी जिल्ह्याचा पुरवठा विभाग तातडीने जावून पाहणी करतो आणि प्राब्लेब सॉल करत आहे. आजतागायत ८४ पेट्रोल पंपांवर अन् ८ अवैध गॅस वापर करणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांवर धाडी टाकल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली. यातील दोघांवर गुन्हाही दाखल केला आहे. दरम्यान, जिल्ह्यातील अवैध पेट्रोल-डिझेल विक्रेत्यांकडूनच



पेट्रोल-डिझेल टंचाईच्या अफवा उठत असल्याची खंतही सरडे यांनी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी आणि पुरवठा विभागाचे अधिकारी जिल्ह्यातील पेट्रोल एजन्सीवाले आणि गॅस कंपन्यांच्या वारंवार बैठका घेवून आढावा घेतात आणि त्यांना वारंवार सुचना करीत असल्यानेच सोलापूर जिल्ह्यात सध्यातरी टंचाईच्या तीव्र झळा लागल्याचे दिसून येत नाही. जिल्ह्यात पेट्रोल व डिझेल मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने नागरिकांनी साठा करू नये किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये असेही आवाहन जिल्हा प्रशासनाकडून वारंवार करण्यात येत आहे. कंपन्यांकडून जिल्ह्यासाठीचा बफर स्टॉक व नियमित पुरवठाही सुरळीत आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी पेट्रोल डिझेल पुरवठ्याच्या अनुषंगाने काळजी करू नये जिल्ह्यात मुबलक प्रमाणात इंधन साठा उपलब्ध असून, कंपन्यांना दररोज नियमित मागणीप्रमाणे पेट्रोल डिझेल उपलब्ध केले जात आहे. विशेषतः जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील नागरिकांनी पेट्रोल, डिझेलचा अतिरिक्त साठा करून ठेवू नये, असेही आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे.

इंधन कंपन्यांकडून किमान सात दिवसाचा पेट्रोल व डिझेलचा बफर स्टॉक ठेवण्यात आल्याचे पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले. यामुळे सध्यातरी विविध पंपांवर पेट्रोल, डिझेलच्या रांगा दिसून येत नाहीत; हेच जिल्हा प्रशासनाचे मोठे यश आहे. जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलच्या अनाधिकृत साठवणुकीसह काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हा पुरवठा विभाग सक्षम असल्याचेही सरडे यांनी सांगितले. पेट्रोल पंपांवर डिझेल खरेदीसाठी रांगा लागल्याने काळाबाजार होण्याची शक्यता लक्षात घेऊन तालुका निहाय संयुक्त भरारी पथक स्थापन करण्यात आले आहेत.

संयुक्त पथकात तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी समन्वयक म्हणून, पोलिस निरीक्षक कायदा व सुव्यवस्था प्रमुख म्हणून, तर निरीक्षक अधिकारी/नायब तहसीलदार तांत्रिक तपासणी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. याशिवाय मंडळ अधिकारी, पुरवठा निरीक्षक/सहा. महसूल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्यातील इंधन टंचाईच्या झळा अद्याप तरी सोलापूरकरांना लागल्या नसल्याचा दावाही सरडे यांनी शेवटी केला.

## वादळी वाऱ्यामुळे कोंढार भागातील फळबागांचे प्रचंड मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ५ जून -**



माढा तालुक्यात शुक्रवारी दि. ५ जून रोजी सायंकाळी साडेपाच ते साडेसहा वाजण्याच्या दरम्यान आलेल्या जोरदार वादळी वाऱ्याने गार अकोले, टाकळी, आलेगाव तसेच परिसरात मोठ्या प्रमाणात शेती व फळबागांचे नुकसान झाले. केळी व डाळिंब बागांना मोठा फटका बसला असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी केळीची झाडे जमीनदोस्त झाली, तर डाळिंब बागांमधील फळे व फांद्या तुटून पडल्या. प्राथमिक अंदाजानुसार गार अकोले परिसरातील सुमारे २०० ते ३०० एकरवरील केळी व डाळिंब बागांचे नुकसान झाले आहे.

जितेंद्र गायकवाड ३० एकर केळी, हरिदास वाळेकर ४ एकर, तुकाराम पवार ३ एकर, धनंजय वाळेकर ४ एकर, दीपक केचे ३ एकर, गणपत देवकते २ एकर, शिवाजी देवकते ३ एकर, युवराज केचे ३ एकर, प्रकाश केचे १० एकर, सागर केचे ३ एकर असे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

अनेक शेतकऱ्यांच्या फळबागा व पिकांचेही नुकसान झाले असून पंचनामे झाल्यानंतर नुकसानाची व्याप्ती आणखी स्पष्ट होणार आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी संजय पाटील भिमानगरकर यांनी केली आहे

## खासगी रुग्णालयाची गरज पडू नये; प्राथमिक आरोग्य सेवा सक्षम करा : सभापती चेतनसिंह केदार सावंत

**आषाढी वारीपूर्व आरोग्य यंत्रणा सतर्क; रिक्त पदे, औषधसाठा आणि लसीकरणावर आरोग्य समितीचा भर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून -**

ग्रामीण भागातील नागरिकांना उपचारासाठी खासगी रुग्णालयांकडे धाव घ्यावी लागू नये, यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि शासकीय आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे मत जिल्हा परिषदेच्या आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार यांनी व्यक्त केले. या बैठकीस समितीचे सदस्य सोनाली कडते, संगीता दुधाळ, संदीप टेळे, मीनाक्षी रोंगे, शोभा खटकाळे, नागनाथ भोसले, सविता कोकाटे आणि चंद्रकांत भालके उपस्थित होते. तसेच डॉ. शेगर, डॉ. घाडगे, डॉ. जाधव, डॉ. अभिवंत, डॉ. खांडेकर, सर्व तालुका आरोग्य अधिकारी आणि विभागीय अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य समितीच्या सभेत त्यांनी आरोग्य विभागाला लोकाभिमुख सेवा देण्याच्या सूचना करत आषाढी वारीच्या तयारीचा आढावा घेतला.जिल्हा परिषदेत



आरोग्य सेवा अधिक सक्षम करून सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि मोफत उपचार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्वपूर्ण आहे. विशेषतः आषाढी वारीसारख्या मोठ्या धार्मिक सोहळ्यापूर्वी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्याचा स्पष्ट संदेश या बैठकीतून देण्यात आला.

**- चेतनसिंह केदार सावंत**

झालेल्या या बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी समिती सदस्यांचे स्वागत करून मागील सभेचे इतिवृत्त सादर केले. त्यानंतर जिल्ह्यातील विविध आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीवर चर्चा करण्यात आली. सभापती चेतनसिंह केदार यांनी माता-बाल संगोपन, नियमित लसीकरण, क्षयरोग निर्मूलन आणि कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या.

ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी यांनी अधिक जबाबदारीने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

आगामी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पालखी मार्गावरील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि आरोग्य पथकांची तयारी वेळेत पूर्ण करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. वारकऱ्यांना तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आवश्यक औषधसाठा, वैद्यकीय उपकरणे आणि मनुष्यबळ उपलब्ध ठेवण्यावर भर देण्यात आला.

विशेष म्हणजे, पालखी मार्गावरील कोणत्याही आरोग्य संस्थेत कर्मचारी पदे रिक्त राहू नयेत, अशी स्पष्ट सूचना सभापतींनी दिली. वारी काळात आपत्कालीन वैद्यकीय सेवा, रुग्णवाहिका व्यवस्था, उष्माघात आणि संसर्गजन्य आजारांवरील नियंत्रणासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्याचे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

# राज्यातील एसटी स्थानके व बसेस्‌ची दर चार तासांनी स्वच्छता होणार

### पर्यावरण दिनानिमित्त परिवहन मंत्री सरनाईक यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून -**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यव्यापी अत्याधुनिक स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ आज मुंबईतील परळ बसस्थानक येथे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला.

या उपक्रमामुळे राज्यातील बसस्थानके, एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे अधिक स्वच्छ, सुंदर व प्रवासी-अनुकूल बनविण्याचा महामंडळाचा संकल्प असल्याचे सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

परळ बसस्थानक येथे आयोजित कार्यक्रमात स्वच्छता मोहिमेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक यंत्रसामग्रीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत राज्यभरातील प्रमुख बसस्थानके आणि त्यांचा परिसर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अत्याधुनिक स्वच्छता उपकरणांच्या सहाय्याने नियमितपणे स्वच्छ करण्यात येणार आहे. तसेच एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे यांची दर चार तासांनी स्वच्छता करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.



#### ही मोहीम सातत्याने चालू राहील

सरनाईक पुढे म्हणाले की, स्वच्छता ही एकदिवसीय मोहीम नसून सातत्याने राबविण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे या मोहिमेच्या अंमलबजावणीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत नियमित देखरेख ठेवली जाणार असून स्वच्छतेच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रत्येक बसस्थानकावरील स्वच्छता व्यवस्थेचे नियोजनबद्ध निरीक्षण करण्यात येईल तसेच प्रवाशांकडून मिळणाऱ्या सूचना आणि अभिप्रायांनाही प्राधान्य दिले जाईल.

#### विस्तारित चार्जिंग केंद्राचे भूमिपूजन

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत एसटी महामंडळाने आपल्या सर्व २५१ आगारांमध्ये ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार परळ आगारात विस्तारित नऊ चार्जिंग केंद्रांच्या उभारणीचे भूमिपूजन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

#### प्लास्टिक पिशव्या व बाटल्यांचे पुनर्वापरासाठी संकलन

पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्रत्येक बसस्थानकावर स्वच्छता मोहिमेदरम्यान आढळणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या व पिशव्या संकलित करून त्यांचे पुनर्वापर (रिसायकलिंग) करण्यासाठी पाठविण्यात येणार आहेत. या प्रक्रियेतून विविध टिकाऊ व उपयुक्त उत्पादने तयार करण्यात येतील, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

## आझाद मैदानावर ८ जूनपासून बेमुदत धरणे आंदोलन

### शारीरिक शिक्षण संचालक आणि ग्रंथपाल पदांच्या १०० टक्के भरतीसाठी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून -**

महाराष्ट्र राज्य वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण संचालक महासंघ व महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल संघटना यांच्या वतीने राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांतील २०१७ नंतरच्या प्राध्यापक संवर्गातील ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक यांची १०० टक्के पदे भरती केली जावीत, या मागणीसाठी सोमवार, दि. ८ जून पासून आझाद मैदान (मंत्रालय), मुंबई येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महासंघाच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे ही घोषणा करण्यात आली आहे.

शारीरिक शिक्षण संचालक आणि ग्रंथपाल ही महाविद्यालय स्तरावरील प्राचार्य पदाच्या खालोखाल अत्यंत महत्त्वाची पदे आहेत. या पदांना तासिका तत्वाचे धोरणही मागील काही वर्षांत लागू करण्यात आले नव्हते. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल यांच्यामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे.

शासनाने ११ फेब्रुवारी २०२६ रोजी ५०१२ सहाय्यक प्राध्यापकांच्या पदभरतीचा शासन निर्णय निर्गमित केला होता; मात्र या शासन निर्णयामध्ये सदर दोन्ही पदांचा समावेश करण्यात आला नसल्याने शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल यांच्या पदरी पुन्हा निराशा पडली आहे.

मुंबई येथे होणाऱ्या या बेमुदत धरणे आंदोलनासाठी महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण संचालक महासंघाचे संस्थापक संदीप मनोरे, संघटनेचे अध्यक्ष डॉ. गणेश सिंहासने, राज्य सचिव प्रा. तात्याप्पा शेंडगे व सर्व जिल्हा पदाधिकारी यांनी केले आहे.

# शक्तीपीठ महामार्ग मोजणी दरम्यान 'निमगाव'मध्ये ड्रामा

### एकीकडे विरोध तर दुसरीकडे समर्थन

**तभा वृत्तसेवा**
**अकलुज। पिलीव। वेळापूर, दि. ५ जून-**

शक्तीपीठ महामार्गाच्या जमीन मोजणीसाठी आलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना आज निमगाव (ता. माळशिरस) येथे शेतकऱ्यांच्या विरोधाचा सामना करावा लागला. मोठ्या पोलिस फौजफाट्यासह आलेल्या प्रशासनाने गावात वेगवेगळ्या ठिकाणी मोजणी करण्याचा केली. काही ठिकाणची मोजणी झाली तर काही ठिकाणची शेतकऱ्यांच्या विरोधामुळे थांबवली आहे मात्र, काही ठिकाणी शेतकऱ्यांनी थेट अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा,



प्रयत्न केल्याने परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता.

शुक्रवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास मोजणी अधिकारी आणि पोलिसांचा मोठा ताफा निमगावमध्ये दाखल झाला. प्रांताधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार आणि वेळापूर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक कांबळे, नातेपुतेचे सपोनी विशाल वायकर हे सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. मोजणी थांबवण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. यावेळी शेतकरी नेते आणि शेतकऱ्यांनी महामार्ग आणि भूसंपादनाबाबत प्रांताधिकारी व तहसीलदार यांना विविध कायदेशीर व तांत्रिक प्रश्न विचारले. प्रशासनाने मोजणी सुरू करून बहुतांश ठिकाणचे मोजणी पूर्ण केली असल्याची माहिती मिळत आहे

निमगावात ग्राउंड कंट्रोल पॉईंट घेत असताना काही लोकांनी विरोध केला पण या अगोदर याच गावातील जवळपास ८० टक्के शेतकऱ्यांनी समर्थनाचे निवेदन प्रांत अधिकाऱ्यांना दिले आहे. यामुळे निमगावात या महामार्गास विरोध आहे असे चित्र जाणीवपूर्वक निर्माण केले जात आहे, परंतु वस्तुस्थिती शक्तिपीठ महामार्ग समर्थनाची आहे

**- किरण पाटील, ग्रामपंचायत सदस्य निमगाव**

प्रांताधिकारी विजया पांगारकर यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करत तडजोड करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी शेतकऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन करणारे एक पत्रही दिले. निमगावमध्ये ग्राउंड कंट्रोल पॉईंटच्यावेळी काही शेतकरी विरोध करीत होते, तरी काही शेतकऱ्यांनी या अगोदरच शक्तीपीठ महामार्गाच्या समर्थनाचे पत्र प्रांताधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले आहे. यामुळे काही ठिकाणी विरोध होत आहे तर याच गावात दुसरीकडे शेतकऱ्यांचे शक्तिपीठ महामार्गाला समर्थनही मिळत आहे

# भारताने आमचा फायदा घेतला

● अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे विधान ● पुतिन यांनी भारताला संबोधले विश्वासू भागीदार




◆ **वॉशिंग्टन/मॉस्को, ५ जून**

भारतासोबतच्या संबंधांवरून रशिया आणि अमेरिका यांच्यातील शाब्दिक चकमक तीव्र झाली आहे. एकीकडे, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाची उघडपणे प्रशंसा केली आहे. दुसरीकडे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर जास्त शुल्क लादण्याचा आणि अमेरिकेचा फायदा घेण्याचा आरोप केला आहे.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी सेंट पीटर्सबर्ग येथे आंतरराष्ट्रीय माध्यमांशी बोलताना सांगितले की, रशियाला भारतासोबतचे आपले दीर्घकाळचे आणि विश्वासपूर्ण संबंध अधिक दृढ करायचे आहेत. ते म्हणाले, भारत जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि वेगाने विकसित होत आहे. रशियापासून दूर राहण्यासाठी पाश्चात्य देश आणि अमेरिकेने भारतावर टाकलेला दबाव निष्प्रभ ठरला आहे.

पुतीन पुढे म्हणाले, जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतावर दबाव आणणे हे आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी हानिकारक आहे. येत्या काही वर्षांत रशिया आणि भारत यांच्यातील व्यापार १०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकतो. भारताची जलद आर्थिक वाढ हा योगायोग नसून मोदी सरकारच्या कठोर परिश्रमाचा परिणाम आहे. भारत आपल्या राष्ट्रीय हितांना प्राधान्य देतो आणि हीच त्याची सर्वात मोठी ताकद आहे. भारताचे अमेरिकेसोबतचे चांगले संबंध असण्याबद्दल रशियाला कोणतीही अडचण नाही. रशिया प्रत्येक क्षेत्रात भारतासोबतचे संबंध वाढवत राहील. पाश्चात्य देश भारताला रशियन तेलाची खरेदी कमी करण्याचा सातत्याने आग्रह करत असताना पुतिन यांचे हे विधान महत्त्वपूर्ण मानले जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

### अमेरिका-भारत यांच्यात व्यापार करार लवकरच



**»» अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासोबतच्या व्यापारी संबंधांबाबत एक कठोर विधान केले. ते म्हणाले, भारताने अनेक वर्षांपासून अमेरिकेच्या धोरणांचा फायदा घेतला आहे. त्यांनी अमेरिकन मालावर जादा शुल्क लादले आहे. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक चांगला मित्र संबोधत ट्रम्प म्हणाले, दोन्ही नेत्यांमधील चांगल्या संबंधांमुळे अमेरिका आणि भारत यांच्यात लवकरच व्यापार करार होऊ शकतो. परिस्थिती बदलत आहे.** ■

### शुल्क-व्यापार करारांवरून वाढला तणाव?



**»» अमेरिकेने अलीकडेच भारतासह ५४ देशांवर १२.५ टक्के अतिरिक्त शुल्क जाहीर केले आहे. अमेरिकेचा आरोप आहे की, या देशांमधून आयात होणाऱ्या काही वस्तू सक्तीच्या मजुरीचा वापर करून तयार केल्या जातात. हार्ले-डेव्हिडसन मोटरसायकलचे उदाहरण देत ट्रम्प म्हणाले, अमेरिकन बाईक कंपन्यांना पूर्वी भारतात २०० टक्क्यांपर्यंत शुल्काचा सामना करावा लागत होता. यामुळे कंपनीला भारतात आपला कारखाना उभारावा लागला. दोन्ही देश द्विपक्षीय व्यापार वाढवण्याच्या आणि शुल्क कमी करण्याच्या मार्गांवर चर्चा करत आहेत.** ■



आपला सर्वात जवळचा मित्र म्हणजे पर्यावरण. आजूबाजूची झाडे,वेली, आकाश, जमीन,पाणी, हवा म्हणजे पर्यावरण आणि पशु,पक्षी मानव हे या पर्यावरणाचे घटक. आजच्या घडीला पर्यावरणाची होणारी हानी चिंताजनक आहे. अशाप्रसंगी 'झाडे लावा,पर्यावरण वाचवा' हा मोलाचा संदेश मणिपूरमधील सेनापती जिल्ह्यातील या छोट्या शाळकरी मुलांनी पर्यावरणदिनी दिला आहे



# हॉटेल मालकाची बांगलादेशींना मदत

● ओळखपत्रे मिळवून देण्यास सहकार्य केल्याचे उघड
● हॉटेल आग प्रकरणाला वेगळे वळण

◆ **नवी दिल्ली, ५ जून**

मालवीय नगरमधील हॉटेल आग प्रकरणाच्या चौकशीदरम्यान आमखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हॉटेल मालक लवकेश बजाज हा बांगलादेशी लोकांना केवळ बेकायदेशीरपणे आश्रयच देत नव्हता, तर त्यांना ओळखपत्रे मिळवून देण्यातही मदत करत होता.

मालवीय नगरमधील हॉटेलमध्ये भीषण आगीत २१ जणांचा बळी गेला. हॉटेलचा मालक लवकेश बजाज याला यापूर्वीही बांगलादेशी नागरिकांना बनावट भारतीय कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीरपणे राहण्यास मदत केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. हॉटेलचा मालक लवकेश बजाज सध्या चार दिवसांच्या पोलिस कोठडीत आहे.



लवकेश बजाज

तपास अधिकारी आगीशी संबंधित परिस्थितीचा तपास करत आहेत आणि हॉटेलच्या व्यवस्थापनाशी संबंधित इतर व्यक्तींचा शोध घेत आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, बनावट मार्गांनी मिळवलेल्या भारतीय ओळखपत्रांचा वापर करून मध्य दिल्लीत बांगलादेशी नागरिकांच्या बेकायदेशीर वास्तव्याबाबत २९ जानेवारी २०२५ रोजी पहाडगंज पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील आरोपींपैकी बजाज एक होता. तपासादरम्यान पोलिसांना असे आढळून आले की, स्वीटी सरकार (उर्फ ब्युटी हवलदार उर्फ जोहरा खातून) आणि तिची मुलगी पुष्पो सरकार (उर्फ पुष्पो हवलदार उर्फ पुष्पो सय्यदा अख्तर) या दोघी, तसेच पुष्पोचा अल्पवयीन मुलगा, पहाडगंजमधील एका घरात राहत होत्या. त्या कथितरीत्या पासपोर्ट आणि आधार कार्डसह बनावट पद्धतीने मिळवलेल्या भारतीय कागदपत्रांच्या आधारे तिथे राहत होत्या.

स्वीटी सरकारने दक्षिण दिल्लीतील छत्तरपूर एन्क्लेव्हमधील पत्त्याचा वापर करून भारतीय पासपोर्ट मिळवला होता. त्या पत्त्याची पडताळणी केली असता, ती मालमत्ता लवकेश बजाजची असल्याचे तपासात समोर आले, असे पोलिसांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

## कृष्णा चक्रवर्ती यांचा महापौरपदाचा राजीनामा

### ममता बॅनर्जींना पुन्हा धक्का

◆ **कोलकाता, ५ जून**

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर अनेक नेत्यांनी तृणमूल काँग्रेस पक्षाचे राजीनामे दिले आहेत.



अशातच फिरहाद हकीम यांनी कोलकाता महापालिकेच्या महापौरपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर शुक्रवारी कृष्णा चक्रवर्ती यांनी बिधाननगर महापालिकेच्या महापौरपदाचा राजीनामा दिल्याने ममता बॅनर्जी यांच्यासाठी मोठा धक्का आहे.

गेल्या दोन दिवसांत दोन मोठ्या महापालिकेच्या महापौरांनी राजीनामे दिल्यामुळे ममता यांच्या अडचणी वाढल्या आहे. चक्रवर्ती यांनी राजीनामा देण्यामागचे कारण वैयक्तिक असल्याचा उल्लेख केला आहे. ममता बॅनर्जी यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे तृणमूलचे नेते फिरहाद हकीम यांनीही कोलकाता महापालिकेच्या महापौरपदाचा बुधवारी राजीनामा राजीनामा दिला. तृणमूल काँग्रेसचे नेते फिरहाद हकीम हे २०१८ पासून या पदावर होते. ◂(वृत्तसंस्था)

# अण्णामलाईंचा भाजपाचा राजीनामा

### नव्या राजकीय प्रवासाला सुरुवात

◆ **चेन्नई, ५ जून**

तामिळनाडू भाजपाच्या सर्वात प्रमुख नेत्यांपैकी एक के. अण्णामलाई यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. अण्णामलाई यांनी राजीनाम्यानंतर शुक्रवारी एका नवीन राजकीय प्रवासाला सुरुवात करण्याची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, ते आजपासून एक नवीन राजकीय चळवळ सुरू करत आहेत. या चळवळीतून पुढे राजकीय पक्ष स्थापन करण्यात येइल. या मोहिमेत मला सर्वांनी पाठिंबा द्यावा, असे आवाहन त्यांनी जनतेला केले.

आपल्या राजकीय प्रवासाची आठवण करून देताना अण्णामलाई यांनी स्पष्ट केले की,



त्यांनी २००९ मध्ये द्रमुकमध्ये इंटर्नशिप केली होती आणि २०२० मध्ये ते भाजपात सामील झाले. आता, ते एका नवीन राजकीय दिशेकडे वाटचाल करत आहेत. त्यांनी खुलासा केला की, २४ ऑगस्ट २०२० रोजी भाजपात सामील होण्यापूर्वी अभिनेते रजनीकांत यांनी त्यांना फोन करून त्यांच्या संभाव्य राजकीय पक्षात सामील होण्याचा प्रस्ताव दिला होता. मात्र, त्यांनी भाजपा राष्ट्रीय संघटनेचे महासचिव बी. एल. संतोष यांना आधीच वचन दिले असल्याने त्यांनी रजनीकांत यांची ऑफर नाकारली आणि भाजपात प्रवेश केला.

अण्णामलाई यांनी सांगितले की, तळागाळातील, स्वच्छ आणि पारदर्शक राजकारण सुरू करणे हे त्यांचे ध्येय आहे. त्यांच्या नवीन राजकीय चळवळीचे नाव 'वी द लीडर' असेल. या चळवळीत सामील होणाऱ्या सदस्यांना ए. पी. जे. अब्दुल कलाम एथिक्स इन पॉलिटिक्स नावाच्या संस्थेमार्फत राजकीय आणि नैतिक नेतृत्वाचे प्रशिक्षण दिले जाईल. जेव्हा त्यांचा राजकीय पक्ष स्थापन होईल, तेव्हा घराणेशाही आणि वंशवादी राजकारणाला प्रभावीपणे आळा घालण्यासाठी कार्यकाळाची मर्यादा लागू केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. ◂(वृत्तसंस्था)

### आपले मत मांडून पक्ष सोडला

**»» आपल्या राजीनाम्याबद्दल बोलताना अण्णामलाई म्हणाले की, मी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली आणि पक्षातील आपली मते व जाणवलेल्या उणिवा स्पष्टपणे मांडल्या. त्यानंतर मी राजीनामा दिला. मी दूरवरून राजीनामा देणाऱ्यांपैकी नाही. मी पक्षाच्या नेतृत्वासमोर आपली मते मांडून सन्मानपूर्वक पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला. पंतप्रधान मोदी यांच्याविषयीचा आदर कायम राहिल, असेही त्यांनी सांगितले.** ■

# भारताच्या जलनीतीने पाकिस्तान हादरला

● चिनाब-बियास जोड बोगदा प्रकल्पावर आक्षेप ● नद्यांचे पाणी वळविण्याला विरोध

◆ **इस्लामाबाद, ५ जून**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील जलविवाद पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.



पाकिस्तानने आरोप केला की, भारत एका बोगद्याद्वारे चिनाब नदीचे पाणी बियास नदीत वळवण्याची योजना आखत आहे आणि हा प्रकार सिंधू जल कराराचे गंभीर उल्लंघन ठरेल. भारताने नदी जोड प्रकल्पातंर्गत चिनाब नदीचे पाणी वळविल्याने पाकिस्तानात दुष्काचे भीषण संकट निर्माण होईल, असा दावा परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते ताहिर अंद्राबी यांनी केला.



प्रसारमाध्यमांतील वृत्त आणि भारत सरकारने जारी केलेल्या निविदा दस्तऐवजांचा हवाला देत, अंद्राबी यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, भारत चिनाब-बियास जोड बोगदा प्रकल्पावर काम करण्याची तयारी करत आहे. चिनाब नदीचे पाणी वळवण्यासाठी भारताने नदीजोड प्रकल्पाचे बांधकाम करणे हे सिंधू जल करार आणि इतर आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन असेल. सिंधू नदी खोऱ्याचा भाग असलेल्या चिनाब नदीचे पाणी एका बोगद्याद्वारे बियास नदीत वळवण्याची भारताची योजना असून, आमचा याला तीव्र विरोध आहे. १९६० चा सिंधू जल करार जागतिक सिंधू नदी आणि तिच्या उपनद्यांच्या पाण्याच्या वितरणाचे आणि वापराचे नियमन करतो. भारताला नद्यांचे पाणी वळविण्याचे अधिकार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### चिनाब-बियास जोडणीवरून वाद काय?

**»» सिंधू जल करारानुसार, पाकिस्तानला चिनाब, झेलम आणि सिंधू या तीन पश्चिम नद्यांचा संपूर्ण पाणीप्रवाह मिळत होता, तर भारताचे सतलज, बियास आणि रावी या तीन पूर्व नद्यांवर पूर्ण हक्क होते. अंद्राबी यांनी दावा केला की, सलाल धरणावर बांधकाम करणे कराराचे उल्लंघन आहे. सलाल जलविद्युत प्रकल्प जम्मू आणि काश्मीर या केंद्रशासित प्रदेशातील रियासी जिल्ह्यात चिनाब नदीवर स्थित आहे. याची क्षमता ६९० मेगावॅट असून हा एक रन-ऑफ-द-रिव्हर प्रकल्प आहे.** ■

# सोलापूर विद्यापीठात पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असून वृक्षलागवड ही केवळ औपचारिकता नसून भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याची जबाबदारी असल्याचे मत यावेळी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी व्यक्त केले. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने वैयक्तिक स्तरावर पुढाकार घेऊन वृक्षलागवड व त्यांचे संगोपन करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली कुलगुरू डॉ. महानवर यांच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात विद्यापीठ परिसरात पाच लाख वृक्षलागवडीचा महत्त्वाकांक्षी संकल्प करण्यात आला असून त्या दिशेने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. या माध्यमातून विद्यापीठ परिसर अधिकाधिक हिरवागार आणि पर्यावरणपूरक बनविण्याचा प्रयत्न सुरू आहे. कार्यक्रमाचे नियोजन पर्यावरणशास्त्र विभागाचे संचालक डॉ. विनायक धुळप यांनी केले.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात वृक्षारोपण

**सोलापूर, दि. ५ जून-**

पर्यावरणाच्या रक्षणासाठी जनजागृती व कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी ०५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याची जाणीव या दिवशी लोकांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध पर्यावरणविषयक उपक्रम राबवून पुढील पर्यावरणीय धोके टाळण्यासाठी आजच्या कृतीचे महत्त्व अधोरेखित करण्यात येते. या संकल्पनेतून जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर व मेरा युवा भारत यांच्या संयुक्त विद्यमाने ५ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा सैनिक कार्यालय, सोलापूर येथील आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण सोहळा संपन्न करण्यात आला.

यावेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (नि), तसेच इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. मेरा युवा भारत, सोलापूर कडून सुभाष धावजी चव्हाण (कार्यालयीन अधीक्षक) व इतर कर्मचारीवृंद यांनीही सहभाग नोंदवला. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण करून हरित चळवळीत योगदान देण्याचा संदेश देत या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाबाबत सकारात्मक जागृती निर्माण झाली.

## कुलरमध्ये पाणी भरताना इलेक्ट्रीक शॉक लागून दोन परप्रांतीय कामगार जागीच ठार

**कुंभारी येथील लक्ष्मी स्पिनिंग मिलमधील दुपारची घटना**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जून-**

चालू कुलरमध्ये पाणी भरत असताना इलेक्ट्रिक शॉक बसल्याने बिहार आणि झारखंड राज्यातील दोन कामगारांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील लक्ष्मी स्पिनर कारखान्यातील कामगार क्वार्टर्स मध्ये आज शुक्रवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास घडली. संतोष भुवनेश्वर पासवान (वय ४0 वर्ष रा.झारखंड ,सध्या रा.कुंभारी लक्ष्मी स्पिनर्स कॉटर्स) आणि सुनील कुमाररंजन यादव (वय ३४ वर्ष रा.जहनाबाद, बिहार) अशी त्या मयत कामगारांची नावे आहेत.

अक्कलकोट रोड कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथील साहेबलाल वस्तीजवळ लक्ष्मी स्पिनर कारखाना असून त्या ठिकाणी कापसापासून धागा बनवण्यात येते. तसेच त्या ठिकाणी कामगारांकरीता राहण्याची सोय करण्यात आली आहे. शुकवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास सुनील यादव (वय ३४) हा कामगार आपल्या कॉटर्स मधील चालू असलेल्या कुलरमध्ये पाणी भरत होता. त्यावेळी अचानक शॉक लागल्याने तो कुलरला चिकटला. त्याच्या ओरडण्याच्या आवाजाने संतोष पासवान हा कामगार त्याला सोडवण्यास गेला.त्यावेळी तो देखील कुलरला चिकटला. हा प्रकार पाहिल्यानंतर खोली मधील इतर दोघा कामगारांनी आरडाओरडा केला असता खोली बाहेरील इतर कामगारांनी विद्युत पुरवठा खंडित केला. तेंव्हा दोघेही फेकले जाऊन बेशुद्ध झाले होते.याची माहिती मिळाल्यानंतर वळसंग पोलीस ठाण्याचे हवालदार हवालदार ए.ए.शेख यांनी घटनास्थळी पोहोचून दोघांही कामगाराला जवळच्याच रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. दरम्यान त्या दोघा मृत कामगाराचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दुपारी दोन वाजता दाखल करण्यात आला.

# एक लाख बेकायदेशीर झुरळांचा साठा जप्त



◆ **वेलिंग्टन, ५ जून**

ऑस्ट्रेलियात पाळण्यास बंदी असलेली १ लाखांहून अधिक जिवंत झुरळे एका व्यक्तीजवळून जप्त करण्यात आली आहेत. अपृष्ठवंशीय प्राण्यांच्या बाबतीत झालेली ही देशातील आतापर्यंतची सर्वात मोठी जप्तीची कारवाई असल्याचे अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले.

न्यू साउथ वेल्स राज्यातील बाथर्स्ट शहरात एका व्यावसायिक पैदासकाराकडून मे महिन्यात हा साठा जप्त करण्यात आला. यात मॅडागास्कर हिसिंग कॉकरोच व डुबिया कॉकरोच यांचा समावेश असून त्यांची किंमत २,००,००० ऑस्ट्रेलियन डॉलर्स (१,४२,००० अमेरिकन डॉलर्स) इतकी आहे. मादागास्कर हिसिंग ही जगातील सर्वात मोठ्या झुरळांच्या प्रजातींपैकी एक असून त्यांची लांबी २ ते ३ इंच (५ ते ८ सेंटीमीटर) असते. विभागाने जारी केलेल्या छायाचित्रांमध्ये माणसाच्या बोटापेक्षाही मोठे, चमकदार तपकिरी रंगाचे हे कीटक दिसत होते.

ही झुरळे ऑस्ट्रेलियात आढळणाऱ्या सामान्य झुरळांपेक्षा (ज्यांची लांबी ०.९ ते १.४ इंच किंवा २.३ ते ३.६ सेमी असते) आकाराने खूप मोठी असतात. उप-उष्णकटिबंधीय हवामानामुळे ऑस्ट्रेलियात झुरळांची मोठ्या प्रमाणावर वाढ होते आणि येथे शेकडो प्रजाती आढळतात. या मोठ्या विदेशी प्रजाती कदाचित सरपटणाऱ्या प्राण्यांसाठी (रेप्टाइल्स) स्वस्त खाद्य म्हणून विकल्या जात असाव्यात; कारण त्यांचा आकार मोठा असल्याने कमी संख्येने कीटक पुरत असत, असे बाथर्स्ट येथील सर्पमित्र स्टेफनी लेसर यांनी ऑस्ट्रेलियन ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनला सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# पाकिस्तानवर विश्वास ठेवणे चूक

### अमेरिका-इराण मध्यस्थीवरून इस्रायलचा संताप

◆ **नवी दिल्ली, ५ जून**

मध्यपूर्वेतील तणाव कमी करण्यासाठी मध्यस्थी करणारा पाकिस्तान अविश्वासार्ह आहे. मध्यस्थीसाठी एका विश्वासार्ह पक्षाची आवश्यकता असते आणि पाकिस्तानमध्ये तो गुण नाही. अमेरिकेने त्यांच्यावर विश्वास ठेवून चूक केली आहे, अशा शब्दात भारतातील इस्रायलचे राजदूत रुवेन अझर यांनी संताप व्यक्त केला.

अझर यांनी म्हटले की, पाकिस्तानमध्ये मध्यस्थी करण्याची क्षमता नाही. जर मध्यस्थी करणारा पक्ष दहशतवादाचा समर्थक असेल तर काय होईल, पाकिस्तान नेहमीच दहशतवाद आणि मूलतत्त्ववादी शक्तींकडे झुकलेला आहे. अशा परिस्थितीत, अमेरिकेलाही सावधगिरी बाळगण्याची आणि अशा देशाच्या जाळ्यात न अडकण्याची गरज आहे. पत्रपरिषदेत बोलताना

अझर यांनी पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील कोणत्याही मतभेदाचे वृत्त फेटाळून लावले आणि म्हटले की, दोन्ही नेत्यांमध्ये मतभेद होण्याची अपेक्षा करणाऱ्यांना आणखी काही काळ थांबावे लागेल. काही लोकांनी आपल्या राजकीय अजेंड्याच्या पूर्ततेसाठी हे मतभेद वास्तवाच्या पलीकडे जाऊन वाढवून सांगितले.

**नेतान्याहू- ट्रम्प यांच्यात मतभेद नाही**

अजर म्हणाले, ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यात कोणतेही मतभेद नाही. दोन्ही नेत्यांमधील कथित तणाव हा कोणत्याही धोरणात्मक मतभेदांमुळे नाही, तर त्यांच्या वेगवेगळ्या कार्यशैली आणि वैयक्तिक नेतृत्वशैलीमुळे निर्माण झाला आहे. मला वाटते की बरेच लोक ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यातील मतभेदाच्या शोधात आहेत आणि गेल्या १० वर्षांपासून त्याची वाट पाहत आहेत. ◂(वृत्तसंस्था)

## पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केलेल्या १८८ पोलिसांच्या शहरांतर्गत बदल्या

**सोलापूर, दि. ५ जून-**

शहर पोलिस आयुक्तालयांतर्गत अंतर्गत बदल्या झाल्या आहेत. पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केलेल्या या अंमलदारांची बदली झाली आहे. यात १८८ जणांचा समावेश आहे. पैकी गुन्हे शाखेतील आठजणांची बदली झाली आहे, तर एकाला मुदतवाढ देण्यात आली आहे. पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी स्वतः सर्व अंमलदारांचे मत जाणून घेत अत्यंत पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया राबविली. एकाच ठिकाणी पाच वर्षे पूर्ण झालेल्या अंमलदारांची यादी आधीच तयार करण्यात आली होती. त्यानंतर या सर्व अंमलदारांना प्रत्यक्ष बोलावून त्यांनी, पोलिस उपायुक्त वृष्टी जैन, प्रीतम यावलकर, डॉ. अश्विनी पाटील यांनी सर्वांचे मत जाणून घेतले. अंमलदारांना रिक्त जागा उपलब्ध असलेले पोलिस ठाणे किंवा इतर विभागांचे तीन पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आली होती. त्यानुसार ही बदली झाली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# विधान परिषद निवडणुकीचे कवित्व

आ देशात दोन पद्धतीने निवडणुका होतात. एक म्हणजे प्रत्यक्ष निवडणूक आणि दुसरी म्हणजे अप्रत्यक्ष निवडणूक. लोकसभा आणि विधानसभेसाठी होते, ती प्रत्यक्ष निवडणूक आणि विधानपरिषद आणि राज्यसभेसाठी होते, ती अप्रत्यक्ष निवडणूक. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि नगरपालिका- महानगर पालिकेसाठीही प्रत्यक्ष निवडणूक होते. प्रत्यक्ष निवडणुकीत सर्वसामान्य जनता मतदान करून आपले लोकप्रतिनिधी निवडते. विधान परिषद आणि राज्यसभा निवडणुकीत जनता थेट मतदान करत नाही, तर जनतेने आधीच्या निवडणुकीत म्हणजे विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत निवडून दिलेले लोकप्रतिनिधी मतदान करीत असतात. विधान परिषदेच्या शिक्षक मतदारसंघात शिक्षक तर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत पदवीधर मंडळी मतदान करीत असतात. विधानसभा निवडणुकीत एक लाखापासून पाच लाखांपर्यंत मतदार असतात तर लोकसभा निवडणुकीत मतदारांच्या संख्या २५ ते ३० लाखांपर्यंत असते. त्यामुळे या निवडणुका नेहमीच चुरशीच्या होतात. विधानपरिषद आणि राज्यसभा निवडणुकीत मतदारांची संख्या मर्यादित असते. तरीही त्यांत चुरस असतेच. कोणत्या पक्षाचे किती मतदार आहेत, हे ठरलेले असते. त्यामुळे या निवडणुकीच्या निकालाची सगळ्यांना आधीच कल्पना आलेली असते. सामान्यपणे निवडणूक विधान परिषदेची असो की राज्यसभेची; ती अनेकदा अविरोध होते. फार कमी वेळा त्यात निवडणुकीची म्हणजे मतदानाची वेळ येते. निवडणूक विधानसभेची असो की लोकसभेची, त्यात पाण्यासारखा पैसा खर्च करावा लागतो, हे आता लपून राहिलेले नाही. पूर्वीच्या काळी विधान परिषद वा राज्यसभेच्या निवडणुकीला फार खर्च लागत नसे. कारण अशा निवडणुकीत प्रचार करण्याची गरजच पडत नव्हती. पक्षाचे मतदार व पक्षांचे अंतर्गत सामंजस्य यावर निकाल ठरायचे. आता ती स्थिती राहिलेली नाही हे खरेच. पण, हे राजकारण आहे. राजकारणात सारे काही क्षम्य असते असे म्हणतात. क्रिकेटच्या मैदानात बॅडमिंटनची रॅकेट घेऊन खेळता येत नाही. निवडणूक हे मैदान असते. जो सर्वप्रकारच्या तयारीत असतो, त्याचाच विजय होतो. महाराष्ट्रात विधान परिषदेच्या १७ तर राज्यसभेच्या एका जागेसाठी सध्या निवडणूक होत आहे. विधान परिषदेच्या १७ पैकी ६ जागांवरील उमेदवार अविरोध निवडून आले आहेत. उर्वरित ११ जागांसाठी १८ जूनला मतदान होणार आहे. फक्त भाजपाचेच उमेदवार अविरोध विजयी झाले असे नव्हे, तर शिवसेना शिंदे गटाचे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवारही अविरोध विजयी झाले आहेत. अविरोध विजयी झालेल्या उमेदवारांमध्ये भाजपाचे अरुण लखानी, प्राजक्त तनपुरे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे अनिकेत तटकरे, विक्रम काकडे तसेच शिवसेना शिंदे गटाचे दुष्यंत चतुर्वेदी आणि रवींद्र फाटक यांचा समावेश आहे. याचा अर्थ महाराष्ट्राच्या महायुतीतील तिन्ही पक्षांचे प्रत्येकी दोन उमेदवार अविरोध निवडून आले आहेत. निवडणुकीत असे घडतच असते. मुद्दा असतो कोण किती तयारीचा आहे याचा आणि पक्ष त्या उमेदवाराच्या पाठीशी किती ताकदीने उभा आहे याचा. भाजपा आपल्या उमेदवारांची काळजी अतिशय निगुतीने घेते. अर्ज भरण्याच्या तयारीपासून ते मतदारांच्या याद्यांची छाननी करण्यापर्यंत सारे काही पक्ष करीत असतो. दुसऱ्या बाजूला गब्बर नेत्यांची मांदियाळी असलेला काँग्रेस पक्ष प्रचारासाठी साधे झेंडे पाठवू शकत नाही, हे वारंवार दिसले. अशा पक्षाचा विजय कसा होणार? त्या तुलनेत भाजपा आपल्या माणसांना उमेदवार म्हणून जे काही पाठबळ द्यायचे, ते देते. राजकारणात गरजेप्रमाणे तडजोडी कराव्या लागतात. त्या केल्या गेल्या आहेत. पण, निष्ठावंतांची कदर करण्यात भाजपा इतरांच्या तुलनेत नेहमी पुढे असते. ते याही निवडणुकीत दिसले. भाजपात कोणतीही राजकीय महत्त्वाकांक्षा न ठेवता पडद्याआडून पक्षाच्या विस्तारासाठी काम करणारे असंख्य कार्यकर्ते आहेत. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपाचे सरकार सत्तेत आल्यापासून भाजपाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना विधानसभा आणि लोकसभेसोबत विधानपरिषद आणि राज्यसभा निवडणुकीतही संधी दिली गेली आहे. यासाठी भाजपाच्या राज्यस्तरावरील तसेच केंद्रीय नेतृत्वाचे अभिनंदन केले पाहिजे. निष्ठावंतांना न्याय कसा द्यावा आणि निवडणूक कशी लढवावी, हे जसे भाजपाकडून शिकण्यासारखे आहे, तसेच निवडणूक कशी लढवू नये, हे विरोधी पक्षांकडून विशेषतः काँग्रेस पक्षाकडून शिकण्यासारखे आहे. कारण ज्या उमेदवारांनी माघार घेतली, त्यातील बहुतांश काँग्रेसचे आहेत. यातील अनेकांनी तर आपल्या पक्षाच्या प्रदेश पातळीवरील नेतृत्वाला विश्वासात न घेताच माघार घेतली आणि महायुतीच्या अर्धा डझन उमेदवारांच्या अविरोध निवडीचा मार्ग प्रशस्त केला. काँग्रेसमध्ये एकप्रकारे अंतर्गत अराजक आहे ते असे. एकीकडे, एक निवडणूक संपत नाही तोच भाजपा नेतृत्व दुसऱ्या निवडणुकीच्या तयारीला लागते. त्या निवडणुकीला दीड-दोन वर्षांचा कालावधी असला, तरी भाजपा त्या राज्यात आपल्या कार्यकर्त्यांना कामाला लावत असते. याच्या उलट एक निवडणूक संपली की, काँग्रेसचे नेते ढाराढूर झोपून जातात. काँग्रेसचे नेतेच झोपी गेल्यामुळे कार्यकर्त्यांनी तरी जागून काय करायचे? त्यामुळे तेसुद्धा जागा पाहून आपली पथारी पसरतात. संबंधित राज्यातील निवडणुकीची घोषणा झाल्यावरच काँग्रेसच्या नेत्यांना जाग येते; पण तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. तोवर भाजपाने आपला कार्यभाग साधलेला असतो, हा नेहमीचा अनुभव. भाजपाला प्रत्येक निवडणुकीत जो दणदणीत विजय मिळतो, त्याचे कारण या पक्षाच्या अशा तयारीत असते. याउलट, काँग्रेसचा जो सतत दारुण पराभव होतो, त्याचे कारण त्या पक्षाच्या नेत्यांच्या ढाराढूर झोपण्यात दडलेले आहे. अशात आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएम किंवा आर्थिक व्यवहारावर फोडण्याशिवाय काँग्रेसला पर्याय राहत नाही. आपले घर शाकारायचे राहिले आहे, हेच काँग्रेसला आठवत नाही. निष्ठावंत कोण आणि उपरा कोण हे त्या पक्षाला ठरविता येत नाही. आपल्या पराभवासाठी आपली उदासीनता आणि निष्क्रियता कारणीभूत आहे, हे कधीच काँग्रेसच्या ध्यानात येत नाही. आपल्यावरील दोषाचे खापर दुसऱ्यावर फोडण्यात काँग्रेसच्या नेत्यांचा कोणी 'हात' धरत नाही. काँग्रेसच्या नेत्यांची स्थिती वर्षभर अभ्यास न करता परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांसारखी आहे. असा विद्यार्थी प्रत्येकच पेपर कठीण आला म्हणून रडत असतो. खरे तर असा विद्यार्थी पेपर कठीण आल्यामुळे नाही तर अभ्यास न केल्यामुळे नापास झालेला असतो. पेपर सोपा आला असता तरी तो नापासच झाला असता. कारण सोपा पेपर सोडवायलाही थोडा अभ्यास करणे आवश्यक असते. तो करण्याचे काँग्रेसला पार विस्मरण झालेले आहे. विधान परिषदेच्या उर्वरित ११ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची स्थिती यापेक्षा वेगळी असणार नाही. विधान परिषद निवडणुकीच्या अविरोध निकालांचे कवित्व हेच सांगते. निवडणुकीच्या आखाड्यातील भाजपासारख्या पहेलवानाला पराभूत करायचे असेल तर समोरचा पहेलवानही तेवढ्याच तयारीचा आणि तोलामोलाचा लागत असतो. काडी पहेलवान काही कामाचे नसतात. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची स्थिती अशा काडी पहेलवानांसारखी झाली आहे. त्यांनी आता तरी स्वतःचे घर शाकारण्याची सुरुवात करावी. ज्यांची निष्ठा संशयास्पद आहे, अशांना जवळ केले तर पक्षाचे नुकसान ठरलेले असते. काँग्रेसएवढा इतर कुणीही या वास्तवाचा अनुभव घेतलेला नाही. त्यामुळेच सत्ता सतत काँग्रेसला वाकुल्या दाखवीत असते. एकेकाळी साऱ्या देशावर हुकूमत असलेल्या पक्षाची ही स्थिती त्याच पक्षाच्या नेतृत्वामुळे झालेली आहे. आता तरी घर शाकारण्याचे शहाणपण काँग्रेसला आणि अन्य विरोधकांना मिळो. लोकशाहीसाठी विरोधी पक्ष सबळ असणे गरजेचे आहे. पण, त्यांना सबळ करण्यासाठी इतर कुणी येणार नाही. आपले घर गळत असेल तर ते आपल्यालाच दुरुस्त करावे लागते. आपल्या घराच्या गळतीला शेजारचे जबाबदार आहेत, अशा बोंबा कुठवर ठोकणार?

## यंगिस्तान

### जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# भारतीय तरुण झुरळ नाहीत...!

भारत हा जगातील सर्वात तरुण देश आहे. तरुण असल्याने इथली ऊर्जा प्रचंड आहे. हा देश वेगाने प्रगती करतोय. पण दुर्दैवाने, काही राजकीय महत्त्वाकांक्षी लोक आणि 'ब्रेकिंग इंडिया' फोर्सेस या ऊर्जेला चुकीच्या दिशेला वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. सध्या 'कॉक्रोच जनता पार्टी' नावाचे एक तथाकथित उपरोधिक आंदोलन समोर आले आहे. न्यायमूर्तींनी केलेल्या उपरोधक टीकेला उत्तर देण्यासाठी अभिजित दीपके यांसारख्या तरुणांनी सुरू केलेले हे आंदोलन आता वेगळ्या दिशेला जात आहे. अभिजित दीपके यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून 'कॉक्रोच जनता पार्टी'ची स्थापना केली. वरवर पाहता हे एक उपरोधिक वाटू शकते, पण त्यामागील राजकीय अजेंडा अत्यंत गंभीर आहे. दीपके यांना भारत आणि इथल्या तरुणांची खरी मानसिकता कदाचित कधीच समजली नाही. तरुणांच्या बेरोजगारीच्या प्रश्नांचे भांडवल करून त्यांना व्यवस्थेविरुद्ध भडकवणे हा या आंदोलनाचा मुख्य आधार आहे. प्रश्न असा पडतो की, हे आंदोलन खरोखरच तरुणांच्या हितासाठी आहे की एखाद्या मोठ्या राजकीय षडयंत्राचा भाग?

'कॉक्रोच जनता पार्टी'च्या कारवायांकडे बारकाईने पाहिले तर त्याचे धागेदोरे आम आदमी पार्टी आणि उमर खलीद यांच्यासारख्यांशी जुळताना दिसतात. या आंदोलनाला ठरावीक राजकीय विचारधारेचे समर्थन मिळत आहे. उमर खलीदवर देशाला अस्थिर करण्याचे आणि जेएनयूमध्ये देशविरोधी घोषणाबाजी करण्याचे आरोप आहेत. जर झुरळ आंदोलकांना उमरबाबत आपुलकी वाटत असेल तर ही धोक्याची घंटा आहे. जरी आपल्याला वाटत असलं की हे तरुणांचं आंदोलन आहे, तरी तरुण प्रतिनिधींना पुढे करून 'खडूस पुरोगामी म्हातारे' हे आंदोलन पडद्यामागून चालवत आहेत. या शक्तींचा मूळ उद्देश देशाला अस्थिरता निर्माण करणे आणि लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या सरकारविरुद्ध असंतोष पसरवणे हाच आहे. जगामध्ये अनेक देश सध्या अस्थिर आहेत. पण भारतीय तरुण का उठाव करत नाही? का बंड करत नाही? कुठे आहे असंतोष? हे प्रश्न या पुरोगाम्यांना पडले आहेत. इतकी माथी भडकावूनही का इथले तरुण शस्त्र हातात घेऊन राज्यकर्त्यांची गर्दन छाटत नाहीत? हा प्रश्न या सो-कॉल्ड पुरोगाम्यांना सतावतोय आणि म्हणूनच तरुणांच्या हाती शस्त्रे देण्यासाठी आणि देशातील रस्ते रक्ताने रंगवण्यासाठी हे सेक्युलर्स आसुसलेले आहेत. मात्र, या सेक्युलर्सना भारत कळलाय का? भारतीय इतिहासाचा अभ्यास केला तर आपल्याला दिसेल की, इथला तरुण कधीच विध्वंसक नव्हता. भारतीय क्रांतिकारी चळवळीत भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, सावरकर आणि सुभाषचंद्र बोस यांसारख्या हजारो तरुणांनी सशस्त्र क्रांती केली. त्यांनी इंग्रजांच्या नाकी नऊ आणले.




भारत आणि परदेशी भुईतही या तरुणांनी इंग्रजी रक्त सांडले. हा आततायीपणा नव्हता. सावरकर म्हणाले होते की, 'इंग्रज जर उद्या भारतातून निघून गेले तर ते आमचे शत्रू राहणार नाहीत.' जोपर्यंत ते बळाने भारतावर राज्य करत आहेत, तोपर्यंत ते भारताचे शत्रू आहेत. या क्रांतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे देश स्वतंत्र झाल्यावर या क्रांतिकारकांनी स्वतःहून शस्त्रे खाली ठेवली. हे 'हिंदू भावविश्व' आहे. भारतात बहुसंख्य हिंदू आहे आणि इथे हिंदू तरुणांची संख्या जास्त आहे. हिंदू संस्कृतीमध्ये शस्त्राचा वापर केवळ अन्यायाविरुद्ध आणि संरक्षणासाठी केला जातो. एकदा ध्येय साध्य झाले की, समाज पुन्हा शांतता आणि निर्माणाच्या मार्गाकडे वळतो. पाश्चिमात्य देशांमध्ये किंवा काही कट्टरपंथी विचारधारांमध्ये क्रांतीनंतर अनेकदा गृहयुद्धे होतात, पण भारतात तसे झाले नाही. कारण इथल्या तरुणांच्या रक्तात 'विध्वंस' नाही तर 'सृजन' आहे. अभिजित दीपकेसारख्या झुरळांना आणि त्यांच्या समर्थकांना हा सांस्कृतिक वारसा कधीच कळणार नाही.

आजच्या जेन-झीबद्दल अनेक गैरसमज पसरवले जातात. त्यांना व्यसनी, दिशाहीन किंवा केवळ सोशल मीडियात मग्न असलेले मानले जाते; पण वास्तव वेगळे आहे. अलिकडच्या काही सर्वेक्षणांनुसार, भारतीय तरुणांमध्ये दारू पिण्याचे आणि इतर व्यसनांचे प्रमाण जागतिक स्तरावरील त्यांच्या समवयस्कांच्या तुलनेत कमी होत आहे. आजचा तरुण आपल्या आरोग्याबद्दल, करीअरबद्दल आणि देशाच्या प्रगतीबद्दल अधिक जागरूक आहे. तो केवळ रस्त्यावर उतरून घोषणाबाजी करण्यात रस ठेवत नाही, तर तो स्टार्टअप्स सुरू करत आहे, तंत्रज्ञानात नवनवीन प्रयोग करत आहे आणि जागतिक स्तरावर भारताचे नाव उंचावत आहे. अशा जागरूक तरुणांना 'झुरळ' म्हणणे हा त्यांचा अपमान आहे. दीपके यांच्यासारखे लोक जेव्हा तरुणांना अशा नकारात्मक नावाखाली एकत्र करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा ते भारतीय तरुणांच्या बुद्धिमत्तेचा अनादर करत असतात. जगभरात अशा अनेक आंदोलनांची उदाहरणे आहेत, जिथे 'लोकशाही' किंवा 'हक्क' यांच्या नावाखाली तरुणांचा वापर करून देश अस्थिर केले गेले. 'अरब स्प्रिंग'चे उदाहरण आपल्यासमोर आहे. इजिप्त, लिबिया, सीरिया या देशांमध्ये अशाच प्रकारे आंदोलने झाली, ज्याचा परिणाम आज आपल्यासमोर आहे, हे देश उद्ध्वस्त झाले आहेत. शेजारील बांगलादेश किंवा श्रीलंका येथे झालेली अलिकडची आंदोलनेही याच दिशेने इशारा करतात. भारतातही 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या माध्यमातून असाच काहीसा प्रयत्न केला जात आहे. तरुणांच्या भावनांना हात घालून त्यांना व्यवस्थेविरुद्ध उभे करणे आणि त्यानंतर देशात अराजकता माजवणे, हा या 'ब्रेकिंग इंडिया' फोर्सेसचा प्लॅन आहे. या शक्तींना भारताची प्रगती बघवत नाही. त्यामुळेच ते अशा विचित्र नावांच्या संघटनांना खतपाणी घालत आहेत. पण एक गोष्ट या शक्तींनी लक्षात ठेवली पाहिजे- भारतीय तरुण हा सुज्ञ आहे. तो भावनांच्या भरात येऊन स्वतःच्या देशाचे नुकसान करणार नाही. त्याला माहिती आहे की, बेरोजगारी किंवा इतर समस्यांवर मात करण्यासाठी 'आंदोलन' नाही तर 'आत्मनिर्भरता' आणि 'कौशल्य विकास' आवश्यक आहे.

भारतीय तरुण हा छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर वाढलेला आहे. त्याला कळते की, कोण आपल्याला प्रगतीकडे नेत आहे आणि कोण अराजकतेच्या खाईत ढकलण्याचा प्रयत्न करत आहे. 'कॉक्रोच जनता पार्टी' सारखी आंदोलने ही केवळ क्षणिक बुडबुडे आहेत. त्यांना कोणताही ठोस पाया नाही. अभिजित दीपके आणि त्यांच्या पाठीशी असलेल्या शक्तींना हेच सांगावेसे वाटते की, भारतीय तरुणांची शक्ती ओळखा. त्यांना 'झुरळ' म्हणून हिणवून तुम्ही स्वतःचेच हसे करून घेत आहात. भारतीय तरुण हा या देशाचा 'कणा' आहे. तो प्रगतीचा दूत आहे. तो विचारी आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तो राष्ट्रभक्त आहे.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

### सोनाली पवन ठेंगडी

# 'कृत्रिम'ता वाढतेय्

आता पुढील काळ एआयचा (कृत्रिम बुद्धिमत्ता) आहे, असे आपण काही वर्षांपूर्वी जाणत्या लोकांकडून ऐकले होते. पण, एआय किती प्रभाव टाकू शकतो, याची कल्पना कोणालाच नव्हती. आता कदाचित तज्ज्ञांना याची पुरेपूर कल्पना येते आहे. एआय आता हातातील मोबाईलपासून मोठमोठ्या तंत्रज्ञानापर्यंत व्यापून उरलाय. काहींचे म्हणणे आहे की, हे सारे चांगलेच आहे. एआयने जगाची कामे सुरळीत केली आहेत. पण, यातील एक मोठा धोका जो पुढील काळाच्या दृष्टीने घातक आहे, त्याविषयी चिंता करण्याची गरज आहे. तो मुद्दा म्हणजे, नवीन पिढी एआयच्या अक्षरशः अधीन झाली आहे.



नव्या पिढीने एआयच्या अधीन होणे ही सामाजिकच नव्हे तर एकूणच जागतिक परिवेशाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. कारण एआयमुळे मुले स्वतःच्या डोक्याने विचार करणे विसरत आहेत. एआयच्या मदतीने ते आपल्या सर्व समस्यांची उत्तरे शोधतात. ही सवय त्यांच्या अभ्यासापर्यंत असती तर ठीक होते. पण, दैनंदिन जीवनातील भावनिक समस्यांच्या बाबतीतही ते एआयची मदत घेताना दिसताहेत.

एका प्राध्यापकाने आपल्या विद्यार्थ्यांना एक असाईनमेंट दिली. दुसऱ्या दिवशी चर्चेदरम्यान त्यांनी पाहिले की, जवळजवळ सर्व विद्यार्थ्यांचे तर्क, उदाहरणे आणि वाक्ये सारखीच होती. हे स्पष्ट होते की, बहुतेकांनी एआयचा वापर केला होता. प्राध्यापकांची चिंता केवळ एआयच्या वापराची नव्हती. त्यांना चिंता होती की, जेव्हा माणूस आपले विचार आणि निर्णय यंत्रांवर सोपवतो, तेव्हा त्याची स्वतःची उपयुक्तताही कमी होऊ लागते. मुलांच्या बाबतीत तर हे आणखी चिंताजनक आहे. जर एखादे मूल सुरुवातीपासूनच एआयवर अवलंबून राहिले, तर त्याच्यामध्ये स्वतंत्र विचारशक्ती विकसितच होऊ शकणार नाही. अशी मुले प्रश्न विचारण्याची, तर्क करण्याची आणि योग्य-अयोग्य यातील फरक समजून घेण्याची क्षमता कदाचित मिळवूच शकणार नाहीत. अशा स्थितीत मग ते आयुष्यातील संकटांचा सामना करणार तरी कसा? सगळीकडे एआय धावून येणार नाही. एक वेळ अशी येते जेव्हा माणसाला आपल्या समस्यांची सोडवणूक आपल्या तर्कबुद्धीने आणि व्यवहार्य वागणुकीने करावी लागते. जपानमध्ये भात आणि माशांपासून बनवल्या जाणाऱ्या सुशी नावाच्या पदार्थाला तयार करणारे शेफ पहिले दोन वर्षे फक्त भात शिजवायला शिकतात. या काळात त्यांना माशाला स्पर्श करण्याचीही परवानगी नसते. याचा उद्देश सुशी बनवण्याच्या कलेसोबतच संयम, शिस्त, एकाग्रता आणि बारकाईने काम करण्याची सवय विकसित करणे हा आहे. मानवी भावनांचा विचार करून या सवयी विकसित करण्यामागे त्यांच्या गुणांचा विकास करणे, हा उद्देश असतो. मानवी विचारशक्ती सर्वोपरी असते, ही यामागील मूळ भावना आहे. मानवामध्ये असलेली अफाट शक्ती हे या जगातील सर्वात मोठे वास्तव आहे. शेवटी ज्या एआयवर आज मानव अवलंबून आहे त्याचा आविष्कार आपोआप झालेला नाही. तो देखील मानवानेच केलेला आहे. मानवाच्या गुणांना अनुभवाची जोड असते. एक कवी जेव्हा कवितेची रचना करतो तेव्हा त्याच्यासाठी तो आत्मानुभव घेत असतो. याउलट, एआयच्या रचना वरवर सुंदर दिसू शकतात, पण त्यांच्यात मानवी अनुभवांतून येणारा तो आत्मा नसतो. एआय आधीपासून अस्तित्वात असलेले पॅटर्न आणि डेटा शिकून काम करते, तर मानवी सर्जनशीलता अनेकदा तेच पॅटर्न मोडून काहीतरी अनोखे आणि नवीन निर्माण करते मुळात, एआयचा वापर करणे चुकीचे नाही, पण त्यावर पूर्णपणे अवलंबून राहिल्याने बौद्धिक विकास थांबू शकतो. म्हणून काही बाबतीत एआयच्या वापरात थोडे बदल करण्याची गरज आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पेन हातात धरणे सोडायला नको. जेव्हा संगणक आला, तेव्हा अनेक लोकांनी पेनने कागदावर लिहिणे सोडून दिले होते. आता एआयच्या मदतीने बोलून टाईप करता येतं, ज्यामुळे टाईप करण्याची सवयही कमी होत आहे. जेव्हा आपण लिहितो, तेव्हा केवळ वाक्ये बनवत नाही, तर आपले मन व्यवस्थित करायला शिकतो. आपण एखाद्या विषयावर सखोल विचार करतो, तो समजून घेतो आणि मग आपले विचार योग्य शब्दांत मांडतो. आज नव्या पिढीला पुन्हा लिखाण, वाचन याकडे नेणे फार अवघड दिसत असले, तरी अशक्य नक्कीच नाही. पण, अर्थात यासाठी पालक आणि शिक्षकांनाही स्वतःमध्ये तसा सकारात्मक बदल घडवावा लागेल. 'आम्ही 'बि'घडलो, तुमी 'बि'घडाना' हे वाक्य पालक आणि शिक्षक कसे वापरतात, यावर पुढील पिढीचे भवितव्य अवलंबून राहील, हे नक्की.

९४०३२ ११६७३


## मुंबई वार्तापत्र

### नागेश दाचेवार

# उबाठाचा रडबाळा!

विधान परिषद निवडणुकीत मतदान होण्यापूर्वीच महाविकास आघाडीवर (मविआ) जी नामुष्की ओढावली आहे, त्याने विरोधकांच्या गोटातील अंतर्गत धुसफूस आणि अविश्वास चव्हाट्यावर आणला आहे. आत्मविश्वास खचला आहे. तब्बल पाच जागांवर मतदानाचा टप्पा गाठण्यापूर्वीच मविआच्या अधिकृत उमेदवारांनी घेतलेली माघार ही केवळ राजकीय नामुष्की नसून उबाठा (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या नेतृत्वाचा झालेला नैतिक पराभव आहे. मात्र, नेहमीप्रमाणे या पराभवाचे प्रामाणिक आत्मपरीक्षण करण्याऐवजी उबाठा गटाचे एकमेव विद्वान प्रवक्ते संजय राऊत यांनी पुन्हा एकदा 'खोके' आणि '१५० कोटींच्या व्यवहारांचे' तेच जुने, गुळगुळीत झालेले रडगाणे गाण्यास सुरुवात केली आहे. स्वतःच्या पक्षातील गळती आणि कार्यकर्त्यांमधील प्रचंड असंतोष लपवण्यासाठी राऊत यांनी लावलेले हे 'भ्रष्टाचार पुराण' म्हणजे निव्वळ रडबाळा आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सुरू असलेल्या विधान परिषद निवडणुकांच्या निमित्ताने महाविकास आघाडीचा (मविआ) मुखवटा पुन्हा एकदा गळून पडला आहे. स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांतून विधान परिषद सदस्यांसाठी सुरू असलेल्या निवडणुकीत अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी जे काही नाट्य घडले, त्याने विरोधकांच्या गोटातील उघडेबोघडे राजकारण आणि अंतर्गत अविश्वास राज्याच्या जनतेसमोर उघडा पाडला आहे. ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, अहिल्यानगर, यवतमाळ, छत्रपती संभाजीनगर आणि वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि प्रतिष्ठेच्या जागांवर मतदानाच्या आधीच महाविकास आघाडीला मानहानिकारक परिस्थितीला सामोरे जावे लागले आहे. मतदान होण्यापूर्वीच महाविकास आघाडीने जागा गमावल्याने त्यांच्यावर मोठी नामुष्की ओढवली आहे. नेहमीप्रमाणे या नामुष्कीचे खापर स्वतःच्या अकार्यक्षमतेवर फोडण्याऐवजी उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा 'घोडेबाजार'च्या वांझोट्या गप्पा मारत भाजपावर चिखलफेक करण्याचा केविलवाणा प्रयत्न चालवला आहे. ज्या पक्षात कार्यकर्त्यांचा आदर उरलेला नाही, ज्या पक्षाच्या नेत्यांना स्वतःचे अधिकृत उमेदवार सांभाळता येत नाहीत आणि ज्यांच्या चुकीच्या धोरणांमुळे त्यांचेच उमेदवार त्यांना सोडून जात आहेत, त्या पक्षाचे प्रवक्ते आज लोकशाहीच्या आणि नैतिकतेच्या गप्पा मारत आहेत, हा महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील सर्वात मोठा विनोद म्हणावा लागेल.



राऊत यांच्या या विधानाकडे बारकाईने पाहिले तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते- हा त्यांच्या वैचारिक आणि संघटनशक्तीच्या पराभवाचा थेट कबुलीजवाब आहे. ज्या बाळ माने (कोकण) आणि देवयानी डोणगावकर (छत्रपती संभाजीनगर) यांना उबाठा गटाने मोठ्या थाटामाटात तिकीट दिले होते, त्यांनीच ऐनवेळी पक्षाला सोडचिठ्ठी दिली किंवा अर्ज मागे घेतला. राऊत ज्यांना विरोधी पक्षाचे घोडे म्हणत आहेत, ते घोडे मूळचे उबाठा आणि महाविकास आघाडीच्या तबेल्यातील होते, हे ते सोयीस्करपणे विसरले आहेत. जर तुमचे स्वतःचे उमेदवार विकले जात असतील, तर याचा अर्थ असा की, तुमचे घोडे तुमच्या कंट्रोलमध्ये नाहीत. मुळात राजकारणात सर्वच पक्ष आपापल्या परीने मोर्चेबांधणी करीत असतात. जर महायुतीचे नेते विरोधी उमेदवारांचे मतपरिवर्तन करण्यात यशस्वी ठरत असतील आणि निवडणुका बिनविरोध करून राज्याचा अनावश्यक निवडणूक खर्च वाचवत असतील, तर त्याचे स्वागत करण्याऐवजी त्यात 'भ्रष्टाचार' शोधणे म्हणजे 'काविळ' झालेल्या डोळ्यांचे लक्षण आहे. महायुतीच्या जागावाटपात रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग (कोकण) ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेली होती तर महाविकास आघाडीकडून शिवसेना उबाठाने बाळ माने यांना रिंगणात उतरवले होते. कोकण हा एकेकाळी शिवसेनेचा अभेद्य किल्ला मानला जायचा. मात्र, उद्धव ठाकरेंच्या चुकीच्या धोरणांमुळे आणि मुंबईत बसून दरबारी राजकारण करण्याच्या वृत्तीमुळे कोकणातील स्थानिक नेत्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. बाळ माने यांनी शेवटच्या क्षणी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला; विशेष म्हणजे, त्यावेळी भाजपाचे नेते आणि मंत्री नितेश राणे तेथे उपस्थित होते. या घटनेनंतर उबाठा गटाने बाळ माने यांची पक्षातून हकालपट्टी केल्याची घोषणा केली. मात्र, मूळ प्रश्न असा आहे की, बाळ माने यांनी हा निर्णय का घेतला?

छत्रपती संभाजीनगरमध्ये उबाठा गटाने कृष्णा डोणगावकर यांच्या पत्नी देवयानी डोणगावकर यांना उमेदवारी दिली होती. मात्र, त्यांनीही ऐनवेळी माघार घेऊन उबाठा गटाला मोठा धक्का दिला. यानंतर देवयानी डोणगावकर आणि कृष्णा डोणगावकर या दोघांचीही पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. संभाजीनगर हा बाळासाहेब ठाकरेंचा बालेकिल्ला होता. मात्र, जेव्हापासून उद्धव ठाकरेंनी केवळ सत्तेच्या मोहापायी काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीशी घरोबा केला, तेव्हापासून संभाजीनगरमधील निष्ठावंत शिवसैनिक आणि नेते गुदमरत आहेत. ज्या शहराचे नाव 'छत्रपती संभाजीनगर' करण्याला काँग्रेसने वर्षानुवर्षे विरोध केला, त्याच काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसणाऱ्या उबाठा नेत्यांच्या प्रचाराला सामोरे जाणे स्थानिक नेत्यांना अशक्य झाले असावे. देवयानी डोणगावकर यांनी घेतलेली माघार ही उबाठा गटाच्या बदललेल्या विचारसरणीच्या आणि हुकूमशाहीच्या विरोधात कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेल्या तीव्र संतापानंतरची होती. आपल्याच उमेदवारांना सांभाळता न येणे आणि नंतर त्यांच्यावर पैशांचे आरोप करून स्वतःचे हात झटकणे, हा उबाठा गटाचा नेहमीचाच ढोंगीपणा आहे. काँग्रेसनेदेखील आपल्या उमेदवारावर बडतर्फीची कारवाई करून आपली कातडी वाचविण्याचा प्रयत्न केला. केवळ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आपल्या अर्ज मागे घेणाऱ्या श्रीकांत पाटील या उमेदवारावर कारवाई केलेली नाही.

तुम्हीच उभे केलेले उमेदवार जर 'गधे-घोडे' असतील, तर ते बाजारात विकले जाणारच! आता गध्याच्या आणि घोड्याच्या रेटमध्ये थोडाफार फरक नक्कीच असेल, पण शेवटी विकाऊ ते विकाऊच! आपल्या तबेल्यात आपण नक्की कोणाला पोसतोय आणि कोणाला तिकीट वाटतोय, या एवढ्या साध्या गोष्टीची कल्पना जर पक्षप्रमुखांना नसेल, तर मग हे गधे-घोडे गोळा करून पक्ष चालवण्याचा धंदा कशाला करता? त्यापेक्षा हा राजकीय गाढवबाजार थांबवा, पक्ष चालवणं सोडा आणि दुसरा एखादा चांगला व्यवसाय सुरू करा... स्वतःच्या उमेदवारांवर 'विकाऊ' शिक्का मारून संजय राऊत यांनी स्वतःच्याच पक्षप्रमुखांच्या पारख करण्याच्या क्षमतेचे धिंडवडे काढले आहेत, एवढे मात्र निश्चित!

९२७०३३३८८६

### सिग्नल्स वेळेचे पुनर्निर्धारण व्हावे

नागपूर शहराचा प्रचंड विस्तार होत आहे. त्या प्रमाणात तशीच बेशिस्त वाहतूकदेखील वाढते आहे. चौकाचौकात असलेले सिग्नल्स कोणी लाल दिव्यावर थांबेल या आशेने पाहात आहेत. दुचाकी असो की चारचाकी कोणीही हिरव्या दिव्याची वाट पाहात नाही. काही ठिकाणी डिजिटल घड्याळी लागली आहेत; तिथे वाहक थोडा थांबण्याचा संयम दाखवितात. अन्य ठिकाणी तर लाल सिग्नलसमोरच वाहने पुढे निघतात. शहराबाहेर रिंग रोडच्या डावी-उजवीकडे रहिवासी वसाहती आहेत. ते रस्ते चौकाला येऊन मिळतात. यावर मुख्य रस्त्यापेक्षा वाहनांची तुरळक वाहतूक असते. मात्र, सर्व सिग्नलचा वेळ सारखाच असतो. त्यामुळे तिकडून वाहने येत नाहीत, हे बघून मुख्य रस्त्यावरील वाहने हिरव्या सिग्नलची वाट न बघता निघून जातात. प्रशासनाने अशा मोठ्या चौकातील सिग्नल्सवर वेळेचे पूर्वनिर्धारण करावे. मुख्य रस्त्यावरील वाहनांना ६० आणि वस्ती रस्त्यांना २० सेकंदापेक्षा जास्त वेळ द्यावा तसेच एका बाजूच्या लाल सिग्नलनंतर दुसऱ्या बाजूच्या हिरव्या सिग्नलमध्ये किमान १० सेकंदाचा फरक असावा; म्हणजे हिरव्यानंतर होणारी वाहतूक पूर्ण होईल. अनेक प्रसंगी हिरव्या सिग्नलची वाहने आपल्या दिशेने जात असताना चौकात मध्येच राहतात आणि दुसऱ्या हिरव्या सिग्नलची वाहने त्यांच्या पुढ्यात ठाकतात. अशा वेळेस संपूर्ण सिग्नल्सचा बोजवारा उडतो. वाहतूक तुंबून राहते. पश्चिम नागपूर शहरातील अनेक लहान चौकात सिग्नल्स आहेत, पण त्यांचे पालन होत नाही. संबंधित अधिकारी याकडे लक्ष देतील, अशी आशा आहे.

**संजय पाठक**/नागपूर

### वृक्षारोपणाचा संकल्प पूर्ण करा

पावसाळा जवळ आला आहे. शासनाने विस्तृत प्रमाणात वृक्षारोपणाचा संकल्प जाहीर केला आहे आणि जनतेला सहभागासाठी आवाहन केले आहे. जनता आपल्यापरी त्या आवाहनाला प्रतिसाद देईलच. शाळा-कॉलेजेसच्या स्तरावर, प्रतिष्ठानांच्या स्तरावर वृक्षारोपणांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. गृहनिर्माण संस्था, स्थानिक मंडळं आणि समित्या वृक्षारोपणात सहभाग घेतात. काही जण आईच्या नावाने तर काही परिवारातील सदस्यांच्या वाढदिवसानिमित्त झाडे लावण्याचा उपक्रम करतात. हे उत्साहवर्धक आहे. पण लक्षात असे येते की,

## वाचक पत्रे

साधारणपणे झाडे लावली जातात ती एकतर राहत्या घराच्या जवळपासच्या मैदानात किंवा वस्तीच्या परिसरात. शहरात क्वचितच एखादे मैदान असेल की, ज्याच्या चहुबाजूस मोठे वृक्ष नसतील! खरी आवश्यकता आहे ती शहराच्या बाहेर, जवळपासच्या उघड्या पडलेल्या टेकड्या-डोंगरांवर झाडे लावण्याची. त्यासाठी काही उपाय सुचवासे वाटतात...

१. शासनाने शहरालगतच्या टेकड्या/डोंगरांवरच्या जागा हेरून त्यांच्या उतरणीवर साधारणपणे ५' रुंद अशा सपाट पायऱ्यांची उतरंड तयार करावी. त्या पायऱ्यांवर, योग्य अंतर ठेवून, आर्द्रता धरून ठेवणारी आणि पावसाच्या पाण्यावर स्वतःहून वाढणारी आणि तग धरणारी मोठी झाडे, उदा. वड, पिंपळ, कडूनिंब, उंबर, पळस, सागवण इत्यादी झाडे लावण्याचे जनतेला आवाहन करावे, त्यासाठी रोपांची व्यवस्था करावी.

२. नागरिक उत्स्फूर्तपणे वृक्षारोपणाचे कार्यक्रम करण्याची योजना आखतात तेव्हा त्यांनी सामूहिकपणे, सहपरिवार सहलीच्या रूपांत गावाबाहेर जाऊन शासनाने उपलब्ध करून दिलेल्या परिसरात वृक्षारोपण करावे.

३. प्रतिष्ठाने, संस्था, सोसायट्यांनी त्यांच्या सभासदांकरिता सहलीचे आयोजन करावे. सोबत काही मजूर न्यावे. स्वतःच गावाबाहेरच्या टेकड्या/डोंगरांवरच्या जागा हेरून, सरकारी परवानगीने तेथे झाडे लावावीत. पायथ्याशी फळ झाडे लावावी.

४. दोन मोठ्या झाडांच्या मधल्या जागेत जंगली वनस्पतींच्या किंवा फूल झाडांच्या बिया टाकाव्या; जेणेकरून उतारावरून येणारे पाणी सरसकट वाहून न जाता अडलेले पाणी जमिनीत मुरेल.

५. शासनाने डोंगरमाथ्यावरच्या पठारी भागात खड्डे खणून किंवा बोड्या तयार करून त्याभोवती उंच वाढणारी झाडे लावण्याची योजना आखावी.

**वसंत दीक्षित**/९१३७८६६६१७

### लोभी व्यवस्थेचे बळी

तरुण भारत दि. ०४.०६.२०२६ मधील 'दिल्लीत हॉटेलला आग; २१ जणांचा मृत्यू' ही बातमी वाचून हळहळ वाटली. स्वार्थी हॉटेल चालक आणि त्यांच्या हॉटेल आरेखनातील त्रुटींकडे दुर्लक्ष करून राजरोस व्यवसाय करू देणाऱ्या प्रशासकीय लालची वृत्तीचे हे बळी आहेत. मृतांमध्ये परदेशी नागरिकही बहुसंख्येने असल्याने आपल्या देशातील अनागोंदीचे प्रतिकूल पडसाद उमटले तर त्याला जबाबदार कोण? याचा अर्थ आता ग्राहकांनीच हॉटेलसाठीच्या परवानग्या, संकटकाळी बाहेर पडण्याचे पर्यायी मार्ग व त्यांचं ठळक दिशादर्शन, दोन जिने मार्ग, सुस्थितीतील लिफ्ट, खोल्यांचा ऐसपैसपणा आणि खिडक्या-दारं, तेथील सेवकवर्गाची व्यवस्था आणि तत्परता, संकटकाळी ग्राहकांना मार्गदर्शन करण्याचं त्यांना प्रशिक्षण दिलंय का, अग्निशमन दलाची विनाशर्त परवानगी या गोष्टींची शहानिशा करणं आवश्यक आहे. नाही तर हॉटेल मालकांची मनमानी आणि आर्थिक हितसंबंध जपणाऱ्या प्रशासकीय उदासीनतेचे असे हकनाक बळी जातच राहतील. अशा कोडग्या मानसिकतेच्या सर्वांनाच सदोष मनुष्य वधाचे गुन्हेगार ठरवून लवकरात लवकर कठोर शिक्षा करावी.

**श्रीपाद कुलकर्णी** /बिबवेवाडी-पुणे, ९४२२५१५६४०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# सोलापूरच्या सान्वी गोरे, छत्रपती संभाजीनगरच्या भूमिका वाघलेची विजयी सलामी

## १३ वर्षाखालील राज्य निवड ''चॅम्पियन चषक'' बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

''चॅम्पियन चषक'' १३ वर्षांखालील आंतरराष्ट्रीय गुणांकन खुल्या व मुलींच्या राज्यस्तरीय निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत स्पर्धेच्या पहिल्या फेरीत मुलांच्या गटातील अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंनी अपेक्षित कामगिरी करत विजयी सलामी दिली. यामध्ये मुंबईचा निर्वाण निरव शाह (रेटिंग १८७०), मुंबई उपनगरचा विहान अनुपम अग्रवाल (रेटिंग १८७०), पुण्याचा आरव धायगुडे (रेटिंग १८६८), नागपूरचा मरास साहेजवीर सिंह (रेटिंग १८५२) आणि कुशाग्र पालिवाल (रेटिंग १८४३) यांचा समावेश आहे. मुलींच्या गटातही अग्रम ानांकित खेळाडूंनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत विजय मिळविला. यामध्ये भूमिका वाघले (छत्रपती संभाजीनगर), गिरीशा पै (मुंबई उपनगर), सान्वी गोरे (सोलापूर) आणि प्रिशा घोलप (नाशिक) या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंनी आपापले सामने जिंकत स्पर्धे ची सुरुवात विजयी केली.



महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना व सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशन यांच्या मान्यतेने तसेच हेरिटेज समूह, चॅम्प चेस स्कूल आणि नेक्स्ट मुव्ह चॅम्पियन ऑनलाइन चेस अकॅडमी यांच्या सहकार्याने सोलापूर चेस अकॅडमीतर्फे आयोजित केली आहे. गांधीनगर येथील द हेरिटेज येथे आजपासून सुरु झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन नवी मुंबईचे सहा. पोलीस आयुक्त डॉ. प्रीती टिपरे व अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू भुमिका वाघले यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाली.

यावेळी सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, संघटनेचे सचिव सुमुख गायकवाड, महाराष्ट्र राज्य बुद्धीबळ संघटनेने नियुक्त केलेले प्रमुख पंच आंतरराष्ट्रीय पंच पवन राठी, नेक्स्ट मुव्ह चॅम्पियन ऑनलाइन चेस अकॅडमीचे संचालक पुण्याचे शशिकांत मक्तेदार, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, विद्यापीठ खेळाडू संतोष पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुमुख गायकवाड व सूत्रसंचालन संतोष पाटील यांनी केले. या प्रतिष्ठित स्पर्धेत यजमान सोलापूरसह मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, सांगली, लातूर, अमरावती, पालघर, नांदेड आदी राज्यातील विविध ३१ जिल्ह्यांमधून खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे.

विशेष म्हणजे १३८ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंसह एकूण २९६ नामांकित खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेत विक्रमी नोंद केली आहे. त्यामुळे राज्यातील युवा बुद्धिबळपटूंना आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी आणि राष्ट्रीय स्तरावरील निवडीसाठी ही स्पर्धा महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे. स्पर्धेत उपमुख्य पंच म्हणून सोलापूरचे वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे तसेच सहाय्यक म्हणून सोलापूरचे युवराज पोगुल, गणेश मस्कले, रोहिणी तुम्मा - राठी, जयश्री कोंडा, विजय पंगुडवाले, भरत वडीशेरला, प्रज्वल कोरे, यश इंगळे, अभिजीत बावळे आदी काम पाहत आहेत. या स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या स्विस लीग नियमानुसार एकूण आठ फेऱ्यात स्पर्धा संपन्न होणार असुन मुले व मुलींच्या आकर्षक लढती उपस्थितांना पहावयास मिळत आहेत. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या दोन खेळाडूंची निवड राष्ट्रीय स्पर्धे साठी होणार आहे.

स्पर्धेत पाच व सहा वर्षीय बाल खेळाडू हे देखील आकर्षक खेळ करत सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत.

## संतुलित खतांसह जैविक व सेंद्रिय खतांचा वापर करा : कुलगुरू डॉ. विलास खर्चे

**सोलापूर, दि.५ जून-**

महात्मा फुले कृषि विद्यापीठात खरीप २०२६ संदर्भातील कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक उत्साहात पार पडली. यावेळी कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत त्यांनी जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी संतुलित खतांसह जैविक व सेंद्रिय खतांचा वापर आवश्यक असल्याचे सांगितले. या बैठकीत एल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून आपत्कालीन पीक नियोजन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात आला. विविध तज्ज्ञांनी खरीप हंगामातील पीक उत्पादन, कीड व रोग व्यवस्थापन, हवामान आधारित नियोजन तसेच बियाणे उपलब्धता याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते आपत्कालीन पीक नियोजन पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.


## महावितरण — ई-निविदा सूचना

अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित, मंडल कार्यालय सोलापूर यांचे द्वारे बाहयस्त्रोत कंत्राटी कुशल/अर्धकुशल /अकुशल कामगार नेमण्याकरिता नोंदणीकृत व अनुभवी ठेकेरादारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा म.रा.वि.वि.कं.मर्या.,च्या http:/works.mahadiscom.in/e-tender/etender या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदरच्या निविदा केंद्रीयकृत ग्राहक सुविधा केंद्र सोलापूर व दैंनदिन सनियंत्रण कक्ष मंडल कार्यालय सोलापुर यांचे करीता निविदा क्र .टी- HR ०१/२०२६-२७ अन्वये १ वर्षाच्या कालावधी करिता मागविण्यात येत आहेत. सदर निविदा उपरोक्त संकेतस्थळावर ब्रिकी करिता दि.०५.०६.२०२६ ते १५.०६.२०२६ या कालावधीत उपलब्ध राहतील. तसेच सदरच्या निविदा भरण्याची अंतिम तारीख दि.१५.०६.२०२६ रोजी ११.०० पर्यत राहील.

टीप : कोणतीही निविदा कारण न दाखवता नाकारण्याचा हक्क खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. निविदा फी ऑन लाईन भरावयाची आहे.

अधीक्षक अभियंता
PRO/BMTZ/40/2026-27 (सोमंका) मंडल कार्यालय सोलापूर



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सिध्देश्वर पेठ येथील मिळकत यांसी म्यु.पल घर नं. १२५ व सि.स.नं.६१६४, तसेच स.नं. ८१९, याचे एकूण क्षेत्र ८०९.०० चौ.मी. इतके असून यावर बांधण्यात आलेल्या राहत सेंट्रल पार्क या अपार्टमेंट मधील बी-विंग, चौथा मजला फ्लॅट नं. २९, याचे कारपेट क्षेत्र ५४.८२ चौ.मी. व बिल्टअप क्षेत्र ६४.६० चौ.मी. इतके असून यांसी चतुःसिमाः- पूर्वेस :- कॉमन पॅसेज, स्टेअरकेस व फ्लॅट नं. ३२, पश्चिमेस :-ओपन टू स्काय, दक्षिणेस :- सि.स.नं. ६१६५, उत्तरेस :- फ्लॅट नं. ३० असे आहे.

वर नमूद मिळकतीबाबतचे खरेदीखत दस्त क्र. १२/२०१४, दि.०१-०१-२०१४ हे मुळ खरेदीखत अनावधानाने गहाळ झाले आहे. त्यामुळे आमचे अशील अब्दुल रज्जाक चौधरी यांनी जेलरोड पोलीस स्टेशन, सोलापूर शहर या पोलीस स्टेशनमध्ये रितसर तक्रार दिली असून त्याचे गहाळ ऑनलाईन रजिस्ट्रेशन दि.०३-०६-२०२६ रोजी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहु मिळकत आमचे अशील हे विक्री करणार आहेत. तरी सदरहु मिळकतीवर कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिन, बक्षीस, बोजा, पोटगी, कब्जा वगैरे असल्यास त्यांनी ३ (तीन) दिवसांच्या आत खाली नमूद आमच्या पत्त्यावर त्यांचे हक्काचे पृष्ठ्यर्थ कागदपत्रे आणून द्यावीत. जर कोणी मुदतीत हरकत घेतली नाही तर सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदर मिळकती विक्री करतील, तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता.०५/०६/२०२६.

सही/-
**ॲड. के. एम. शेख**
एम. कॉम. एल.एल.बी
**ॲड. एम. ए. नलवार**
बी.ए. एल.एल.बी.
पत्ता : शॉप नं. ९ लोखंडवाला टॉवर,
पानगल स्कूल गेट जिल्हा परिषद रोड सोलापूर
मो. नं. ९८२२५२६५६५ /९१७५४००४४४



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील जमिन गट नं. ८५९/१ याचे क्षेत्र ०१ हे. ९२ आर, यापैकी उत्तर बाजूचे जमिनीत पडलेल्या प्लॉट पैकी प्लॉट नं. ६ पैकी उत्तर बाजूकडील ०१ आर, याचे क्षेत्र चौ. फुट १०८०, आकार रु. ००-०२ पैसे, याची लांबी पूर्व पश्चिम- ४० फुट, याचे मी. १२.१९, दक्षिण उत्तर रुंदी २७ फुट, याचे मी. ८.२३, सदरचा प्लॉट खुला आहे. याची वागणूक व पाणी पूर्व बाजूने आहे. यासी चतुःसिमा पूर्वेस- २० फुट रुंदीचा जाणेयेण्यासाठी सोडलेला रस्ता, दक्षिणेस- सदर प्लॉट नंबर पैकी राहिलेला भाग, पश्चिमेस- मस्तुद यांची जमिन, व उत्तरेस- प्लॉट नं. ५ येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तदंगभुत वस्तुसह, व वहिवाटीच्या हक्कासह.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही सुषमा शिवाजी काशीद, रा. पाटील प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे स्वसंपादीत खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असून त्यांनी सदर मिळकत त्यांचे कौटुंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत हि निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध निजोखमी खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे.

याही उपर सदर मिळकतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, चोळीबांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्कअधिकार असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रांनिशी व पुराव्यासह खालील नमूद पत्त्यावर हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसात लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आलेस आमचे पक्षकार हे सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहित धरून खरेदी देणार यांचे बरोबर ठरलेल्या अटी व शर्ती प्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

ता. ०५/०६/२०२६

सही/-
**ॲड गणेश मोहन फावडे**
बी.ए. एल.एल.बी
मो.नं. ९५४५१७०४७४
**ॲड. हर्षवर्धन हरिश्चंद्र बोधले**
बी.ए. एल.एल.बी.
मो.नं. ८४५९४७८३३१
अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर
खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट्स



## श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर - अकलूज

### स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव क्रमांक २

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि नियम १९६१ चा नियम क. १०७ (११) (ई) अन्वये मे. विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर - अकलूज, ता. माळशिरस, जि.सोलापूर

तमाम लोकास कळविण्यात येते की, वरील संस्थेच्या विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी जप्त केलेल्या खालील नमुद केलेल्या स्थावर मिळकतींचा जाहीर लिलाव खाली नमुद केलेल्या वेळी नमुद ठिकाणी ठरल्याप्रमाणे केला जाईल. लिलावाच्या शर्ती व अटी लिलावाच्या वेळी वाचून दाखवल्या जातील. तरी गरजुंनी या संधीचा अवश्य फायदा घ्यावा. जादा माहिती श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर - अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत मिळू शकेल.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव जामिनदाराचे नाव | मिळकतदाराचे नाव | मिळकत ठिकाण | मिळकत कमांक | क्षेत्र चौ.मि. हे/आर | ३१/०१/२०२६ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रविण बाळासो साळुंखे<br>दिपक लिंबाजी आवटे<br>राजु संभाजी खिलारे | प्रविण बाळासो साळुंखे | शिवाजीनगर माळेवाडी अ. | ५७/२/ब/१/१ | ०.०२ | ५,०५,८४७/- |
| २ | दिपक रामचंद्र थोपटे<br>दौलत नारायण धुमाळ<br>आयेशा निजाम शेख | सौ. लता दिपक थोपटे | राउतनगर अकलूज | १४८/१/ब/२/ब/२/ब/१ | ०.०१ | १,४७,८९४/- |
| ३ | महेश प्रेमराज जगदाळे<br>प्रेमराज निवृत्ती जगदाळे<br>ज्ञानदेव रामचंद्र कोकाटे | महेश प्रेमराज जगदाळे | राउतनगर अकलूज | १४३/१/ब/२/ब/१ | ०.१० | ५,४८,८४७/- |
| ४ | अनिल राणोजी घोडके<br>अजिनाथ लक्ष्मण पवार<br>सौ. साधना अनिल घोडके | सौ. साधना अनिल घोडके | शंकरनगर अकलूज | ८२/१/अ/८ | ०१.६१.५० चौ.मिटर | ३,५२,२४०/- |
| ५ | भानुदास कुंडलिक धाईंजे<br>नामदेव सिताराम धाईंजे<br>शकिल सत्तार शेख | भानुदास कुंडलिक धाईंजे | कोंडबावी | ५९०/१/१२<br>५९०/१/६ | ०.६४<br>०.३५ | ५,६४,९३७/- |

**लिलावाचे ठिकाण : श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर - अकलूज**
**दिनांक व वेळ : १९/०६/२०२६ सकाळी ११.०० वाजता.**

**टीप:** १. लिलावात भाग घेण्यासाठी बयाणा रक्कम रु.१०,०००/- रोख लिलावापूर्वी भरणा करावी लागेल.
२. लिलावाच्या शर्ती व अटी लिलावापूर्वी वाचून दाखवल्या जातील.
३. कोणतेही कारण न देताही लिलाव रद्द व तहकूब करणेचे अधिकार वसुली अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**ठिकाण : अकलुज**
**दिनांक: ०४/०६/२०२६**

सील

सही/-
**श्री. गोपीचंद अरुण तुकशेट्टी**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**



**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate :** **RAJENDRA VITTHAL RAUT**
3809, Raut Chawl, Ashoknagar, Barshi, Tal. Barshi, Dist. Solapur 413 401

**Name of political party :** **Bharatiya Janata Party**
(Independent candidates should write "independent" here)

**Name of Election :** **Maharashtra Legislative Council from Solapur Local Authorities Constituency**

**Name of Constituency :** **Solapur Local Authorities Constituency**

I **RAJENDRA VITTHAL RAUT**, (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil | Nil |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

**Place : Mumbai**
**Date : 02.06.2026**

Name & Signature of Candidate
**(RAJENDRA VITTHAL RAUT)**



## Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi
## Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi's

**Shivaji Nagar, Barshi Dist Solapur (Maharashtra) 413411**
**E-mail: ssmb_barshi@rediffmail.com**
**AIDED**
**(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)**

Applications are invited for the following **CLOCK HOUR BASIS (CHB)** Posts for the
**Academic Year 2026-27**

| Sr. No. | Course | Subject | Designation | Total No of CHB Posts |
|---|---|---|---|---|
| | | **Humanities Faculty** | | |
| 1. | B.A./M.A | Marathi | Assistant Professor | 02 C.H.B |
| 2. | B.A./M.A | Hindi | Assistant Professor | 06 C.H.B |
| 3. | B.A. | Sanskrit | Assistant Professor | 01 C.H.B |
| 4. | B.A. | Geography | Assistant Professor | 02 C.H.B |
| 5. | B.A. | Music | Assistant Professor | 01 C.H.B |
| | | **Science & Technology Faculty** | | |
| 6. | B.Sc. | Chemistry | Assistant Professor | 04 C.H.B |
| 7. | B.Sc. | Physics | Assistant Professor | 04 C.H.B |
| 8. | B.Sc. | Zoology | Assistant Professor | 02 C.H.B |
| 9. | B.Sc. | Botany | Assistant Professor | 08 C.H.B |
| 10. | B.Sc. | Microbiology | Assistant Professor | 08 C.H.B |
| 11. | B.Sc. | Statistics | Assistant Professor | 04 C.H.B |

1. The above posts are open to all however candidates from any category can apply for the posts.
2. All the above posts are Purely on Temporary Clock Hour Basis for Academic Year 2026-2027 & subject to workload approval of Jt. Director of Education, H.E., Solapur Region, Solapur for Senior College Section.
3. Educational Qualification and other requirements are as prescribed by the UGC Notification dt. 18th July 2018, Govt. of Maharashtra Resolution no. Misc-2018/C.R.56/18UNI-Idts. 8th March 2019 and University Circular No.PAHSUS /Estt/7th pay/2019/2285/dt.25th March 2019.
4. Remuneration of the above posts will be as per Govt. resolution No.संकिर्ण-2018 /(185/18) मशि-3 dated 14th November 2018 and University Circular No. सोविसो/शि.मा./परिपत्रक/2018-19/10949/dtd.24th December 2018 and Govt. Resolution No. संकिर्ण-2021/प्र.क्र.181/2 विशि-1 dated 17th October 2022.
5. Applications with full details should reach to **The Principal, Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi** within 8 days from the date of publication of this advertisement. Incomplete applications will not be entertained.
6. This is University approved advertisement.

**Dr. A. B. Shaikh**, **Principal,** Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi Dist : Solapur.
**Mr. P.T. Patil**, **General Secretary** — **Dr. B.Y.Yadav**, **Chairman**, Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi, Dist: Solapur



**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgement dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party :** **Bharatiya Janata Party**
***Name of Election :** **Maharashtra Legislative Council from Solapur Local Authorities Constituency**
**Name of State/UT :** **Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | Solapur Local Authorities Constituency | RAJENDRA VITTHAL RAUT | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : Solapur Local Authorities Constituency**

**Place : Mumbai**
**Date : 04.06.2026**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation.......
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### जागतिक योगासन स्पर्धेत भारताची सुवर्णमय सुरुवात



**अहमदाबाद** : येथे आयोजित पहिल्या जागतिक योगासन स्पर्धेत यजमान भारताने दमदार कामगिरी केली. या खेळाच्या इतिहासातील सर्वात मोठ्या जागतिक मंचावर आपले वर्चस्व सिद्ध करत, भारताने स्पर्धेतील पहिल्या सहापैकी पाच सुवर्णपदके जिंकली. पश्चिम बंगालच्या अभय बर्मन (वरिष्ठ पुरुष गट) आणि रितू मंडलने (वरिष्ठ महिला गट) पारंपारिक योगासन प्रकारात सुवर्णपदक जिंकून यजमान भारतासाठी विजयाचा पाया रचला. बर्मनने ६३.४२ गुणांसह जागतिक योगासन स्पर्धेतील भारताचे पहिले सुवर्णपदक जिंकले. त्याने इंडोनेशियाच्या अर्कान रियांतोने रौप्यपदक, तर उझबेकिस्तानच्या ॲलनने ५३.२१ कांस्यपदक पटकावले. त्यानंतर रितू मंडलने वरिष्ठ महिला गटात भारतासाठी आणखी एक सुवर्णपदक जिंकले; तिने ६४.३३ गुण मिळविले. वरिष्ठ ए पुरुष गटात सिंगापूरच्या नॅथॅनिएल टॅन लिओंग ॲनने अव्वल स्थान पटकावून भारताची सर्व सुवर्णपदके जिंकण्याची कामगिरी रोखली. टांझानियाच्या करिमू स्वाफीने रौप्य, तर भारताच्या सुमीर ग्रावालीने ५४.०० गुणांसह कांस्यपदक मिळवले.

### तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील भारत अ संघ श्रीलंकेत दाखल

**डाम्बुला** : आगामी ९ ते २१ जून या कालावधीत रंगिरी डाम्बुला आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणाऱ्या ५० षटकांच्या तिरंगी मालिकेसाठी तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील भारत अ संघ श्रीलंकेत दाखल झाला आहे. भारत अ संघ ९ जून रोजी यजमान श्रीलंका अ संघाविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. या स्पर्धेत अफगाणिस्तान अ हा तिसरा संघही सहभागी असेल. स्पर्धेचा अंतिम सामना २१ जून रोजी खेळविला जाणार आहे. श्रीलंका क्रिकेटने वर्मा, वैभव सूर्यवंशी, ऋतुराज गायकवाड व अनुकूल रॉयच्या श्रीलंकेतील आगमनाचे फोटो समाज माध्यमावर सामायिक केले आहेत. येथे होणाऱ्या तिरंगी मालिकेसाठी भारत अ संघ श्रीलंकेत दाखल झाला आहे. आपली कौशल्ये दाखवण्यासाठी आणि एका रोमांचक स्पर्धेत भाग घेण्यासाठी हे खेळाडू सज्ज आहेत. चला, खेळाला सुरुवात करूया, असे श्रीलंका क्रिकेटने शुक्रवारी आपल्या समाज माध्यम खात्यावर लिहिले. श्रीलंकेत येण्यापूर्वी भारत अ संघात दोन महत्त्वाचे बदल करण्यात आले. अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेसाठी हर्ष दुबेची कसोटी व एकदिवसीय संघात निवड झाल्यामुळे त्याच्या जागी अनुकूल रॉयचा संघात समावेश करण्यात आला. त्यानंतर, दुखापतीमुळे रियान पराग स्पर्धेतून बाहेर पडल्याने ऋतुराज गायकवाडची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली. राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व करताना आयपीएल २०२६ च्या उत्तरार्धात दुखापतीचा त्रास सहन करणाऱ्या परागवर आता बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये उपचार केले जाणार आहे. भारत अ संघात वर्मा, गायकवाड आणि अंशुल कम्बोज यांसारखे भारतासाठी यापूर्वी खेळलेले (कॅप्ड) खेळाडू आहेतच; त्यासोबतच सूर्यवंशी, प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंग, आयुष बदोनी आणि निशांत सिंधू हे खेळाडूही या तिरंगी मालिकेत आपली छाप पाडण्याचा प्रयत्न करतील. तसेच, ऋषिकेश कानिटकर, सुनील जोशी, लक्ष्मीपती बालाजी आणि शुभदीप घोष हे या तिरंगी मालिकेसाठी इंडिया अ संघाचे प्रशिक्षक असतील.

### राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत सृष्टी गवळीला सुवर्णपदक

**सोलापूर, दि. ५ जून-**



मध्यप्रदेशात झालेल्या वरिष्ठ महिला गटाच्या १९व्या राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला संघाने सुवर्ण पदक पटकाविले. यात येथील दमाणी विद्या मंदीरच्या सृष्टी सुनील गवळी हिचा समावेश होता. तिला क्रीडा शिक्षक पवन भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती यांनी अभिनंदन केले.

### सूर्यकुमारला टी-२० कर्णधारपदावरून हटवणे योग्य ठरणार नाही : प्रसाद

**नवी दिल्ली, ५ जून**

सध्याच्या टप्प्यावर सूर्यकुमार यादवला भारतीय टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून हटवणे योग्य ठरणार नाही; त्याऐवजी निवडकर्त्यांनी आतापासूनच तरुण नेतृत्वाला घडविण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे मत भारताचे माजी यष्टिरक्षक आणि मुख्य निवडकर्ता एमएसके प्रसाद यांनी व्यक्त केले.

# कुमार गटाच्या विजेतेपदासाठी धाराशिव-मुंबई उपनगर आमनेसामने

## ५२ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा : मुलींच्या गटात गतविजेत्या सांगलीसमोर ठाण्याचे आव्हान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जून (स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडा नगरीतून) :**

कुमार-मुली गटाच्या ५२ व्या राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत अंतिम फेरीचे चित्र स्पष्ट झाले असून कुमार गटात सलग दोन वर्षांचे विजेते धाराशिव आणि मुंबई उपनगर यांच्यात विजेतेपदासाठी थरारक लढत रंगणार आहे. सलग तिसरे विजेतेपद पटकावून हॅट्रिक साधण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या धाराशिवकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे मुलींच्या गटात गतविजेत्या सांगली आणि ठाणे यांनी पुन्हा एकदा अंतिम फेरी गाठत गेल्या वर्षीच्या अंतिम सामन्याची पुनरावृत्ती घडवून आणली आहे. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन आणि किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे.

**यजमान सोलापूर पराभूत**

कुमार गटातील पहिल्या उपांत्य फेरीत यजमान आणि गत उपविजेता सोलापूर संघाने मध्यंतरापर्यंत मुंबई उपनगरला १८-१८ अशा बरोबरीत रोखून धरले होते. मात्र उत्तरार्धात मुंबई उपनगरने अचूक डावपेच राबवत ४२-४० असा निसटता पण मोलाचा विजय मिळवून अंतिम फेरीत धडक मारली. सोलापूरकडून रोहन माने (१.१० मि. संरक्षण व १४ गुण), ओम लांडगे (२, १.१० मि. संरक्षण व ४ गुण) आणि अकबर शेख (२.१०, १.०० मि. संरक्षण व २ गुण) यांनी झुंजार खेळ केला; मात्र त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. विजयी मुंबई उपनगरकडून समर्थ सावंत (२ मि. संरक्षण व ८ गुण), साहिल वासनिक (६ गुण), प्रशांत सर्जेराव (६ गुण) आणि आर्यन चव्हाण (१, १.५० मि. संरक्षण) यांनी संघाच्या विजयात निर्णायक योगदान दिले.

**धाराशिवने पुण्याचे आव्हान परतविले**

दुसऱ्या उपांत्य सामन्यात सलग दोन वर्षांचे विजेते धाराशिव यांनी पुण्याचा ३३-२८ असा २.५० मि. राखून पराभव करत अंतिम फेरी गाठली.



**सोलापूर : सोलापूरची आक्रमक सांगलीच्या संरक्षकास बाद करण्याचा प्रयत्न करतानाचा टिपलेला क्षण. (छाया : केवल तिवारी)**

धाराशिवच्या विजयात हरद्या वसावे (१.५०, १.३० मि. संरक्षण) याने संरक्षणात भक्कम कामगिरी केली, तर महेश पाडवी (१.१०, नाबाद १.१० मि. संरक्षण व ६ गुण) आणि जितेंद्र वसावे (२.३० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी अष्टपैलू खेळ करत संघाचा विजय निश्चित केला. पुण्याकडून यशराज बनसोडे (८ गुण), समर्थ चव्हाण (१.४० मि. संरक्षण व ४ गुण) आणि अद्वैत बेत (१.१०, १.३५ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी कडवी झुंज दिली; मात्र धाराशिवच्या अनुभवापुढे त्यांची सरशी झाली नाही.

**ठाण्याचा धाराशिववर दणदणीत विजय**

मुलींच्या गटातील पहिल्या उपांत्य फेरीत ठाणे संघाने मध्यंतरातच २२-१३ अशी भक्कम आघाडी घेत धाराशिवचा ३८-२७ असा ११ गुणांनी दणदणीत पराभव केला. ठाण्याकडून धनश्री कंक (३.२७, २.०६ मि. संरक्षण व ४ गुण) आणि निधी जाधव (२.१० मि. संरक्षण व ६ गुण) यांनी अष्टपैलू खेळ साकारला, तर वैष्णवी जाधव हिने आक्रमणात तब्बल १० गुण मिळवत प्रतिस्पर्ध्यांवर दबाव निर्माण केला. धाराशिवकडून मैथिली पवार (१.३७, २.१६ मि. संरक्षण व २ गुण) हिने अष्टपैलू प्रयत्न केले, तर स्वरांजली थोरात आणि सृष्टी सुतार यांनी प्रत्येकी ६ गुण मिळवले; मात्र संघाला पराभव टाळता आला नाही.

**सांगलीने सोलापूरला नमविले**

दुसऱ्या उपांत्य फेरीत गतविजेत्या सांगलीने यजमान सोलापूरचा २५-१९ असा ५.३० मि. राखून ६ गुणांनी दणदणीत पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. सांगलीकडून वेदिका तामखेडे (४ मि. संरक्षण व २ गुण), अनुष्का तामखेडे (२ मि. संरक्षण व ६ गुण) आणि भवरम्मा होटगी (१.१० मि. नाबाद, २.३० मि. संरक्षण व ६ गुण) यांनी शानदार कामगिरी बजावत विजयाचा पाया रचला. सोलापूरकडून अश्विनी मांडवे (१.२५ मि. संरक्षण व ४ गुण), प्राजक्ता बनसोडे (१ मि. संरक्षण व ४ गुण) आणि कल्याणी लामकाने (१.५० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी संघर्ष केला; मात्र सांगलीच्या भक्कम खेळापुढे त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले.

**अंतिम फेरीकडे राज्याचे लक्ष**

कुमार गटात धाराशिव विरुद्ध मुंबई उपनगर हा सामना विशेष आकर्षणाचा ठरणार असून धाराशिवला सलग तिसऱ्या विजेतेपदाची सुवर्णसंधी आहे. तर मुलींच्या गटात सांगली विरुद्ध ठाणे ही लढत गतवर्षीच्या अंतिम सामन्याची पुनरावृत्ती ठरणार असल्याने चुरस शिगेला पोहोचणार आहे. दोन्ही गटांतील विजेतेपदाच्या लढतींनी स्पर्धेचा उत्कर्षबिंदू गाठला असून खो-खोप्रेमींना उच्च दर्जाच्या खेळाची मेजवानी मिळणार आहे.

## एन.जी. रेड आणि ब्ल्यू संघांचे शानदार विजय

### साऊथ सोलापूर आपटे ग्रुप चषक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून -**

साऊथ सोलापूर आपटे ग्रुप चषक क्रिकेट स्पर्धेत एन.जी. क्रिकेट क्लब रेड आणि ब्ल्यू या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत प्रेक्षणीय विजय नोंदवले.

पहिल्या सामन्यात एन.जी. क्रिकेट क्लब रेड संघाने एन.जी. क्रिकेट क्लब ब्ल्यू संघाचा २३० धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. ब्ल्यू संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र, रेड संघाच्या फलंदाजांनी आक्रमक खेळ करत धावांचा डोंगर उभारला. एन.जी. रेडने प्रथम फलंदाजी करताना ७ बाद ४१५ धावांची अवाढव्य धावसंख्या उभारली. यामध्ये रणबीर मुंब्रा (१०८) आणि हर्ष राऊत (१०२) यांनी शानदार शतकी खेळी केली. त्याला अभिजीत सरवदे (६५) आणि अनुज मुंदडा (५४) यांनी अर्धशतकी योगदान देऊन उत्तम साथ दिली. ब्ल्यू संघाकडून गोलंदाजीत अनुज वाल्मिकी आणि श्रवण माळी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

४१६ धावांच्या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना एन.जी. क्रिकेट क्लब ब्ल्यूचा संघ ६ बाद १८५ धावांपर्यंतच मजल मारू शकला. ब्ल्यूकडून आर्यन हंगे याने ६५ धावांची झुंजार खेळी केली, तर श्लोक आनंदने २४ धावा केल्या. रेड संघाकडून गोलंदाजी करताना अनिश बरोडीने २ आणि आदित्य चटकेने १ बळी मिळवला. शानदार शतकी खेळी करणाऱ्या रणबीर मुंब्रा याला सामनावीर घोषित करण्यात आले.

दुसऱ्या अटीतटीच्या सामन्यात साऊथ सोलापूर ब्ल्यू संघाने हाय परफॉर्मन्स संघाचा २० धावांनी पराभव करत शानदार विजय मिळवला. साऊथ सोलापूर ब्ल्यूने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. जय गुंडच्या १०२ धावांच्या शतकी खेळीच्या जोरावर साऊथ सोलापूर ब्ल्यू संघाने सर्वबाद १९९ धावांचे आव्हान उभे केले. अनिश मुळे याने २४ धावांचे योगदान दिले. हाय परफॉर्मन्स संघाकडून गोलंदाजी करताना पारस घाट याने ३, तर सार्थक रणशिंग याने २ बळी घेतले.

१९९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना हाय परफॉर्मन्स संघाचा डाव १७९ धावांवर संपुष्टात आला. त्यांच्याकडून संदेश गाडे याने ६७ धावांची अर्धशतकी खेळी केली, तर अभिषेक देशमुखने २४ धावा केल्या. साऊथ सोलापूर ब्ल्यूच्या अनिश मुळे याने भेदक गोलंदाजी करत ५ बळी घेतले आणि हाय परफॉर्मन्सच्या डावाला वेसण घातली. त्याला जय गुंडने २ बळी घेत उत्तम साथ दिली. १०२ धावांची शतकी खेळी आणि २ बळी घेणाऱ्या जय गुंड याला त्याच्या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीसाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

## लॉयन्स व किंग्स विजयी; एन.जी. ॲकॅडमी क्रिकेट स्पर्धा

### गणेश पवार व यश पवार सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

येथील निलेश गायकवाड ॲकॅडमीच्या वतीने पुष्प जिमखाना, डोणगाव येथे सुरू असलेल्या इंटर क्लब क्रिकेट स्पर्धेत लॉयन्स आणि किंग्स संघांनी आपापल्या सामन्यात विजय मिळवला.





लॉयन्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ३० षटकात सर्वबाद १७२ धावा केल्या. यात रणवीर सिंग बोमरा याने (५१) अर्धशतक झळकावले. हर्ष राऊतने ३२, आशिष बाबरेने १९, सुजल गायकवाड आणि आर्यन भूमकर यांनी प्रत्येकी १३ धावा केल्या. किंग्सकडून श्रवण माळीने २६ धावांत ३, तर यशराज टेकाळेने ३१ धावांत २ बळी घेतले. कबीर कीर्तीकर व अभिजीत सरवदे यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना किंग्स संघ २२.२ षटकात १४६ धावांवर सर्वबाद झाला. किंग्सकडून अभिजीत सरवदेने ३३, यश पवारने २३, आफन शेखने १८ आणि आदित्य गाडेने १४ धावा केल्या. लॉयन्सकडून गणेश पवारने ३५ धावांत ४, तर अनिष बिरोळीने ३६ धावांत ३ बळी घेत किंग्सचा डाव गुंडाळला. सुरज थोरात आणि आर्यन भुमकर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. हा सामना लॉयन्स संघाने २६ धावांनी जिंकला. गणेश पवार याला सामनावीर व उत्कृष्ट गोलंदाज, तर रणवीर सिंग बोमरा याला उत्कृष्ट फलंदाज पुरस्कार देण्यात आला.

दुपारच्या सत्रात किंग्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २५ षटकात ८ बाद १६४ धावा केल्या. यात अभिजीत सरवदेने ३०, प्रवीण बेळणाकरने २३ आणि आदित्य गाडेने १८ धावा केल्या. ईगल्सकडून श्लोक आनंदने ७ धावांत २ बळी घेतले. गौरव गाडेकर, चेतन मंडेलो, आर्यन हंगे व अनुज वाल्मिकी यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

त्यानंतर फलंदाजीला उतरलेल्या ईगल्स संघाचा डाव २५ षटकात १६० धावांवर मर्यादित राहिला. त्यामुळे किंग्स संघाने ४ धावांनी विजय मिळवला. ईगल्सकडून श्रवण म्हेत्रेने नाबाद ४३, आर्यन हांगेने २० आणि सोहम कुलकर्णीने १७ धावा केल्या. किंग्सकडून विराज पांढरेने २८ धावांत ३, श्रवण माळीने १९ धावांत २ आणि यश पवारने ३१ धावांत २ बळी घेतले. यश पवार याला सामनावीर व उत्कृष्ट गोलंदाज, तर श्रवण म्हेत्रे याला उत्कृष्ट फलंदाज म्हणून गौरवण्यात आले. या सामन्यांसाठी पंच म्हणून प्रवीण कुलकर्णी व साकिब सय्यद यांनी काम पाहिले. गुणलेखन व समालोचन वीरभद्र कोळी यांनी केले.

# श्री स्वामी समर्थ अक्कलकोट अॅकॅडमी, साऊथ सोलापूर आपटे ब्ल्यू संघांची विजयी घोडदौड

### रेल्वेची ७९वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जून-**

येथे सुरू असलेल्या ७९ व्या रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत श्री स्वामी समर्थ अक्कलकोट क्रिकेट अकॅडमी आणि साऊथ सोलापूर आपटे ब्लू या संघांनी आपापल्या सामन्यांत शानदार विजय नोंदवले.





पहिल्या सामन्यात सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट ब संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना श्री स्वामी समर्थ क्रिकेट अकॅडमीने १७.२ षटकांत सर्वबाद १३३ धावा केल्या. यामध्ये विश्वास कुंभार याने ६७ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याला तेजस जगताप (२४) आणि साहिल शेख (१६) यांनी चांगली साथ दिली. सेंट्रल रेल्वे बी कडून गोलंदाजीत सतपाल सिंगने उत्कृष्ट कामगिरी करत ४ षटकांत १८ धावा देऊन ४ बळी घेतले. तसेच संदीप शरण, विजय गाडेकर आणि विक्रम माने यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

१३४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट ब संघाचा डाव १२.१ षटकांत अवघ्या ५८ धावांवर आटोपला. संघाकडून विक्रम माने याने सर्वाधिक २५ धावा केल्या, तर श्रीकांत खोत आणि सतपाल सिंग यांना प्रत्येकी ४ धावाच करता आल्या. अक्कलकोट अकॅडमीच्या जफर आतार याने ३ षटकांत ८ धावा देत ४ बळी, तर विश्वास कुंभारने ३ षटकांत १० धावा देत ३ बळी घेत रेल्वेच्या डावाला खिंडार पाडले. विठ्ठल गुंठे याने २ आणि संकेत गायकवाडने १ बळी घेतला. हा सामना श्री स्वामी समर्थ अक्कलकोट अकॅडमीने ७५ धावांनी जिंकला. ६७ धावा आणि ३ बळी घेणाऱ्या विश्वास कुंभारला सामनावीर घोषित करण्यात आले. सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूटचे सेक्रेटरी किशोर पिल्ले यांच्या हस्ते त्याला पुरस्कृत करण्यात आले. याप्रसंगी श्रावण चीट्ट्यालकर, विक्रांत पवार, वैभव इराबत्ती आणि वासुदेव धोरणाल उपस्थित होते. या सामन्यासाठी मझर मंगोली व किरण डिगगे यांनी पंच म्हणून तर सचिन गायकवाड यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

दुसऱ्या सामन्यात के पी क्रिकेट ॲकॅडमीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली. प्रथम फलंदाजी करताना साऊथ सोलापूर आपटे ब्लू संघाने निर्धारित २० षटकांत ७ बाद १८२ धावांचा विशाल धावसंख्या उभारली. आयपीएल स्टार खेळाडू अरशीन कुलकर्णीने ६७ धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर नारायण डोके याने नाबाद ४३, मंदार काळे याने २५ आणि आमिर खान याने १४ धावा केल्या. के पी सी ए कडून यश मंगरूळेने २ आणि दिनेश शिंगाडेने २ बळी घेतले, तर ओंकार कोरेला १ बळी मिळाला.

१८३ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना के पी क्रिकेट ॲकॅडमीचा संघ २० षटकांत ९ बाद ९६ धावाच करू शकला. संघाकडून गौरीप्रसाद स्वामीने ३२, आदित्य बिराजदारने १५ आणि यश मंगरूळेने १२ धावा केल्या. साऊथ सोलापूर आपटे ब्लू संघाच्या बाळकृष्ण काशीदने भेदक गोलंदाजी करत ४ षटकांत १२ धावा देऊन हॅट्रिकसह ५ बळी घेतले आणि के पी सी ए च्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. अतुल चौधरी आणि नारायण डोके यांनी प्रत्येकी १ बळी घेतला, तर सौरभ चाकोते आणि अजय कोळी यांनी १-१ बळी मिळवला. साऊथ सोलापूर आपटे ब्लू संघाने हा सामना ८६ धावांनी जिंकला.

हॅट्रिकसह ५ बळी घेणाऱ्या बाळकृष्ण काशीद याला कै. सुरेश मालप यांच्या स्मरणार्थ ( सुदेश मालप व सुनील मालप पुरस्कृत) सामनावीर ट्रॉफी देऊन विक्रांत पवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या सामन्यासाठी महेश सोनवणे व मोहित दिकोंडा यांनी पंच म्हणून काम पाहिले.

**अर्शीन कुलकर्णीचा विशेष सत्कार**

आयपीएलचे सामने संपवून वेळात वेळ काढून सोलापूरमधील या मानाच्या स्पर्धेत सहभाग नोंदवून उत्कृष्ट खेळ केल्याबद्दल, मध्य रेल्वे इन्स्टिटयूट कमिटीकडून इंडियन रेल्वेचे खेळाडू लियाकत शेख यांच्या हस्ते अर्शीन कुलकर्णी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी विक्रम माने, राजेश बंब उपस्थित होते.

**आजचा सामना**

**सकाळी** : विजापूर क्रिकेट क्लब विरुद्ध मॉडेल क्रिकेट अकॅडमी.

## मॉडेल क्रिकेट अकॅडमी उपांत्य फेरीत

### विजय ट्रॉफी क्रिकेट: सुधान्व मणुर सामनावीर

**सोलापूर, दि. ५ जून-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर खेळवल्या गेलेल्या विजय ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अकॅडमी ए संघाने साऊथ सोलापूर रेड संघाचा १० गडी राखून एकतर्फी पराभवकरीत उपांत्य फेरीत धडक मारली आहे. घातक आणि किफायतशीर गोलंदाजी करणाऱ्या सुधान्व मणुर याला सामनावीर घोषित करण्यात आले.



साऊथ सोलापूर रेड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, मॉडेल अकॅडमीच्या भेदक गोलंदाजीसमोर त्यांचा हा निर्णय चुकला. साऊथ सोलापूरचा संघ ३१.४ षटकांत अवघ्या १३१ धावांवर सर्वबाद झाला. त्यांच्याकडून विश्वनाथ मुंडे याने ४८ चेंडूंत सर्वाधिक ४२ धावा केल्या. मॉडेल अकॅडमीचा गोलंदाज सुधान्व मनूर याने अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत साऊथ सोलापूरच्या फलंदाजीचे कंबरडे पाडले. त्याने २४ धावा देऊन ४ महत्त्वपूर्ण बळी घेतले. त्याला कर्णधार अक्षय हावळे याने ९ धावात २ बळी मिळवून साथ दिली. १३२ धावांचे माफक आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या मॉडेल क्रिकेट अकॅडमीच्या सलामीवीरांनी मैदानावर चौफेर फटकेबाजी केली. अवघ्या ९ षटकांत (५४ चेंडू) एकही गडी न गमावता १३५ धावा कुटून मॉडेल अकॅडमीने हा सामना अवघ्या काही वेळातच खिशात घातला. सलामीवीर विवेक अनची याने अवघ्या ३२ चेंडूंत १४ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ७३ धावांची स्फोटक नाबाद खेळी केली. तर कर्णधार अक्षय हावळे याने २३ चेंडूंत ७ चौकार आणि ४ षटकारांसह ५६ धावांची धडाकेबाज नाबाद खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची शोकसांत्वनपर भेट

**सोलापूर, दि. ५ जून-**
माजी केंद्रीय गृहमंत्री व ज्येष्ठ काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूर शहरातील विविध ठिकाणी भेटी देत नुकत्याच निधन झालेल्या मान्यवरांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यांनी माजी खासदार गंगाधरपंत कुचन, माजी नगरसेवक प्रवीण निकाळजे, माजी महापौर आरिफ शेख व माजी नगरसेवक तौफिक शेख यांच्या कुटुंबीयांची भेट घेत दुःखात सहभागी असल्याची भावना व्यक्त केली. तसेच माजी परिवहन समिती सभापती बसवराज म्हेत्रे यांच्या मातोश्रींच्या निधनाबद्दल शोकसंवेदना व्यक्त केल्या. ज्येष्ठ कवी माधव पवार यांच्या निधनाबद्दलही पवार कुटुंबीयांची भेट घेऊन श्रद्धांजली अर्पण केली. सर्व दिवंगत आत्म्यांना चिरशांती लाभो आणि कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ मिळो, अशी प्रार्थना शिंदे यांनी केली. यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार, नगरसेवक नरसिंह आसादे, तिरुपती परकीपंडला, अमृतदत्त चिन्नी, मीराताई घटकांबळे, श्रीधर काटकर, संजय गायकवाड, सुमन जाधव, सुभाष वाघमारे, उमेश मामड्याल, अँड जहिर सगरी, साई शिंदे आदी उपस्थित होते.








### जेईईमध्ये लॉजिक इन्स्टिट्यूटचा गौरव

**सोलापूर, दि. ५ जून-**
लॉजिक इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी JEE Advanced २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत सोलापूरमध्ये आपली वेगळी ओळख पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. यावर्षी संस्थेचे ५ विद्यार्थी IIT प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. गौरव काळे यांनी All India Rank (AIR) ७६८८ मिळवत सोलापूरमध्ये तिसरे क्रमांक प्राप्त केले, तर आदित्य कामतकर यांनी All India Rank (AIR) ९२५० मिळवत चौथे क्रमांक पटकावले. तसेच कृष्णाई काबडे (General Rank २५१९५), स्नेहा गंभीरे (General Rank २६१०२) आणि तनिष्क शिंदे (Category Rank ७९४४) यांनीही IIT प्रवेशासाठी पात्रता मिळवली.




### अकलूज परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने प्रचंड नुकसान

**अकलूज, दि.५ जून**
शुक्रवार दि. ५ जून रोजी दुपारी ५-३० च्या दरम्यान अकलूज व परिसरात वादळी वाऱ्याला सुरुवात झाली. सुमारे ७० किमी वेगाने वारे वाहिल्याने धुळीचे प्रचंड लोट उडाले. त्यानंतर १५ मिनिटे पाऊस पडला. या वादळी वाऱ्यामुळे परिसरात शेती पिकांचे, झाडांचे खूप नुकसान झाले. ग्रुप क्रीडा संकुलजवळील मोठ्या वृक्षांची फांद्या तुटून वाहतुकीस अडचण झाली तर रस्त्यावर विद्युत तारा पडल्याने विद्युत पुरवठा बंद झाला. सुमारे अर्धा तास वादळी वारे व हलक्या पावसाच्या सरी यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. कारखान्यातील कामगार सुट्टी झाल्याने घरी चाललेले व क्रीडा संकुल वर व्यायामासाठी व फिरण्यासाठी आलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली. जेष्ठ नागरिकांना आडोशाला उभा राहून सहारा घ्यावा लागला. शंकरनगरचा शुक्रवारी बाजार असतो सायंकाळी पाच वाजता भरू लागतो तो रात्री उशिरापर्यंत चालतो. मात्र नेमका वादळी वारा व पावसांच्या तडाख्याने व्यापारी वर्गांचे व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले. उभा केलेले शेड पाले वाऱ्याने उडून गेली. त्यामुळे ग्राहक आणि व्यापारी शेतकऱ्यांची भलतीच तारांबळ उडाली. रात्री उशिरापर्यंत वीज पुरवठा सुरू झाला नाही या वादळी वाऱ्याचा तडाखा डाळिंब आंबा पपई केळी फळबागांना बसला आहे.

## निधन वृत्त...

### विजयकुमार जगताप



**सोलापूर, दि. ५ जून-**
येथील रहिवासी विजयकुमार पांडुरंग जगताप, वय ७८ वर्षे, यांचे दि. ५ जून २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. ते महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्यवस्थापक योगेश जगताप यांचे वडील होत.

### छाया फपाळ



**बार्शी दि. ५ जून-**
सौ. छाया गोकुळ फपाळ (वय ५८) वर्ष यांचे आज पहाटे ३ च्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. बार्शीतील प्रसिद्ध खारमु-याचे व्यापारी रामेश्वर गोकुळ फपाळ यांच्या त्या मातोश्री होत्या. सकाळी ११ वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### विवेक राजोपाध्ये



**सोलापूर, दि. ५ जून-**
विवेक माधव राजोपाध्ये (वय ६३) यांचे गुरुवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर रुपाभवानी हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित दोन मुली, नाती असा परिवार आहे. उद्योगवर्धिनी संस्थेच्या सचिवा मेधा राजोपाध्ये यांचे ते पती होत.

# उमेदवारीबद्दल राऊत यांचा परिचारकांकडून सत्कार

## राजकीय घडामोडींना वेग; पंढरपूर येथे घरी जात राऊतांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ५ जून -**
आगामी सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात महत्त्वाची घटना घडली. भाजपकडून विधान परिषदेची उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी आज पंढरपूर येथे माजी आमदार प्रशांत परिचारक यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली. तसेच त्यांचा सत्कारही केला.

प्रशांत परिचारक यांनी राजेंद्र राऊत यांचे मनापासून स्वागत केले आणि आगामी निवडणुकीत दैदिप्यमान यशासाठी त्यांना शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करत शुभेच्छा दिल्या. भेटीदरम्यान युटोपियन साखर कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच भाजपचे पंढरपूरमधील अनेक आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका आणि प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विविध विषयांवर सविस्तर चर्चा

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर झालेल्या या पहिल्याच भेटीत आगामी विधान परिषद निवडणुकीच्या रणनीतीबाबत सविस्तर खल झाला. यासोबतच सोलापूर जिल्ह्यातील विविध सामाजिक, राजकीय आणि स्थानिक विकासात्मक मुद्द्यांवर दोन्ही नेत्यांमध्ये सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली. स्थानिक स्वराज्य संस्थेतील सर्व मतदारांना सोबत घेऊन ही निवडणूक बहुमताने कशी जिंकता येईल, याबाबतही प्राथमिक चाचपणी करण्यात आल्याचे समजते.

दोन्ही ज्येष्ठ नेत्यांच्या एकत्र येण्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह पहायला मिळाला. सदिच्छा भेटीमुळे सोलापूर जिल्ह्यातील महायुती आणि भाजपची ताकद अधिक मजबूत झाल्याचे चित्र असून, आगामी निवडणुकीच्या दृष्टीने ही भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

# समाधान समारोहची ऑगस्टमध्ये होणार सांगता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. ५ जून-**
न्यायप्रक्रियेत सहभाग आणि न्याय आपल्या दारी या संकल्पनेला मुर्त रूप देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने समाधान समारोह या उपक्रमाचे आयोजन केले आहे. उपक्रमास २१ एप्रिलपासून प्रारंभ झालेला असून, दि. २१,२२ आणि २३ ऑगस्ट रोजी विशेष लोक अदालतीमध्ये समारोप होणार आहे. लोक अदालतीमध्ये सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरणे तडजोडीसाठी ठेवणार आहेत. जिल्हयातील पक्षकारांची प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्यास व ती तडजोडीने मिटावीत, अशी ज्यांची इच्छा असेल ती प्रकरणे विशेष लोकअदालतीमध्ये ठेवता येतील. लोकअदालतीमध्ये पक्षकार प्रत्यक्ष किंवा आभासी पध्दतीने सहभागी होउ शकतात. प्रकरणे या विशेष लोकअदालतीमध्ये ठेवण्यासाठी संबंधित विधीज्ञांना कल्पना द्यावी किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर किंवा तालुका विधी सेवा समितीकडे संपर्क साधावा,



असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सुनिल शिंदे यांनी केले आहे. साध्या व सोप्या पध्दतीने वाद मिटवता येतो. झालेल्या तडजोडीच्या निवाडा अंतिम व अंमलबजावणी होऊ शकणारा असतो. वेळेची व पैशाची बचत होते. तडजोड झाल्यास न्यायालयीन शुल्क परत मिळते.

### भांडेगावात एकता महिला मंचकडून वृक्षारोपण व संगोपनाची सामूहिक शपथ

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ५ जून-**
जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आज, दिनांक ५ जून रोजी बार्शी तालुक्यातील भांडेगाव येथे एकता महिला मंचच्या महिला सदस्यांनी एकत्र येत आपापल्या घरासमोरील मोकळ्या परिसरात वृक्षारोपण केले. झाडाचे मुलाप्रमाणे संगोपन करण्याची सामूहिक शपथही घेतली. या प्रसंगी एकता महिला मंचच्या स्वाती शिंदे, स्वाती मंडलिक, दामिनी मंडलिक, आशा मंडलिक, पुजा मंडलिक यांच्यासह गावातील इतर महिला सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिलांनी केवळ औपचारिकता म्हणून वृक्षारोपण न करता, ''झाडे लावा, झाडे जगवा'' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला.

# निकृष्ट कामांवरून पांगरी ग्रामसभेत राडा

- अंडरग्राऊंड गटार, फुटलेली चेंबर्स व निकृष्ट रस्त्यांवरुन वाद
- ग्रामसभेत धरपकडीचा प्रकार

## माजी सरपंच पती आणि ग्रामस्थांमध्ये हाणामारी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ५ जून -**
तालुक्यातील पांगरी येथे शुक्रवार दि. ५ जून रोजी झालेल्या ग्रामसभेत विकास कामांच्या मुद्द्यावरुन मोठा राडा निर्माण झाला. अंडरग्राऊंड गटार योजना, फुटलेली चेंबर्स तसेच गावातील निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांबाबत ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवरुन वाद वाढत जाऊन माजी सरपंच पती आणि तक्रारदार ग्रामस्थ यांच्यात हाणामारी व हमरीतुमरीचा प्रकार घडला.

ही घटना पांगरी येथील हनुमान मंदिर सभागृहात आयोजित ग्रामसभेदरम्यान घडली. ग्रामसभेस सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

सभेदरम्यान तक्रारदार ग्रामस्थांनी गावातील अंडरग्राऊंड गटार योजनेच्या कामांबाबत,



अनेक ठिकाणी फुटलेल्या चेंबर्सबाबत आणि निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. या विषयांवर चर्चा सुरु असताना उपस्थितांमध्ये शाब्दिक वाद निर्माण झाला. काही वेळातच हा वाद चिघळून माजी सरपंच पती आणि काही ग्रामस्थ यांच्यात थेट धरपकड व हाणामारीपर्यंत पोहोचला.

अचानक घडलेल्या या प्रकारामुळे ग्रामसभेचे वातावरण काहीकाळ तणावपूर्ण बनले. उपस्थित ग्रामस्थ आणि पदाधिकाऱ्यांनी मध्यस्थी करत परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यानंतर ग्रामसभा पुढे सुरु ठेवण्यात आली.

दरम्यान या घटनेप्रकरणी कोणतीही पोलीस तक्रार दाखल केली नसल्याची माहिती समोर आली आहे. मात्र ग्रामस्थांनी विकास कामांमध्ये पारदर्शकता राखावी, कामांचा दर्जा सुधारावा आणि तक्रारींची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी ग्रामसभेत केली. या घटनेमुळे गावातील निकृष्ट विकास कामांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण झाला आहे.

### अंबरीश मिश्र यांना 'कलास्वाद पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. ५ जून -**
श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर यांच्यावतीने नाट्य चित्रपट संगीत अशा विविध विषयांवर सातत्याने लेखन केल्याबद्दल पत्रकार अंबरीश मिश्र यांना 'कलास्वाद पुरस्कार देण्यात येणार आहे. समारंभानंतर सोलापूर फिल्म सोसायटीच्यावतीने श्रेष्ठ संगीतकार मदन मोहन यांच्या गाण्यावरचा दृकश्राव्य कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याचं निरुपण अंबरीश मिश्र करणार आहेत. कार्यक्रम वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात रविवार दि. ७ जून रोजी सायंकाळी ६ वाजता होत आहे. श्रोत्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर व सोलापूर फिल्म सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नवनीत तोष्णीवाल यांनी केले आहे.

# रोहिणी पाराध्ये मृत्यू प्रकरणाचा तपास अद्यापही गुलदस्त्यातच

### पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी लक्ष घालण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ५ जून -**
ब्रह्मपुरी येथील रीलस्टार रोहिणी पाराध्ये हिच्या आत्महत्या प्रकरणाच्या तपासाचा उलगडा अद्यापही पोलिसांना झाला नाही. परिणामी तपासच संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मयत रोहिणीच्या आई-वडीलांनी मंगळवेढा पोलिस स्टेशनचे उंबरठे झिजवूनही पोलीसांनी गुन्हा दाखल करण्यास साफ नकार दिल्याने रोहिणीला खरा न्याय मिळणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनीच या प्रकरणात लक्ष घालून मयत रोहिणीस न्याय मिळवून द्यावा अशी कुटूंबियाची मागणी आहे.

रोहिणी पाराध्येचे लाखो फॉलोअर्स आहेत. तिने आत्महत्या केल्यानंतर फॉलोअर्समधून नेहमी हसतखेळत असणाऱ्या रोहिणीने अचानक गळफास का घेतला? असा प्रश्न विचारला जात आहे. रोहिणीने आत्महत्या केलेल्या हॉटेलमध्ये ती व तिचा पती हे दोघेच राहत होते. दोघात वाद निर्माण झाला असावा असा संशय व्यक्त होत आहे. गळफास घेताच सदर हॉटेलमधील वस्ताद फरार झाला असून त्याने आपला मोबाईलही बंद केला असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. तो मुळचा कर्नाटक राज्यातील आहे. त्याचा कसून शोध पोलीस घेत आहेत. आत्तापर्यंत पोलिसांनी मयत मुलीच्या वडिलांचा तसेच तिच्या पतीचा जबाब नोंदवला आहे. पोस्टमार्टममध्ये गळफास घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी मयत रोहिणी, तिचा पती या दोघांचे मोबाईल जप्त करुन सीडीआर काढला. मात्र त्यामध्ये संशयास्पद काही आढळले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. रोहिणीचे वडील, आई, भाऊ, मामा चार दिवस मंगळवेढा पोलीस स्टेशनचे उंबरठे झिजवत आहेत. मात्र अधिकाऱ्यांनी मयताच्या पतीवर गुन्हा दाखल करण्यास साफ नकार देत त्यांना पुराव्याची मागणी केली आहे.

> आम्ही गेली चार दिवस मंगळवेढा पोलीस स्टेशनला दिवसभर बसून जात आहोत. प्रत्यक्ष पोलीस निरीक्षक यांना भेटून या घटनेत आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. अधिकारी आम्हाला तुम्हीच पुरावा आणून द्या म्हणत आहेत. त्यामुळे मयतास खरा न्याय मिळेल का नाही अशी शंका आहे.
> **-दिनकर मोरे, मयत रोहिणीचा मामा, ब्रह्मपुरी.**

### लवकरच सत्य बाहेर येईल

मयताच्या दोन्ही कुटूंबियाचा जबाब नोंदवला आहे. सखोल चौकशी सुरु आहे. लवकरच या घटनेतील सत्य समोर येईल.
**- दत्तात्रय बोरीगिड्डे, पोलीस निरीक्षक. मंगळवेढा**

# अवैध हातभट्टी दारु निर्मिती अड्डे उध्वस्त

### बार्शी शहर पोलिसांचा दणका; चार आरोपींवर गुन्हे

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.५ जून -**
शहर पोलिसांनी शुक्रवारी दि. ५ जून रोजी अवैध हातभट्टी दारु निर्मिती करणाऱ्या अड्ड्यांवर कारवाई केली. कारवाईत ४ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करुन ३८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला.

सकाळी ७.३० च्या सुमारास नाळे प्लॉट परिसरात छापा टाकला. लता धनु पवार (वय ६५) हिला हातभट्टी दारु तयार करण्यासाठी गुळमिश्रित रसायन तयार करताना पकडले. तिच्याकडून १०० लिटर गुळमिश्रित रसायन व १० लिटर हातभट्टी दारु असा ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गुन्हे प्रकटीकरण पथकाने सुभाषनगर व ताडसौदणे रोडलगतच्या गायकवाड पट्टी परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. यामध्ये सुनीता राजू पवार (वय ३०) आणि मीना दीपक पवार (वय ३५) यांना अवैध दारु गाळताना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून प्रत्येकी १५० लिटर गुळमिश्रित रसायन व २० लिटर हातभट्टी दारु असा १९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.



पारधी कॅम्प परिसरात टाकलेल्या छाप्यात आप्पा लगमान काळे (वय ३७) हा बॅरलमध्ये हातभट्टी दारुचे रसायन तयार करताना आढळला. त्याच्याकडून २५० लिटर गुळमिश्रित रसायन व १० लिटर हातभट्टी दारु असा एकूण १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

चारही कारवाईत जप्त हातभट्टी दारुचे साठे आणि गुळमिश्रित सडलेले रसायन हे पंचांसमक्ष कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन जागीच नष्ट करण्यात आले. तसेच रासायनिक विश्लेषणासाठी नमुने सील करुन जप्त केले. संबंधित चारही आरोपींविरुद्ध बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत. प्रकरणांचा तपास पो.हे.कॉ. लाड आणि पो.ना. जाधव करीत आहेत.

# केदारनाथ मंदिरासमोर हलग्यांच्या कडकडाटात नाचवली महूदची कावड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ जून-**
बर्फाच्छादित डोंगर, सतत बदलणारे हवामान, २२ किलोमीटरचा अत्यंत दुर्गम मार्ग अशी कठीण परिस्थिती असतानाही खांद्यावर पावणे दोनशे किलोची कावड घेऊन चालत जाऊन महूद (ता.सांगोला) येथील शिवभक्तांनी उत्तराखंडमधील केदारनाथाचे दर्शन घेतले. मंदिरासमोर हलग्यांच्या कडकडाटात कावड पारंपारिक पद्धतीने नाचविण्यात आली.

विविध ठिकाणच्या यात्रामध्ये तेथील मंदिरातील भगवंताला महूद येथील कावडीने जलाभिषेक केला जातो. कावड हलग्यांच्या कडकडाटात नाचवली जाते. महिनाभर महूद परिसरात अनेक ठिकाणी या कावडीचा भंडारा घालतात. भंडाऱ्याचा लाभ हजारो भाविक घेतात. हलग्यांच्या निनादात खांद्यावर कावड घेऊन ती




विशिष्ट पद्धतीने नाचविण्याचे कसब येथील तरुणांकडे आहे. काही तरुणांची दुसरी, तिसरी पिढी या कावडी मंडळात राबत आहे. कावडीचे हंडे खूप मोठे आहेत. अशी ही कावड कावडी मंडळातील शिवभक्तांनी स्वतः खांद्यावर केदारनाथ येथे घेऊन जाण्याचे ठरविण्यात आले.

१५ मे रोजी केदारनाथला रवाना झाले. धुळे, इंदोर, दिल्ली, हरिद्वार असा प्रवास करत ते हर की पौडी (उत्तराखंड) येथे दाखल झाले. येथील गंगामाता मंदिरास कावडीने जलाभिषेक केला. कावड पुढे गौरीकुंड येथे पोहोचली. सुमारे पावणे दोनशे किलो वजनाची कावड खांद्यावर घेऊन शिवभक्तांनी २१ मे रोजी स.७ वा. चालण्यास सुरुवात केली. अंधार पडल्यानंतर काही काळ विश्रांती घेतली. २२ मे रोजी स.७ वा ते केदारनाथ मंदिरासमोर पोहोचले. मंदिरासमोर हलग्यांच्या कडकडाटात कावड पारंपारिक पद्धतीने नाचविण्यात आली. केदारनाथाला जलाभिषेक करून सर्व शिवभक्तांनी दर्शन घेतले. त्यानंतर हरिद्वार, वृंदावन, मथुरा करत उज्जैन येथील महाकालेश्वर मंदिरामध्ये आले. महाकालेश्वर मंदिराला कावड नाचवून जलाभिषेक केला आणि महूद येथे ही कावड मार्गस्थ झाली. प्रवासादरम्यान सुवर्ण व्यापारी संजय दीडवाघ व रामचंद्र चव्हाण यांनी हरिद्वार येथे तर अमर जाधव यांनी पाचोरा येथे निवास व भोजनाची सोय केली. केदारनाथ कावड यात्रा करून ही कावड महूद येथे दाखल झाल्यानंतर मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. यानिमित्ताने गावात गाव भंडारा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने भक्तांचा सन्मान करण्यात आला.

### यात्रेत ६३ शिवभक्त सहभागी

यात्रेत बाबुराव नागणे, विजय नागणे, शिवरुद्र लोखंडे, ऋषिकेश महाजन, अभिषेक महाजन, वैभव भोसले, विजय नागणे, शिवप्रसाद बाजारे, गणेश बिडवे, मयूर तुपे, नाना मेटकरी, मनोज नागणे, महिंद्रा आसवे, दीपक नागणे, अमर शिलवंत, शिवम भोसले, अरिहंत डुडु, प्रीतम कांबळे, विनायक देशमुख, सचिन खांडेकर, पार्थ काकडे, सोमनाथ खांडेकर, गोटे, विजय बाजारे, महेंद्र खांडेकर, हिमालय देशपांडे, मनोज जगदाळे यांच्यासह ६३ शिवभक्त सहभागी झाले होते.

## महत्वाचे...



### पर्यावरण संवर्धन हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य : मनीष शहा

**सोलापूर, दि. ५ जून-**

वायु, जल, ध्वनी यांसह विविध प्रकारच्या प्रदुषणमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. सिमेंटची जंगलेही मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. याद्वारे निसर्गाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन ओसी स्पेशालिटीज्चे व्यवस्थापकीय संचालक मनीष शहा यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून येथील ओसी स्पेशालिटीज्च्या वतीने आयोजित केलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात बोलताना ते पुढे म्हणाले, पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. कर्मचाऱ्यांनी व्यावसायिक व वैयक्तिक जीवनात शाश्वततेची मूल्ये अंगीकार करावेत. जेणेकरुन पर्यावरणाचे संवर्धन होईल, असा आपला जीवनक्रम असावा. यावेळी पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. पर्यावरणाबाबत जागरुकताच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात आले. यावेळी सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे स्वच्छ, हरित आणि प्रदूषणमुक्त पर्यावरण निर्माण करण्यासाठी योगदान देण्याची शपथ घेतली. एकात्मता, सामूहिक जबाबदारी आणि पर्यावरण संरक्षणाचा दृढ संकल्प या संदेशासह कार्यक्रमाची सांगता झाली. ओसी स्पेशालिटीज प्रा. लि. पर्यावरण संवर्धन आणि कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून निरोगी व शाश्वत भविष्यासाठी योगदान देत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

**ओसी स्पेशालिटीज्मध्ये पर्यावरणविषयक जनजागृती**

### हयात प्रमाणपत्रासाठी आता मिळणार घरपोच डिजिटल सुविधा

**सोलापूर, दि. ५ जून-**

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदीरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदीरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदीरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र आता स्वयं-सत्यापन या ॲपच्या माध्यमातून सादर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ७ मे २०२६ रोजीच्या आदेशान्वये, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य पुरस्कृत विशेष सहाय्य योजनेसाठी ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपद्वारे लाभार्थ्यांना स्वतः, नातेवाईकांच्या मदतीने किंवा ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत संगणक परीचालक, सेतू सेवा केंद्र, आपले सरकार केंद्र, नागरी सेवा केंद्र यांच्या माध्यमातून हयात प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करता येईल. सदर सेवा लाभार्थ्यांना निशुल्क असून, सेवा केंद्रांमार्फत घेतल्यास कमाल रु. ५० इतके शुल्क देय राहील. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांची वेळेची बचत होऊन हेलपाटे टळतील व विहित कालावधीत हयात प्रमाणपत्र सादर करणे शक्य होईल.जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर पची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी तहसिलदार व नायब तहसिलदार यांच्यावर सोपविण्यात आली आहे. क्षेत्रीय कर्मचारी मोबाईलच्या सहाय्याने घरपोच पडताळणी करतील, जेणेकरून ही सुविधा जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचेल.विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी स्वयं-सत्यापन करावे किंवा कुटुंबीयांच्या मदतीने प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन तहसिलदार (संगायो) शिल्पा पाटील यांनी केले आहे.



### बालकामगार ठेवल्यास कडक कारवाई होणार; सहाय्यक कामगार आयुक्तांचा इशारा

**सोलापूर, दि. ५ जून-**

दि. १२ जून या जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिनाचे औचित्य साधून सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सोलापूर मार्फत बालकामगार प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने जिल्हा कृती दलामार्फत सोलापूर जिल्ह्यात दि. १२ जून २०२६ रोजी कारखान्यांना भेटी देणे, बालकामगार प्रथा विरोधीसह्यांची मोहीम राबविणे, पोस्टर चिकटविणे आणि जनजागृती करणे यासाठी कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. त्यांच्या मार्फत आस्थापनांची तपासणी करून बालकामगार आढळून आल्यास त्यांची मुक्तता करणे आणि बालकामगार अधिनियमांतर्गत कार्यवाही करणे, तसेच मालक/चालक यांचेकडून आस्थापनांमध्ये १४ वर्षाखालील बालकामगार काम करीत नाहीत आणि भविष्यातही काम करणार नाहीत असे हमीपत्र संबंधितांकडून घेण्यात येणार आहे. कोणत्याही कारखाना, आस्थापना, हॉटेल, गॅरेज तसेच धोकादायक उद्योगामध्ये बालकामगार ठेवणे कायद्याने गुन्हा असून अशा ठिकाणी बालकामगार आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तरी कारखाना, आस्थापना, हॉटेल, गॅरेज तसेच इतर धोकादायक उद्योग यामध्ये बालकामगार ठेवू नयेत, असे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त झोले यांनी केले आहे.

### शिव्या दिल्याचा जाब विचारल्याने मारहाण

**सोलापूर, दि. ५ जून-**

शिव्या दिल्याचा जाब विचारल्याने एका शेतकऱ्याला खोऱ्याने मारहाण करुन जखमी करण्यात आल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील वांगी येथे गुरुवारी सायंकाळी ४.३० वाजता घडली. राजूभाई हुसेनी फकीर (वय-५०, रा.वांगी) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. ते शेतामध्ये असताना महादेव तानाजी ठेंगे यांनी खोऱ्याने मारहाण केली. यात डोक्याला जखम व सर्व अंगाला मुका मार लागल्याने त्यांना मंद्रूपच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करुन पुढील उपचारासाठी त्यांचा मुलगा शाहनवाज फकीर यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# ‘सर्वच पक्षसंघटनेतील लोकांशी माझे मैत्रीचे संबंध’



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

विधानपरिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीकडे संख्याबळ आहे. या बळावर आपला विजय निश्चित आहे. इतकेच नव्हे तर सर्वच पक्षसंघटनेतील लोकांशी माझे मैत्रीचे संबंध आहे. विरोधी पक्षातील अनेकांचा आपला पाठिंबा राहणार आहे. सोलापूर मतदार संघातील ६१६ पैकी ५५० मते ही माझ्या पारड्यात पडणार आहेत, असा दावा ‘महायुती’चे उमेदवार राजेंद्र राऊत यांनी केला.

विधानपरिषद जागेसाठी भाजपाचे माजी आमदार प्रशांत परिचारक इच्छुक होते. मात्र पक्षाने त्यांना डावलून राजेंद्र राऊत यांना उमेदवारी दिली. राजेंद्र राऊत यांनी पंढरपुरात परिचारक समर्थक असणाऱ्या सर्व नगरसेवक जिल्हा परिषद सदस्य यांच्याशी संवाद साधत नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आमदार सुभाष देशमुख यांच्या घरी जाऊनही त्यांनी भेट घेतली.

विधानपरिषद निवडणुकीसाठी ‘महायुती’चे राजेंद्र राऊत आणि ‘महाविकास आघाडी’चे वसंतराव देशमुख असा दुरंगी सामना होणार आहे. दरम्यान, ‘महाविकास आघाडी’चे उमेदवार वसंतराव देशमुख यांच्या विरोधात त्यांच्याच पक्षाचे आमदार उत्तमराव जानकर यांनी वसंतराव देशमुख यांना मतदान करणार नसल्याची घोषणा केली. त्यामुळे या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# उशिरा येणारे, लवकर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांवर रजा, वेतन कपातीची कारवाई

## महापालिका कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक उपस्थितीसाठी कडक नियमावली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जून**

सोलापूर : सोलापूर महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन शिस्तीला अधिक बळकटी देण्यासाठी बायोमेट्रिक उपस्थितीबाबत कठोर पावले उचलली आहेत. कार्यालयात उशिरा येणारे तसेच कार्यालयीन वेळ संपण्यापूर्वीच कार्यालयातून निघून जाणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर आता रजा कपात आणि आवश्यकतेनुसार वेतन कपातीची कारवाई करण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी याबाबत आदेश काढले आहेत.

या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ प्रभावाने करण्यात येणार आहे. यापूर्वी केवळ उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई होत होती. मात्र आता कार्यालयीन वेळेपूर्वी कार्यालय सोडून जाणाऱ्यांच्याही बायोमेट्रिक नोंदींची तपासणी करून त्यांच्यावर समान कारवाई केली जाणार आहे. आदेशानुसार प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्या नियुक्तीच्या कार्यालयातील बायोमेट्रिक यंत्रावर कार्यालयात येताना आणि जाताना उपस्थितीची नोंद करणे बंधनकारक राहणार आहे. शासनाने मंजूर केलेल्या १० मिनिटांच्या ग्रेस पिरियडनंतर एखादा कर्मचारी महिन्यात तीन वेळा उशिरा आल्यास किंवा तीन वेळा कार्यालयीन वेळेपूर्वी निघून गेल्यास त्याच्या नावावर एक दिवसाची किरकोळ रजा खर्ची टाकण्यात येणार आहे. किरकोळ रजा उपलब्ध नसल्यास अर्जित रजा आणि तीही उपलब्ध नसल्यास एक दिवसाचे वेतन कपात करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना दोन वेळा लेखी ताकीद देऊनही सुधारणा न झाल्यास विभागप्रमुखांकडून शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली जाणार आहे. उशिरा येणे व लवकर जाणे याच्या स्वतंत्र नोंदी ठेवण्याच्या सूचना आस्थापना विभागाला देण्यात आल्या आहेत.



याशिवाय प्रत्येक विभागातील उपस्थिती व निर्गमनाची तपासणी नियमितपणे करून त्याचा अहवाल लेखापरीक्षक विभागाकडे सादर करण्यात येणार आहे. लेखापरीक्षक विभागाकडून रजा कपात व शिस्तभंग कारवाईची अंमलबजावणी झाली की नाही याचीही पडताळणी केली जाणार आहे. या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सर्व खाते व शाखा प्रमुखांना दिले असून, कार्यालयीन शिस्तभंग खपवून घेतला जाणार नसल्याचा स्पष्ट इशाराही दिला आहे.

# संस्कृत रात्र वर्ग सुरु करण्याची मागणी प्रलंबित

## महापालिका शिक्षण मंडळाकडून तातडीने कार्यवाहीची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

सोलापूर शहरात संस्कृत रात्र वर्ग सुरु करण्याबाबत सातत्याने पाठपुरावा करुनही याकडे दुर्लक्ष होत आहे. महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन ही प्रलंबित मागणी तातडीने पूर्ण करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सोलापूर शहरात पूर्वी संस्कृत रात्र वर्ग सुरु होते. दरम्यानच्या काळात त्यामध्ये खंड पडला आहे. दरम्यान, सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाने शहरात संस्कृत रात्र वर्ग सुरु करावेत, त्यासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी नारायण दुमालदार यांनी एका निवेदनाद्वारे केली होती. यासंदर्भात दुमालदार यांनी दि.२१ ऑगस्ट २०२३ रोजी अर्ज संबंधितांकडे विनंती अर्जही केली होती. माहितीच्या अधिकारात ही माहिती मागवली होती.

दरम्यान, दि.१० एप्रिल २०२४ रोजी तत्कालीन महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी संजय जावीर यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात संस्कृत रात्र वर्ग सुरु करण्याबाबत योग्य ती नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे लेखी पत्रही दिले होते. मात्र अद्यापही कार्यवाही पूर्ण झाली नाही. याकडेही लक्ष वेधण्यात येत आहे.

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे विद्यमान प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांनी याकडे लक्ष घालून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा सोलापूरवासीयांमधून व्यक्त होत आहे.



# सुमन कल्याणपूर यांना सांगितीक श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

सुप्रसिध्द गायिका, पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांना हि.ने. वाचनालयातर्फे सांगितीक श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी ॲड.धनंजय माने, सुनील शिनखेडे, डॉ.संध्या रघोजी, मंजुषा गाडगीळ, नितीन वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमांतर्गत सावळ्या विठ्ठला... अरे संसार संसार... न तुम हमे जानो... मेरे संग गा... पर्वतोंके येडोंदर... ना ना करते प्यार... दिल एक मंदीर है... अशा एकापेक्षा एक अवीट गाणी सादर करण्यात आली. त्यास रसिकांनी उत्स्फुर्त दाद दिली. वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.श्रीकांत येळेगावकर यांनी स्व.सुमन कल्याणपूर यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचा आढावा घेतला. मोहन सोहनी आणि जयंत राळेरासकर यांनी १७ हिंदी-मराठी गाण्यांमधून सुमन कल्याणपूर यांचा प्रवास उलगडला.

# पर्यावरणासाठी लोकसहभाग वाढविण्याची आवश्यकता : राम रेड्डी



## बालाजी अमाईन्स लिमिटेड, हॉटेल बालाजी सरोवरतर्फे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, पर्यावरणासाठी लोकसहभाग वाढविण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन प्रख्यात उद्योगपती डी.रामरेड्डी यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनानिनिमित्त बालाजी अमाईन्स लिमिटेड, व हॉटेल बालाजी सरोवरतर्फे आयोजित वृक्षारोपणप्रसंगी ते बोलत होते.

पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत होटगी रोड येथील हॉटले बालाजी सरोवरसह बालाजी अमाईन्सच्या चिंचोली एमआयडीसी येथील युनिट क्रमांक ३ व ४, तामलवाडी येथील युनिट क्रमांक १ येथेही वृक्षारोपण करण्यात आले. रोपांचे संगोपन-संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारण्यात आली.

फेडरल बँकेच्या मुंबईचे अधिकारी प्रदीप के., जिग्मेशन चेरियन, जय त्रिवेदी व विक्रम स्वरुप यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास बालाजी अमाईन्स व हॉटेल बालाजी सरोवर प्रीमियरचे अधिकारी, कर्मचारी, फेडरल बँकेचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्थायी समितीची बैठकीत आषाढी वारीच्या तयारीसह विकासकामांवर भर

## जिल्हा परिषदेत आर्थिक मंजुरी, विकास आराखडे आणि वारकरी सुविधांबाबत महत्त्वपूर्ण चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या सभेत जिल्ह्याच्या विकासकामांना गती देणे, आर्थिक शिस्त राखणे आणि आगामी आषाढी वारीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील जनहिताच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामीण भागातील विकासकामांचा आढावा हे सभेचे प्रमुख केंद्रबिंदू ठरले. जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत मागील स्थायी समितीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यात आले. तसेच शासनाकडून प्राप्त झालेल्या विविध परिपत्रके, शासन निर्णय आणि प्रशासकीय सूचनांची नोंद घेऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

या बैठकीस जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार, शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत, कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अमृता वाघे, समाजकल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते यांच्यासह सदस्य, प्रशासकीय अधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.




सभेत विविध विभागांमार्फत सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेण्यात आला. ग्रामीण पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण, महिला व बालविकास तसेच कृषी क्षेत्राशी संबंधित योजनांच्या प्रगतीचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना कामकाज अधिक परिणामकारक करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या जमा-खर्च पत्रकांवर विचारविनिमय करून आवश्यक मंजुरी देण्याची प्रक्रिया देखील पार पडली.

जिल्हा ग्रामीण विकास निधीच्या उपलब्धता, खर्च आणि प्रलंबित कामांच्या अनुषंगाने माहिती सादर करण्यात आली. निधीचा अधिकाधिक परिणामकारक वापर करून गावपातळीवरील विकासकामांना चालना देण्याची भूमिका सदस्यांनी मांडली. याशिवाय मे २०२६ महिन्यात झालेल्या विविध विषय समित्यांच्या सभांच्या कार्यवृत्तांची नोंद घेण्यात आली.

आगामी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर सभेत विशेष चर्चा झाली. लाखो वारकरी सोलापूर जिल्ह्यातून पंढरपूरकडे मार्गक्रमण करणार असल्याने पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा, तात्पुरती निवास व्यवस्था, वैद्यकीय पथके, वाहतूक समन्वय आणि आपत्कालीन व्यवस्थापन यांसारख्या बाबींवर व्यापक नियोजन करण्यावर भर देण्यात आला. विविध विभागांनी समन्वयाने काम करून वारी सुरक्षित, सुरळीत आणि यशस्वी करण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देत प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने ही सभा महत्त्वपूर्ण ठरल्याचे मानले जात आहे.

### आषाढी वारीसाठी आवश्यक असलेल्या सुविधा वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना

‘सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध असून ग्रामीण भागातील प्रलंबित विकासकामांना गती देणे, निधीचा पारदर्शक व परिणामकारक वापर करणे आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे प्राधान्य आहे. आगामी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी समन्वयाने काम करून वारकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

**- दीपक वैद्य,**
**अध्यक्ष जिल्हा परिषद सोलापूर**

### ग्रामीण भागातील प्रलंबित विकासकामांना गती देणार

जिल्हा परिषदेच्या आर्थिक संसाधनांचा योग्य नियोजनबद्ध वापर करून विकासकामांना आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासोबतच आषाढी वारीसाठी आवश्यक असलेल्या सुविधा वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाला स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

**- इंद्रजीत पवार,**
**उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# पापुद्रे निघालेले छत, अपुऱ्या सुविधा, अस्ताव्यस्तता पाहून अध्यक्षांचा चढला पारा

- गैरहजर कर्मचाऱ्यांसंबंधी प्रशासनाला फटकारले
- दुरुस्तीसह योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचे दिले निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील कामकाजाची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांनी शुक्रवारी विभागीय कार्यालय आणि वाचनालयाची पाहणी केली. यावेळी पापुद्रे निघालेले छत, अपुऱ्या सुविधा आणि अस्ताव्यस्त अवस्थेतील वाचनालय पाहून अध्यक्षांचा पारा चांगलाच चढला होता.

या पाहणीच्यावेळी समाजकल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते, कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अमृता वाघे, जिल्हा परिषद सदस्या शांभवी कल्याणशेट्टी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या पाहणीच्या अनुषंगाने कार्यालयाची दुरवस्था, गैरहजर कर्मचारी आणि अपुऱ्या सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आल्याचे दिसून आले. दरम्यान, गैरहजर कर्मचाऱ्यांसंबंधी त्यांनी प्रशासनाला फैलावर घेत फटकारले. तसेच कार्यालय, वाचनालयच्या दुरुस्तीसह योजनांचा प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश संबंधितांना दिले.





आवश्यक पायाभूत सुविधांचा अभावाकडे लक्ष वेधताना समाजकल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी कार्यालय आणि वाचनालयाच्या दुरुस्तीसाठी वाढीव निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी केली. प्रभारी समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी विविध अडचणी आणि सुरु असलेल्या योजनांबाबत माहिती दिली.

यावेळी महिला व बालकल्याण विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली. अंगणवाडी केंद्रांच्या सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करुन देणे, ग्रामीण भागातील मुलींना सायकली आणि इतर शैक्षणिक सुविधा पुरविणे आदींविषयी आढावा घेण्यात आला.

### प्रशासनाला स्पष्ट निर्देश

समाजकल्याण, महिला व बालकल्याण विभागांतील सुविधा सुधारुन योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक जबाबदारीने काम करावे, असे स्पष्ट निर्देश या पाहणीदरम्यान देण्यात आले, असे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांनी सांगितले.

## केवळ वृक्षारोपण करुन चालणार नाही...

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने जिल्हा परिषदेच्या आवारात जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जि.प.अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार, कृषि व पशुसंवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, समाज कल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ॲड. अमृता वाघे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य याप्रसंगी बोलताना म्हणाले की, केवळ वृक्षारोपण करुन चालणार नाही तर लावलेल्या रोपांची नियमित काळजी घेतली पाहिजे. उपाध्यक्ष इंद्रजित पवार म्हणाले, वृक्ष लागवड व जोपासना ही काळाची गरज बनली असून वृक्ष संपदा वाढलीच पाहिजे. यावर्षीचे वाढलेले तापमाण लक्षत ठेवा आणि वृक्षतागवडीवर भर द्या. दरम्यान, सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी प्रदिप सकट व इरण्णा भरडे यांचा वाढदिवस असल्याने त्यांच्या हस्तेही वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी कर्मचारी युनियनचे राज्य संघटक शत्रुघ्न माने, जिल्हा सचिव त्रिमुर्ती राऊत, कोषाध्यक्ष संजय पाटील, मुख्य सल्लगार श्रिशैल देशमुख, पतसंस्था क्र १ चे व्हाइस चेअरमन श्रीधर कलशेट्टी, कार्याध्यक्ष विशाल घोगरे, मुख्य संघटक योगेश हब्बु, संतोष शिंदे, संचालक चेतन वाघमारे, रोहित घुले, एस.डी. म्हमाणे, लेखा संघटनेचे अनिल बिराजदार, विलास मसलकर, नागनाथ कुटे आदी उपस्थित होते.

## सलगर वस्ती वृक्षतोड प्रकरणी हरित लवादाकडे न्याय मागणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

सलगर वस्ती येथे ११८ ते २०० लहान-मोठ्या झाडांची कत्तल करण्यात आली. याप्रकरणी भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने हरित लवादाकडे न्याय मागण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. मुळात वृक्षतोड करण्यापुर्वी संबंधित कार्यालयकडून रितसर परवाना घेणे अपेक्षित असते. परंतु याठिकाणच्या झाडांची कत्तल करताना या गोष्टीला मूठमाती देण्यात आल्याचे यावरुन स्पष्ट होते. संबंधित जागामालक, बांधकाम व्यावसायिक यांच्यावर अद्याप कारवाई करण्यात आली नाही. महापालिका व वनविभागकडून संबंधितांना वाचविण्याचे प्रयत्न होत आहेत, असेही सांगण्यात आले. तहसीलदार दिनेश पागे यांच्याकडे यासंदर्भात निवेदन देण्यात आले. यावेळी भीमशक्ती



सामाजिक संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस राजाभाऊ कदम, सलीम मुल्ला, नागेश गायकवाड, इब्राहिम शेख, समीर मुजावर, शशिकांत बेसूर, प्रमिला तुपलवंडे, ज्योती गायकवाड, हेमलता वाघमारे, राजश्री साबळे, सचिन साबळे, संदीप ससाणे आदी उपस्थित होते.

## ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याद्वारे सोलापुरात अवतरली प्रति आळंदी


**सिध्देश्वर फाउंडेशनचा उपक्रम; ७७० भक्तांचा सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

सिध्देश्वर फाउंडेशनने ज्ञानेश्वरी पारायण आयोजित करुन सोलापुरात प्रति आळंदी साकारली आहे. या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात ७७० भक्त सामील झाले आहेत. यात ८ वर्षाच्या बालकापासून ते ८८ वर्षांच्या आजीचाही सहभाग आहे.

या पारायण सोहळ्याने संपूर्ण सोलापूर ज्ञानेश्वरमय झाल्याचे दिसते तसेच ज्ञानोबा तुकोबा हे जगाला तारणारी असून विश्वशांती मिळवून देणारा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी होय, असे गौरवोद्गार ज्ञानेश्वर माउली संस्थान आळंदीचे प्रमुख विश्वस्त श्री योगी निरंजननाथ महाराज यांनी काढले.

सिध्देश्वर फाउंडेशन सोलापूरच्या वतीने जामगुंडी लॉन्स येथे ५ जून ते १२ जून २०२६ या कालावधीत ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक मास पुण्यपर्वानिमित्त तसेच श्री संत ज्ञानेश्वर माउलींच्या ७५० व्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



यावेळी अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प.सुधाकर इंगळे, ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व ह.भ.प. काशीनाथ सर्जे, राघवेंद्र जामगुंडी, श्री सिध्देश्वर फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ सर्जे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या पारायण सोहळ्यात ८ वर्षाचा चन्नवीर नागणसुरे या बालकाने पारायणात सहभाग घेऊन सर्वांचे लक्ष वेधले. तर ८८ वर्षाच्या रुक्मिणीदेवी बद्रीनारायण मालू या माऊलींनी उपस्थिती लावून तरुणांसमोर आदर्श निर्माण केल्याचे चित्र बघायला मिळाले.

ज्ञानेश्वरी पारायण सोहळा समितीचे प्रमुख गुरुलिंग कन्नुरकर यावेळी बोलताना म्हणाले, या पारायण सोहळ्यास पारायण करण्यासाठी ७५० भक्त यावेत अशी अपेक्षा होती.पण सोलापूरकरांनी भरभरून प्रतिसाद देत ७७० भक्तांनी सहभाग घेऊन संयोजकांचा उत्साह वाढविला आहे.

## महत्वाचे...

### तोल जाऊन पडलेल्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ५ जून-**

चालताना तोल जाऊन पडलेल्या मोहोळच्या तरुणाचा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अनिल सुदाम शिंदे (वय-२७, रा.मोहोळ) असे त्या तरुणाचे नाव आहे. दि.१ जून रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास तो मोहोळ रेल्वे स्टेशनजवळून चालत जात असताना तोल जाऊन खाली पडला होता. यात डोक्याला मार लागल्याने एका खासगी दवाखान्यात उपचार करुन सोलापुरातील शासकीय रुग्णालयात संदीप शिंदे यांनी दुसऱ्या दिवशी बेशुध्दावस्थेत दाखल केले होते. मात्र उपचारादरम्यान दि.४ मे रोजी मृत्यू झाला.

### घरगुती वादातून पती-पत्नीस मारहाण

**सोलापूर, दि.५ जून-**

घरगुती वादातून एका पती-पत्नीस लाथाबुक्क्या, लोखंडी रॉड व लाकडाने मारहाण करण्यात आल्याची घटना तुळजापूर तालुक्यातील पिंपळा बु. येथे घडली. शरद झुंबर काळे (वय-६०), चित्राबाई शरद काळे (वय-५०, दोघीही रा. पिंपळा बु तामलवाडी ता.तुळजापूर) असे त्या मारहाण झालेल्या पती-पत्नीचे नाव आहे. गुरुवारी रात्री ते घरी असताना राहत्या घरासमोर अतिश शरद काळे, शहाजी विलास शिंदे व इतर तीन जणांनी मिळून मारहाण केली. यात शरद काळे यांच्या डोक्याला जखम व हातापायास मुक्कामार तर चित्राबाई काळे यांच्या सर्व अंगाला मुक्कामार लागल्याने त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात जावई संजय चव्हाण यांनी दाखल केले.



## छत्रपती शिवरायांची 'अष्टक्रांती' विषयावर सोलापूर विद्यापीठात आज व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि.६ जून रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. शिवचरित्र व्याख्याते डॉ. पांडुरंग बलकवडे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार असल्याची माहिती अध्यासन केंद्राचे अध्यक्ष प्रा.सचिन गायकवाड यांनी दिली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, अध्यासनाचे समन्वयक डॉ अनिल घनवट उपस्थित होते.



स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्या वतीने 'छत्रपती शिवरायांची अष्टक्रांती' हा व्याख्यानाचा विषय असून, छत्रपती शिवाजी महाराजांनी सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, लष्करी, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत घडवून आणलेल्या परिवर्तनाचा सखोल वेध या व्याख्यानातून घेतला जाणार आहे. शिवरायांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वातून उभे राहिलेले स्वराज्य आणि त्यामागील क्रांतिकारी विचारांची मांडणी यावेळी केली जाणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर हे राहणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा तसेच हिंदकेसरी महेंद्र गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## लाड समितीच्या वारस यादीत नातसून, पणतूचा समावेश करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

लाड समितीच्या शिफारशीअंतर्गत सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या पात्र वारसदारांच्या यादीत नात, नातू यांच्यासह नातसून, पणतू आणि पणतूसून यांचाही समावेश करावा, अशी मागणी महापालिका कामगार संघटना कृती समितीने सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कृती समितीचे अध्यक्ष अशोक जानराव यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की २४ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीसंदर्भातील सुधारित तरतुदी पूर्वीच्या प्रलंबित प्रकरणांनाही लागू करण्यात आल्याचे नमूद केले आहे. या निर्णयानुसार पती, पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, विधवा मुलगी, बहीण, घटस्फोटित मुलगी, परित्यक्ता मुलगी, अविवाहित



सज्ञान मुलगी, अविवाहित सज्ञान बहीण तसेच अविवाहित सफाई कामगारांच्या बाबतीत सख्खा भाऊ, सख्खी बहीण, नात आणि नातू यांचा पात्र वारसांमध्ये समावेश करण्यात आला आहे. मात्र हा लाभ १२ ऑगस्ट १९७५ पासूनच्या प्रकरणांनाही लागू करण्यात आल्याने अनेक सफाई कामगारांच्या पुढील पिढ्या आता वयोमर्यादेच्या उंबरठ्यावर पोहोचल्या आहेत. अनेक ठिकाणी कामगारांची मुले-मुली वृद्धापकाळाकडे झुकली असून नात-नातवंडांचे वयही ४५ वर्षांच्या पुढे गेले आहे किंवा त्या वयाच्या जवळ पोहोचले आहे. त्यामुळे विद्यमान निकषांनुसार अनेक कुटुंबांना वारसा हक्काचा लाभ मिळण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर नात-नातवंडांसह नातसून, पणतू आणि पणतूसून यांचाही पात्र वारसांच्या यादीत समावेश करण्यात यावा. त्यामुळे १९७५ पासूनच्या प्रलंबित प्रकरणांतील सफाई कामगारांच्या वारसांना न्याय मिळू शकेल, असा दावा कृती समितीने केला आहे.

सफाई कामगारांच्या कुटुंबीयांना वारसा हक्काचा लाभ अधिक व्यापक स्वरूपात मिळावा आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांना न्याय मिळावा, यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## म्हेत्रेच्या निलंबनानंतर झेडपीत खळबळ; मुख्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांवरही टांगती तलवार?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जून**

करमाळा पंचायत समितीतील कर्मचारी मनोज म्हेत्रे यांच्यावर मूळ नियुक्तीच्या ठिकाणी गैरहजर राहिल्याचा ठपका ठेवत करण्यात आलेल्या निलंबनाच्या कारवाईमुळे जिल्हा परिषद प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणानंतर जिल्हा परिषद मुख्यालयात विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या अशाच स्वरूपातील सुमारे ३० कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या आणि कामकाज पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मनोज म्हेत्रे हे करमाळा पंचायत समितीच्या आस्थापनेवरील कर्मचारी असले तरी गेल्या काही काळापासून जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील महत्त्वाच्या कामकाजाची जबाबदारी सांभाळत होते. दलित वस्ती विकास योजनेअंतर्गत निधी नियोजन, विकास कामांच्या प्रशासकीय प्रक्रिया तसेच विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत त्यांचा सक्रिय सहभाग होता. विभागीय अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार ते जिल्हा परिषद मुख्यालयात काम करत असल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर प्रशासनातील दुहेरी निकषांचा मुद्दा पुढे आला आहे. जिल्हा परिषद मुख्यालयात पंचायत समित्या किंवा इतर विभागांतून आलेले अनेक कर्मचारी विविध टेबलांवर कार्यरत आहेत. यापैकी अनेकांकडे विभागीय आयुक्तांची अधिकृत मान्यता नसल्याची चर्चा प्रशासनिक वतुर्ळात सुरू आहे. त्यामुळे जर म्हेत्रे यांच्यावरील कारवाई नियमसंगत मानली गेली, तर त्याच निकषावर इतर कर्मचाऱ्यांचीही चौकशी आणि कारवाई अपरिहार्य ठरणार असल्याचे कर्मचारी संघटनांचे म्हणणे आहेविशेष म्हणजे, म्हेत्रे हे समाजकल्याण विभागातील विविध महत्त्वाच्या बैठका, आढावा, सत्रे तसेच समता सप्ताहासारख्या शासकीय कार्यक्रमांमध्ये नियमित सहभागी होत होते. त्यामुळे त्यांच्या कार्यस्थळाबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती नव्हती का, असा सवाल उपस्थित होत आहे. संबंधित कर्मचारी मूळ कार्यालयात कार्यरत नसल्याची बाब जर प्रशासनाच्या निदर्शनास होती, तर त्यावर यापूर्वी कोणतीही कार्यवाही का झाली नाही, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणामुळे जिल्हा परिषद मुख्यालयातील कर्मचारी व्यवस्थापन, बदलीनंतरच्या प्रतिनियुक्त्या आणि अनधिकृत कार्यपद्धतींची सखोल पडताळणी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. कर्मचारी संघटनांनी विभागीय आयुक्तांकडे यासंदर्भात तक्रार करण्याची तयारी सुरू केल्याचे समजते.

### प्रशासनाकडून अधिकृत भूमिका स्पष्ट नाही

या संपूर्ण प्रकरणावर जिल्हा परिषद प्रशासनाकडून अधिकृत भूमिका स्पष्ट झालेली नाही. मात्र म्हेत्रे निलंबन प्रकरण हे केवळ एका कर्मचाऱ्यापुरते मर्यादित न राहता जिल्हा परिषदेतील कार्यपद्धती, अधिकारांचे विकेंद्रीकरण आणि कर्मचारी व्यवस्थापनातील त्रुटींवर प्रकाश टाकणारे ठरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४६३

**मन बुध्दि काया वाचा शुध्द करीं**
**रुप सर्वत्र देखोनि नमस्कारी**

आपण कोण आहोत हे आपल्या तोंडून समाजाला सांगण्याची गरज नसते. आपल्या वर्तनाचे प्रतिबिंब समाजात आपोआप उमटत असते. त्या प्रतिबिंबाच्या आधारे लोक आपली गणना चांगल्या वाईटात करीत असतात. लोकांनी आपली गणना करावी किंवा नाही हा त्यांचा प्रश्न आहे. लोकांनी आपले चांगले कार्य पाहवे व वाईट कार्याकडे दुर्लक्ष करावे असा अट्टहास आपण करू नये. आपल्या कार्याचा साक्षीदार दुसऱ्याने होण्यापेक्षा आपणच आपल्या कार्याचे साक्षीदार होणे अत्यंत योग्य असते. जो चांगला व्यक्ती असतो किंवा जो संत सज्जनांच्या पक्तीला बसण्यास पात्र होतो. अशा व्यक्तिने त्याचे मन, बुध्दी, काया व वाणी ही पूर्णत: शुध्द केलेली असते. सर्व जीवमात्रात तो एका ईश्वराच्या अंशाला पाहतो. म्हणजेच सर्वत्र तो समत्व पहातो. तो स्वत:ला मोठे व इतरांना लहान समजत नाही. अहंकाराचा नाश करून समत्वाच्या मार्गावर चालणारा हा महात्मा आपणाला कोणी मोठे व चांगले म्हणावे अशी अपेक्षाही करीत नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**मन बुध्दि काया वाचा शुध्द करीं**
**रुप सर्वत्र देखोनि नमस्कारी**
**लघुत्व सर्वभावे अंगिकारीं**
**सांडीमांडी मी तू पण ऐसी थोरी**

मूठभर लोकांना वगळता जवळपास सर्वांकडे मीपणा असतो. हा मीपणा व्यक्तिमध्ये ईर्षा, मोह, द्वेष, मत्सर, अहंकार, आदी शत्रूंची जोपासना मोठ्या प्रमाणावर करतो. जेथे मी आहे तेथे मन बुध्दी, वाचा ही शुध्द असत नाही. कारण मीची जोपासणूक करण्यासाठी व्यक्तिला बऱ्याचवेळा नको ते करावे लागते. जो व्यक्ति मी ला स्थान देत नाही त्याच्याजवळ अहंकार, मोह, क्रोध, मत्सर, द्वेष हे थांबत नाहीत. अर्थात असा व्यक्ती आपोआप समत्वाच्या मार्गावर चालू लागतो. म्हणजे आत्मज्ञानाकडे त्याचे पाऊल पडू लागते. ज्याला आत्मज्ञानाची गोडी लागते त्याला लोकांनी मोठे, चांगले म्हणावे याचा विसर पडतो. प्रत्येक कर्माचा तो स्वत:च साक्षीदार होतो. त्यामुळे स्वत:तील उणीवा, दोष, त्रुटी त्याच्याकडून सहज दुरुस्त होतात. माणूस जेंव्हा स्वत:च स्वत:च्या कर्माकडे, वर्तनाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहतो तेव्हा त्याच्यातील काम, क्रोध, मोह, मत्सर, अहंकार नष्ट होऊ लागतात. प्रत्येकाला सुख समाधानाची गरज आहे. हे सत्य असले तरी माणूस हे सुख समाधान अहंकार, ईर्षा, क्रोध, मोह, द्वेष, मत्सराच्या सहाय्याने मिळवू पाहतो आहे जे चूक आहे. अनेक सासू-सासऱ्यांना सुनेवर अधिकार गाजवून सुख मिळवावे वाटते, अनेक वरिष्ठांना कनिष्ठावर अधिकार गाजवावा वाटतो. कांही श्रीमंतांना गरीबांना पिळावे वाटते. अशा अधिकारशाहीतून मिळणारे सुख हे शाश्वत नसते. कालांतराने का होईना याचे परिवर्तन दु:खात होते. म्हणून सत्य शाश्वत सुख-समाधानासाठी अहंकार, मत्सर, द्वेष रहित होऊनच वागणे योग्य असते. जय राम कृष्ण हरी।

- **ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# बौध्द मूर्तिकला ही भारतीय कलावैभवाची पायाभरणी

### डॉ. धम्मपाल माशाळकर; प्रियदर्शी सम्राट अशोक विचार संवर्धन समितीच्या वतीने व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

भारतीय मूर्तिकलेची सुरुवात बुद्धमूर्तीपासून झाली असून पुढील काळात विकसित झालेली मूर्तिकला ही बौद्ध मूर्तिकलेचीच देणगी असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध मूर्ती अभ्यासक डॉ. धम्मपाल माशाळकर यांनी केले.

प्रियदर्शी सम्राट अशोक विचार संवर्धन समितीच्या वतीने डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित 'बुद्धमूर्ती व स्थापत्य' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक दत्ता गायकवाड होते. प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर उपस्थित होते. त्यांनी भारतीय बौद्ध मूर्तिकलेचे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातील योगदान विशद केले.

डॉ. माशाळकर यावेळी त्यांनी भारतीय बौद्ध स्थापत्य, लेणी आणि मूर्तिकलेचा इतिहास उलगडून सांगितला. ते म्हणाले, तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या तत्त्वज्ञानाने प्रेरित होऊन भारतात सुमारे १२०० लेणी निर्माण झाली. त्यापैकी एक हजारांहून अधिक लेणी महाराष्ट्रात असून त्यातील ९०० हून अधिक लेणी बौद्ध धम र्यांची आहेत. सम्राट अशोकांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर देशभरात



८४ हजार स्तूप, स्तंभ, शिलालेख आणि लेणी उभारली. त्यांचे अवशेष व खुणा आजही देशभर पाहावयास मिळतात. पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून सादर करण्यात आलेल्या या व्याख्यानास इतिहासप्रेमी आणि अभ्यासकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रास्ताविक ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. वनिता सावंत-चंदनशिवे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. अंजना गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सुधीर चंदनशिवे, सुनीता गायकवाड, प्रा. डॉ. अंजना गायकवाड, प्रा. डॉ. वनिता सावंत-चंदनशिवे आणि सुचित्रा थोरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास डॉ. एम. डी. शिंदे, प्रा. डॉ. संघप्रकाश दुड्डे, प्राचार्य नसिम पठाण, प्रा. डॉ. नभा काकडे, प्रा. डॉ. श्रीकांत येळेगांवकर, आबासाहेब चंदनशिवे यांच्यासह शहरातील इतिहासप्रेमी व अभ्यासक उपस्थित होते.

# श्री शिवराज्याभिषेक सोहळा शनिवारी

**सोलापूर, दि. ५ जून-**

सुवर्ण गणपती युवक प्रतिष्ठान, हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान आणि छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा समिती यांच्यातर्फे श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शनिवारी सकाळी ९ वाजता श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजक बाळासाहेब गायकवाड यांनी दिली.



### सुवर्ण गणपती युवक प्रतिष्ठानच्या शिवगौरव पुरस्काराचे वितरण

श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवस्मारक येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस अभिषेक करण्यात येणार आहे. यावेळी शहरातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे, याच कार्यक्रमात परंपरेप्रमाणे शिवगौरव पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजक बाळासाहेब गायकवाड यांनी केले आहे.

## हजरत ख्वाजा दर्गाह उरूस बुधवारपासून

**सोलापूर, दि. ५ जून-**

हजरत ख्वाजा वजीरबाशा चिश्ती, रहेमतुल्लाहा आल ए दर्गाहच्या उरूसास बुधवार दि. १० जून पासून प्रारंभ होत असल्याची माहिती हजरत ख्वाजा सम ाजसेवी संस्थेचे अध्यक्ष सैफी सज्जाद नशीन म. हारून पटेल यांनी दिली.

यामध्ये बुधवारी १० जून रोजी सायंकाळी ७ वाजता जुलुस निघणार आहे. संदल शरीफ म ार्कंडेय मंदिर येथून निघून अल आमीन नगर, स्वागत नगर मार्गे अष्टविनायक नगर जवळच्या दर्गाह शरीफला येणार आहे.या ठिकाणी संदल मध्ये कार्यक्रम सादर करण्यात येईल. धार्मिक विधी पार पडतील. गुरूवार ११ जून रोजी उरूस निमीत्त सायंकाळी ७ वाजता नियाजे लंगर (प्रसाद) वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. या धार्मिक उरुसाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे सचिव म.शफिक पटेल यांनी केले आहे.

# पर्यावरण दिनी वनमजुरांचे लाक्षणिक उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

माळढोक पक्षी अभयारण्य, नान्नज (ता. उत्तर सोलापूर) येथे कार्यरत असलेल्या रोजंदारी वनम जुरांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. वन विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही मागण्यांची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत मजुरांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शुक्रवारी दि. ५ जून रोजी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

वनमजुरांनी दिलेल्या निवेदनानुसार, अभयारण्यातील 'ब्रेक सिस्टीम' बंद करावी, सध्या कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना कायम कामावर ठेवावे, ओळखपत्रे द्यावीत, विमा संरक्षण लागू करावे, शासन नियमानुसार युनिफॉर्म व रोजंदारी मिळावी, तसेच आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा



प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

मजुरांचे म्हणणे आहे की, माळढोक पक्षी अभयारण्याचे क्षेत्र पूर्वी १,२५० हेक्टर होते. आता ते वाढून सुमारे ३,५०० हेक्टर झाले असतानाही मनुष्यबळ आणि सुविधांमध्ये अपेक्षित वाढ झालेली नाही. अनेक वनमजूर गेल्या १५ वर्षांपासून येथे सेवा बजावत असूनही त्यांना मूलभूत सुविधा आणि शासनाच्या नियमांनुसार मिळणारे लाभ अद्याप मिळालेले नाहीत.

दरम्यान, या मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा भविष्यात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही वनमजुरांनी दिला आहे. सकाळी ९.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत हे लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



# अवैध तोड झालेल्या झाडांना वाहिली श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

सलगरवस्ती येथील ५४ मीटर रस्ता येथील ११८ झाडं अवैध तोडीचा प्रकार उघड झाला. शहरातील सर्वात मोठी अवैध वृक्षतोडीचा तो प्रकार घडलेला आहे.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने त्या ११८ झाडं तोडलेल्या ठिकाणी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर व पर्यावरणप्रेमींच्या उपस्थितीत पुष्पचक्र वाहून झाडांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सकाळी ११ वाजता श्रद्धांजली सभा घेण्यात आली. यावेळी उपम हापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक राजशेखर पाटील, नगरसेवक सत्यजीत वाघमोडे, पर्यावरण प्रेमी महेश देवकर, मनोज देवकर आदी उपस्थित होते. शहरात यापुढे असे प्रकार घडू नयेत अशी अपेक्षा व्यक्त करीत वृक्षसंवर्धनाची शपथ घेण्यात आली.

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार,**
**दि. ६ जून २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अधिक, कृ. षष्ठी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- श्रवण (०६.०३)**
**योग - ऐंद्र (१०.०३)**
**करण - गरज (१४.०४)**
**राहू काल : शनिवार**
**स. ९.०० ते १०.३०**

**दिनविशेष :**
**शिवराज्याभिषेक दिन (१६७४): ६ जून १६७४ रोजी (ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, शके १५९६) रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा विधिवत राज्याभिषेक झाला आणि छत्रपती ही पदवी धारण करत 'हिंदवी स्वराज्याची' स्थापना अधिकृत करण्यात आली.**
**डी-डे (१९४४): दुसऱ्या म हायुद्धात दोस्त राष्ट्रांनी फ्रान्सम धील नॉर्मंडी येथे जर्मन सैन्यावर ऐतिहासिक हल्ला चढवला.**

# नवरात्र महोत्सव युवक मंडळातर्फे ११ जूनपासन विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

बुबणे चाळ,भैय्या चौक येथील नवरात्र महोत्सव युवक मंडळातर्फे देवी प्रतिष्ठापना वर्धापन दिनानिमित्त ११ ते १३ जून या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राजकुमार लोहकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गुरुवार, दि. ११ जून रोजी दुपारी ४ ते ६ वाजता लता तालीकोटी व लक्ष्मी चिचोरे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली सामूहिक ललिता सहस्त्रनाम कुंकुमार्चना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच रुपा स्वामी व राजेश्वरी भादुले यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली रुद्र पठणाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.शुक्रवार दि.१२ जून रोजी दुपारी ४ वाजता महिलांचा जल कलश मिरवणूक काढण्यात येणार आहे. शनिवार दि.१३ जून रोजी सकाळी ८ वाजता होम-हवन होवून भक्तांना दुपारी १२ ते ४ या वेळेत महाप्रसाद आयोजन केलेले आहे. तरी सर्व भक्तांनी वरील कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला सकलेश बाभूळगावकर, दत्ता माने, सलीम शेख, सत्यजित चौहान आदी उपस्थित होते.

# अ.भा. मराठी चित्रपट महामंडळासाठी रविवारी मतदान

### बदलासाठी मत देण्याचे महामंडळ बचाव अपक्ष संघाचे सभासदांना आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या संचालक पदाच्या १४ जागांसाठी रविवारी दि. ७ जून रोजी राज्यभर म तदान होणार असून सत्ताधारी पॅनलविरोधात महामंडळ बचाव अपक्ष संघ - तिसरी आघाडी निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याची माहिती आघाडीचे उमेदवार उल्हास नांद्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या निवडणुकीसाठी राज्यभरातील सुमारे ३ हजार ४०० सभासद मतदानाचा हक्क बजावणार आहेत. सोलापुरातील मतदान सरस्वती मंदिर येथे होणार असून शहर व जिल्ह्यातील सुमारे १५० सभासद मतदान करणार आहेत. महामंडळात भ्रष्टाचारमुक्त, तंटामुक्त आणि सभासदकेंद्रित कारभार निर्माण करण्याच्या उद्देशाने 'महामंडळ बचाव अपक्ष संघ - तिसरी आघाडी' स्थापन करण्यात आल्याचे नांद्रे यांनी सांगितले. निवडणुकीनंतरही सभासदांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ते म्हणाले, महामंडळातील गेल्या काही वर्षांतील भ्रष्टाचार, अंतर्गत वाद, न्यायालयीन प्रकरणे आणि अपारदर्शक कारभारामुळे सभासदांचा विश्वास कमी झाला आहे. हे चित्र बदलण्यासाठी पारदर्शक, लोकाभिमुख आणि विश्वासार्ह महामंडळ उभे करण्याचा आमचा प्रयत्न आहे. महामंडळ हे काही मोजक्या व्यक्तींचे नसून सर्व सभासदांचे आहे, या भावनेतून आम्ही निवडणूक लढवत आहोत.

या आघाडीत सर्व अपक्ष उमेदवारांचा समावेश असून कोणत्याही मोठ्या पॅनलच्या दबावाखाली न राहता सक्षम पर्याय देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सर्व उमेदवार चित्रपटसृष्टीत दीर्घकाळ कार्यरत असून सभासदांच्या समस्या प्रत्यक्ष अनुभवलेल्या व्यक्ती असल्याचेही त्यांनी सांगितले.

आघाडीतर्फे अमोल भावे (दिग्दर्शक विभाग), अवधूत जोशी (दिग्दर्शक विभाग), शरद लोणकर (प्रसिद्धी विभाग), मानसिंग कदम (निर्माता विभाग), संतोष शिंदे (अभिनेता विभाग), मनोज मराठे (निर्मिती व्यवस्था विभाग), महादेव शिरोळकर (निर्माता विभाग) आणि उल्हास भालचंद्र नांद्रे (कलादिग्दर्शक विभाग) हे उमेदवार निवडणूक लढवत आहेत. या पत्रकार परिषदेला अमोल भावे, महादेव शिरोळकर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

**अपक्ष संघाचा सभासदकेंद्रित वचननामा**

महामंडळ बचाव अपक्ष संघाने सभासदांसाठी विविध आश्वासने जाहीर केली आहेत. त्यामध्ये प्रत्येक सभासदाला मतदानाचा हक्क व अद्ययावत सभासद यादी, सर्व सेवा पूर्णपणे ऑनलाइन करणे, तत्काळ सभासद कार्ड वितरण, बोर्ड बैठकींचे थेट प्रक्षेपण, वार्षिक सर्वसाधारण सभेद्वारे थेट संवाद, कलाकार, तंत्रज्ञ व कामगारांना जलद न्याय आणि आर्थिक मदत, वैद्यकीय व शैक्षणिक सहाय्य, सर्व सभासदांसाठी विमा योजना, १५ वर्षांहून जुने घरविहीन सभासदांसाठी घरकुल योजना, महाराष्ट्रभर प्रवास सवलत, मानधनवाढीसाठी प्रयत्न, मालिका क्षेत्रातील थकीत देयके वेळेत मिळवून देणे, फिरते सिनेमागृह योजना, वयोवृद्ध कलाकारांच्या पेन्शनमध्ये वाढ तसेच निराधार कलाकारांसाठी 'कलावंतनगर' आश्रम संकल्पना यांचा समावेश आहे.



# वॉव संघटनेने दिली दिव्यांग बाधंवाला तीन चाकी सायकल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

कोनापुरे चाळीतील श्री बाबू बेरे हा दिव्यांग असून त्याला उदरनिर्वाह चे कोणतेही साधन नसल्याने तो दिवस भरात इतरात्र घरोघरी उन्हातान्हात फरफटत आनवाणी जायचा, स्वतःला त्रास करून घेत होता.WOW संघटनेच्या महिला प्रतिनिधी मार्था आसश्रदे यांना ते पाहावले गेले नाही. त्याचा त्रास आपल्या स्वतःलाच होतोय असं जाणून घेऊन त्यांनी संस्थेच्या अध्यक्षा विद्या लोलगे यांच्याकडे प्रस्ताव मांडला की आपल्याला या दिव्यांग बांधवाची मदत करायची आहे,

wow संघटनेच्या महिलांनी वर्गणी जमा करून बाबू बेरे यास काय मदत करता येईल? असा विचार करून त्याला चांगली तीन चाकी सायकल भेट म्हूणन दिली. त्यावेळी त्याच्या आजूबाजूच्या लोकानी त्यांच्या भावना बोलून दाखवल्या की आम्ही गरीब असल्याने आमची इच्छा असतानाही आम्ही त्याला मदत करू शकत न्हवतो ते काम Wow संघटनेने केले, त्याबद्दल झोपडपट्टीतील आजूबाजूच्या महिलांनी संघटनेचे आभार मानले. त्या दिव्यांग मुलाला बोलता येत नसल्यामुळे त्याने आपल्या आनंदआश्रूना वाट मोकळी करून दिली. याप्रसंगी वाव संघटनाच्या अध्यक्ष विद्या लोलगे, शोभा गायकवाड, मार्था आसादे,पुष्पा हलकुडे, स्वाती मुकणार, वैशाली देशपांडे, स्वाती जाधव, शबाना मुलाणी, शीतल वाघमारे, नागम्मा बेरे, मोनिका बेलदोर, यल्लाम्मा म्हेत्रे आदी महिला उपस्थित होत्या.

# सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा संस्कृतीला मिळणार तज्ज्ञ मार्गदर्शकांची धार!





**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
**मो.9881133103**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे शैक्षणिक क्षेत्रासोबतच क्रीडा क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ यांच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या वेस्ट झोन, साऊथ वेस्ट झोन, ऑल इंडिया आणि खेलो इंडिया आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे संघ सातत्याने चमकदार कामगिरी करत असतात. याच कामगिरीला अधिक धार देण्यासाठी आणि खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे कौशल्य व मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी विद्यापीठ परिसरात विविध खेळांच्या प्रशिक्षकांची आणि संघव्यवस्थापकांची नुकतीच एक अत्यंत महत्त्वपूर्ण सहविचार सभा पार पडली.

यावेळी सोलापुरातील विविध क्रीडा क्षेत्रातील २२ प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शकांना आमंत्रित करण्यात आले होते. विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाने प्रथमच शारीरिक शिक्षण संचालकाव्यतिरिक्त सोलापूर शहर व जिल्ह्यातील नावाजलेल्या तज्ज्ञ प्रशिक्षकांना एकत्र आणून संधी देण्याचा स्तुत्य प्रयत्न केला असून, विद्यापीठाच्या या निर्णयाचे सर्वच प्रशिक्षकांनी स्वागत केले.

या बैठकीत विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांनी खेळाडूंना केवळ स्पर्धेत पाठवणे पुरेसे नसून, स्पर्धेपूर्वी त्यांच्यासाठी दर्जेदार सराव शिबिरांचे आयोजन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. यामुळे खेळाडूंना खेळातील अद्ययावत कौशल्ये आत्मसात करता येतील. विद्यापीठाकडे उपलब्ध असलेली अद्ययावत मैदाने आणि नवीन इनडोअर मल्टिपर्पज हॉल चा खेळाडूंसाठी कसा प्रभावी वापर करता येईल, यावर यावेळी सविस्तर चर्चा झाली. डॉ. लकडे यांनी प्रशिक्षकांना स्पर्धापूर्व सराव शिबिराची जबाबदारी स्वीकारून सहकार्य करण्याचे आवाहन केले, ज्याला सर्वच मार्गदर्शकांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला आणि विद्यापीठाला क्रीडा क्षेत्रात अग्रेसर बनवण्यासाठी आपले पूर्ण योगदान देण्याची ग्वाही दिली. या सहविचार सभेत सोलापूर विद्यापीठातील क्रीडा संस्कृती अधिक बळकट करण्यासाठी अनुभवी मार्गदर्शकांनी अत्यंत मोलाच्या सूचना आणि मते मांडली. प्रत्येक तालुका पातळीवर खेळांचे सराव शिबीर आयोजित केल्यास ग्रामीण भागातील लपलेले गुणवान खेळाडू समोर येतील आणि विद्यापीठाला दर्जेदार खेळाडू मिळतील, असा सूर यावेळी उमटला. तसेच, विद्यापीठाच्या निवड समितीने प्राथमिक संघ निवडल्यानंतर अंतिम निवडीसाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांचे मत विचारात घ्यावे आणि शक्य असल्यास निवड समितीतच तज्ज्ञांना स्थान द्यावे, जेणेकरून अधिक सक्षम खेळाडूंची निवड होईल, अशी महत्त्वाची सूचना करण्यात आली. याशिवाय, विद्यापीठामध्ये शूटिंग (रायफल व पिस्तूल) खेळाची अद्ययावत सुविधा निर्माण करणे गरजेचे असून, याचे सराव शिबीर विद्यापीठात घेतल्यास भविष्यात उत्तम नेमबाज तयार होतील, अशी आशा व्यक्त करण्यात आली. प्रत्यक्ष स्पर्धेपूर्वी सराव शिबिरे आयोजित केल्यास खेळाडूंना मैदानी खेळासोबतच तांत्रिक बाबी, बारीक नियम आणि रणनीती समजावून सांगणे सोपे होईल, ज्याचा थेट सकारात्मक परिणाम त्यांच्या कामगिरीवर दिसेल. सध्या सोलापूर जिल्ह्याकडे कुस्तीचे केंद्रस्थान म्हणून पाहिले जाते, त्यामुळे कुस्ती क्षेत्रात विद्यापीठाला आगामी काळात जास्तीत जास्त पदके मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहील, असा विश्वासही म ार्गदर्शकांनी व्यक्त केला. विद्यापीठाच्या क्रीडा मंडळाने या सर्व सूचनांचा सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे. बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व क्रीडा मार्गदर्शकांनी विद्यापीठातील नवीन आधुनिक इनडोअर हॉलची पाहणी करून अत्यंत समाधान व्यक्त केले. भविष्यात या इनडोअर हॉलमध्ये आंतर विद्यापीठ आणि इतर मोठ्या राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन व्हावे, तसेच सर्व सराव शिबिरेही येथेच घेतली जावीत, जेणेकरून खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचा सराव मिळेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यापीठाच्या या आधुनिक पायाभूत सुविधा आणि जिल्ह्यातील नावाजलेल्या प्रशिक्षकांचा दांडगा अनुभव एकत्र आल्यामुळे, आगामी खेलो इंडिया आणि ऑल इंडिया आंतर विद्यापीठ स्पर्धांमध्ये सोलापूर विद्यापीठाचा डंका नक्कीच वाजेल आणि ही बैठक सोलापूरच्या क्रीडा विश्वाला एक नवी दिशा देणारी ठरेल, यात शंका नाही.

## महत्वाचे...



### संत नामदेव क्षत्रिय एकसंघाची बैठक

**पंढरपूर, दि. ५ जून-**

श्री संत नामदेव क्षत्रिय एकसंघाच्या कार्यकारणीची बैठक राष्ट्रीय अध्यक्ष महेश ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली लोणावळा येथे पार पडल्याची माहिती सचिव रुपेश खांडके यांनी दिली. बैठकीत संत नामदेव महाराज स्मारकाच्या भूमिपूजना विषयी चर्चा झाली. तसेच श्री संत नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज प्रकरणात समाज बंधू-भगिनींना येणाऱ्या अडचणीबद्दल चर्चा झाली. संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांनी अडचणी तात्काळ दूर करण्याची सूचना केली. तसेच समाजाच्या विविध विषययावर चर्चा झाल्याचे प्रदेशाध्यक्ष गणेश उंडाळे यांनी सांगितले. बैठकीस रुपेश खांडके, धनंजय गोंदकर, नंदकुमार कोसबतवार, गणेश उंडाळे, अनिल गचके, प्रमोद शिंपी, हर्षराज कपडेकर, ॲड. सागर मांढरे, खेमराज नामा, रेखा मुळतकर, पूजा वादवने, मंजिरी कपडेकर उपस्थित होते.



### सांगोला महाविद्यालयात निवृत्तीनिमित्त तिघांचा सपत्नीक सत्कार

**सांगोला, दि. ४ जून-**

सांगोला महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ. बबन गायकवाड, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. तानाजी माने व वरिष्ठ लिपीक प्रकाश पैलवान यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे थोर साहित्यिक प्रा. डॉ. राजेंद्र दास, कार्यक्रमाचे व संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, सहसचिव साहेबराव ढेकळे, सदस्य विश्वनाथ चव्हाण, म.सि.झिरपे, रावसाहेब ताठे, शामराव लांडगे, सुरेश फुले, चंद्रशेखर अंकलगी, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले उपस्थित होते. याप्रसंगी संपादक डॉ. दत्ता सरगर लिखित साधेपणातील मोठेपण-प्रा.डॉ.बबन गायकवाड सेवापूर्ती गौरव अंक व दुष्काळातून वाटचाल एका स्वप्नाची डॉ. तानाजी माने आत्मकथन या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. मनोगतात डॉ. राजेंद्र दास यांनी विद्या ही विनयतेने शोभते, डॉ.बबन गायकवाड, डॉ. तानाजी माने यांनी जीवनभर विनयता जपली. तर प्रकाश पैलवान यांनी विद्यार्थ्यांना चांगली सेवा दिली असे सांगितले. बाबुराव गायकवाड यांनी तिघांनी सेवेतील प्रामाणिकपणे केलेल्या कामाबद्दल कौतुक केले. यावेळी डॉ. रामचंद्र पवार, प्र. अधिक्षक विलास माने, डॉ. बबन गायकवाड, डॉ. तानाजी माने व प्रकाश पैलवान यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. सुरेश भोसले, सूत्रसंचालन प्रा.संतोष कांबळे यांनी केले. आभार डॉ. रमेश बुगड यांनी मानले.

### कुगाव शिरसोडी पुलाला अजित पवारांचे नाव देण्याची संभाजी ब्रिगेडकडून मागणी

**जेऊर दि.४ जून-**



उजनी जलाशयातील कुगाव (ता. करमाळा) ते शिरसोडी (ता. इंदापूर) या पुल प्रकल्पासाठी तत्कालिन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंजुरी दिली. त्यामुळे सदर पूलास २२ जूलै रोजी असलेल्या अजित पवार यांच्या जयंतीचे निमित्त साधून त्यांचे नाव देण्याची मागणी संभाजी बिग्रेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष नितीन खटके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्याकडे केली. पुलामुळे इंदापूर व करमाळा तालुक्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. यापूर्वी नागरिकांना भिगवण टेंभुर्णी मार्गे तब्बल ९० ते १०० किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागत होता. अनेक नागरिकांना नाईलाजाने उजनी जलाशयातून धोकादायक होडी प्रवास करावा लागत होता. ज्यात ५० हून अधिक नागरिकांचा बळी गेला होता. या पार्श्वभूमीवर कुगाव शिरसोडी पुल प्रकल्पासाठी पुढाकार घेणाऱ्या अजित पवार यांचे नाव पुलाला द्यावे, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे पुणे विभागीय कार्याध्यक्ष नितीन खटके यांनी केली आहे.



### मानेगाव येथे एकता महिला मंचतर्फे वृक्षारोपण व संगोपनाची शपथ

**वैराग, दि. ५ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आज दिनांक ५ जून रोजी बार्शी तालुक्यातील मानेगाव येथे एकता महिला मंचच्या वतीने अंगणवाडी शाळा परिसर आणि गावातील इतर विविध ठिकाणी उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. केवळ झाडे लावून न थांबता, लावलेल्या सर्व झाडांचे जबाबदारीने संगोपन करण्याचा सामूहिक संकल्प यावेळी उपस्थित महिलांनी केला. या उपक्रमात एकता महिला मंचच्या रेणुका चौघुले, अश्विनी माळी, रजनी घोंगडे, रसिका डाके, अविधा डाके, सुरेखा डाके, मंगल डाके, इंदुमती डाके, लक्ष्मी मोरे, लोचना डाके, समृद्धी डाके, स्वाती वाघमारे, सुरेखा वाघमारे आणि कोमल माळी उपस्थित होते.

# आषाढी वारीत वारकऱ्यांच्या सुविधा आणि स्वच्छतेला प्राधान्य द्या

- भंडीशेगाव येथील सोपानकाका पालखी तळ ३० जूनपर्यंत सुयोग्य करावा
- विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी केली पालखी तळ व मार्गाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. ५ जून-**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै रोजी होणार असून या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पाणी, आरोग्य, सुरक्षा, स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशा सूचना विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, विजया पांगारकर, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी, कार्यकारी अभियंता अमित निमकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा नगर विकास प्रशासन अधिकारी योगेश डोके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



यावेळी विभागीय आयुक्त शितल तेली-उगले म्हणाल्या, पालखी मार्गावरुन पालखी तळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी. पालखी तळावर आवश्यक ठिकाणी मुरूमीकरण, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा, वीज, आरोग्य सुविधा देण्यात याव्यात. नातेपुते येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाच्या वाढीव जागेबाबत तात्काळ कार्यवाही करावी. पालखीतळावरील अतिक्रमणे काढून घ्यावीत. पालखी तळांवर हायमास्ट दिव्यांची संख्या वाढवावी. श्री संत सोपान काका पालखी सोहळ्यासाठी नव्याने उपलब्ध करून देण्यात आलेला भंडीशेगांव येथील पालखी तळावरील जलसंपदा विभागाच्या जुन्या इमारतीबाबत आवश्यक ती कार्यवाही करून ३० जून पर्यंत जुन्या इमारती पाडून त्या ठिकाणी सपाटीकरण व मुरमीकरण करून पालखीतळ स्वच्छ व सुयोग्य करावा, सर्व आवश्यक ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करावी, अशा सूचनाही विभागीय आयुक्त शीतली उगले यांनी दिल्या. तसेच पालखी तळांवर कायमस्वरुपी सुविधा देण्याबाबत पालखीसोहळा प्रमुखांशी चर्चा करुन नियोजन करावे. वारी कालावधीत वैद्यकीय सुविधेबरोबर तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करावी. ६५ एकर येथे प्रशासनाकडून दिंड्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात येते. दिवसेंदिवस दिंड्यांची संख्या वाढत असल्याने जागा अपुरी पडत असेल तर पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. पालखी सोहळ्या बरोबर दिवसेंदिवस दिंड्यांची तसेच वारकरी भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व उपलब्ध असणारे पालखीतळ सद्यस्थितीत कमी पडत असल्याने पालखी तळास वाढीव जागा मिळावी, तसेच जर्मन हँगरची संख्या वाढवावी, अशी मागणी संत ज्ञानेश्वर पालखी सोहळा विश्वस्त योगी निरंजन दास, पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांनी यावेळी केली.

## उमरडमध्ये तरुणांच्या पुढाकाराने स्मशानभूमीची स्वच्छता

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. ५ जून-**

उमरड (ता. करमाळा) येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त राजमाता ग्रुपच्यावतीने स्मशानभूमीची स्वच्छता करण्यात आली. गावातील तरुणांनी एकत्र येत सामाजिक उपक्रम म्हणून स्मशानभूमीची स्वच्छता केली.

तरुणांनी स्मशानभूमी परिसरातील अस्वच्छतेचे साम्राज्य संपुष्टात आणले त्या ठिकाणचे टाकाऊ पदार्थ, गवत, प्लॅस्टिकच्या कचऱ्याची स्वच्छता केली. तसेच स्मशानभूमी परिसरातील



एका मनोरुगणास त्याच्या गावी सोडविण्यात आले.

तरुणांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात करमाळा पंचायत समिती सदस्य अतुल पाटील यांनी तरुणांनी सामाजिक उपक्रम हाती घ्यावेत असा संदेश दिला होता. त्याचे अनुकरण करत गावातील होतकरू तरुणांनी स्मशानभूमी स्वच्छतेची मोहीम हाती घेतली यामध्ये सागर मारकड, विशाल मारकड, पवन मारकड, सागर जाधव, निखिल मारकड, ज्ञानेश्वर कदम, डॉक्टर बंडगर, जनार्धन मारकड, धनंजय मारकड, तुषार मारकड माऊली मारकड, श्रीकांत मारकड, संदिप मारकड, यशराजे पाटील, किसन हरणावळ, आगतराव मारकड, गणेश मारकड, किसन मारकड आदी युवक सहभागी होते.



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त श्री संत दामाजी कारखाना कार्यस्थळावर वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ५ जून -**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर चिंच, अशोक, जांभळ, पेरु, कन्हेरी, बदाम अशा प्रकारच्या ५१ वृक्षांचे रोपण प्र. कार्यकारी संचालक रमेश जायभाय व सर्व खाते प्रमुखांच्या हस्ते करण्यात आले.

वृक्षारोपन प्रसंगी रमेश जायभाय म्हणाले, की कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील, व्हा. चेअरमन तानाजी खरात व संचालक मंडळाने पावसाळ्याच्या सुरुवातीला कारखाना मालकीच्या जमिनीत मोठ्या प्रमणात झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. बदलत्या वातावरणाचा विचार करता मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमासाठी कारखान्याचे चीफ इंजिनिअर श्रीकांत ठोंबरे, चीफ अकौंटंट रमेश गणेशकर, शेती अधिकारी कृष्णात ठवरे, कार्यालय अधिक्षक दगडु फटे, स्टोअरकिपर उत्तम भुसे, लेबर ऑफिसर आप्पा शिनगारे, सुरक्षा अधिकारी लक्ष्मण बेदरे, परचेस ऑफिसर संदिप इंगोले यांच्यासह कारखान्याचे कर्मचारी उपस्थित होते.

### आ. सुभाष देशमुख यांच्या उपस्थितीत रविवारी बैठक

**सोलापूर, दि. ४ जून-**

दक्षिण तालुक्याचे आमदार सुभाष देशमुख हे रविवार, दि. ७ जु रोजी सकाळी १० वाजता आहेरवाडी गावाच्या दौऱ्यावर येणार असून त्यांच्या अध्यक्षतेखाली आहेरवाडी गावात बैठक होणार आहे. सदर बैठकीस गावातील सर्व छोटे-मोठे व्यावसायिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन पंचायत समितीचे सदस्य पंचप्पा धनशेट्टी यांनी केले आहे. यामध्ये टेलर, कपडे दुकानदार, रेडिमेड गारमेंट्स व्यावसायिक, सलून चालक, किराणा दुकानदार, भाजीपाला व फळ विक्रेते, इलेक्ट्रिकल दुकानदार, मोबाईल शॉप चालक, संगणक सेवा केंद्र चालक, वेल्डिग व्यावसायिक, गॅरेज चालक, वाहन दुरुस्ती व्यावसायिक, फोटो स्टुडिओ चालक तसेच गाव पातळीवरील इतर सर्व प्रकारचे व्यावसायिकांनी उपस्थिती राहावे असे आवाहन धनशेट्टी यांनी केले आहे.




## स्विमींग ग्रुपमुळे अक्कलकोटमधील शिक्षण क्षेत्राला भविष्य

### प्रा. प्रकाश सुरवसे; स्विमिंग ग्रुपतर्फे गुणवंतांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ जून-**

दरवर्षी स्विमींग ग्रुपतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराने अक्कलकोटमधील शिक्षण क्षेत्राला उज्वल भविष्य असल्याचे प्रतिपादन प्रा. प्रकाश सुरवसे यांनी केले.

स्विमींग ग्रुपतर्फे १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी सुरवसे बोलत होते.

प्रारंभी स्विमिंग ग्रुपचे संस्थापक व नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन केले. सोहळ्यात कृष्णा सुरवसे- दहावीत ९७ टक्के मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल व मनस्वी इचगे- दहावीत ९५ टक्के गुण, अक्षय स्वामी -दहावीत ७३ टक्के गुण, प्रसाद माने ७३ टक्के गुण, अथर्व काळे बारावी ७३ टक्के, असिम पिरजादे बारावी उत्तीर्ण, समर्थ झिपरे बारावी उत्तीर्ण, चिन्मय शिंपी दहावीत ९५ टक्के , प्रज्ञा ग्राम दहावी ९३ टक्के, सुप्रिया बारटक्के दहावी उत्तीर्ण, प्रतिक इंगळे बारावी उत्तीर्ण, निसर्ग वाघमोडे बारावी उत्तीर्ण, आदर्श वाघमोडे दहावी ९५ टक्के, श्रावणी चव्हाण दहावी ८० टक्के गुण, श्वेता सुरवसे बारावी उत्तीर्ण, शशिकांत पराणे दहावी ८५ टक्के गुण मिळवून यश संपादन केल्याबद्दल स्विमिंग ग्रुप व नगरसेवक महेश इंगळे यांच्या वतीने व मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन सन्मान केला.

यावेळी व्यासपीठावर श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे, संतोष पराणे, प्रा.प्रकाश सुरवसे, प्रा.मनोज शिंपी, प्रा. शिवशरण अचलेर, प्रा. विद्याधर गुरव, प्रा.अशोक कलशेट्टी, प्रा.लक्ष्मण वाघमोडे आदींनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी स्विमींग ग्रुपचे सदस्य ओंकार उटगे, दत्ता कटारे, विश्वनाथ देवरमनी, बाबा सुरवसे, श्रीकांत झिपरे, सुनिल पवार, सुधाकर पाटील, बाळासाहेब एकबोटे, रामलिंगय्या स्वामी, मनोज जगताप, अंकूश केत, श्रीशैल गवंडी, ज्ञानेश्वर भोसले, मेजर अमोल माने, नंदकुमार जगदाळे, जगताप, राजेश जगताप, सागर गोंडाळ, तुषार मोरे, समर्थ स्वामी, रमेश शिंदे, मधुकर सदाफुले, संदीप पंडीत, सागर लोणारी, खाजप्पा झंपले, श्रीकांत मलवे, आदित्य गवंडी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता अल्पोपहाराने झाली. सूत्रसंचालन विश्वनाथ देवरमनी, अशोक कलशेट्टी, जगताप यांनी केले. आभार युवा नेते प्रथमेश इंगळे यांनी मानले.



### वृक्षसंवर्धन करा नाही तर पुढची पिढी माफ करणार नाही : बळीराम साठे

**सोलापूर, दि. ५ जून-**

सततच्या वाढत्या तापमानामुळे जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात येत असून वृक्षसंवर्धन करानाही तर पुढची पिढी माफ करणार नाही, असा इशारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीरामकाका साठे यांनी दिला. वडाळा येथील श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, माऊली महाविद्यालय, माऊली मतिमंद निवासी विद्यालय, जयभारत विद्यार्थी वसतिगृह, माऊली इंग्लिश मेडियम स्कूलच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. काका साठे व संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र साठे यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सिनेट सदस्या प्राचार्या डॉ. वैशाली साठे, प्राचार्य डॉ. शिरीष भोसले, संभाजी गवळी, मुख्याध्यापक संजयकुमार वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्र्म अधिकारी प्रा. डॉ. दत्तात्रय हरवाळकर, शारिरीक शिक्षण संचालक बाळासाहेब वाघचवरे, कार्यालय अधीक्षक राजेंद्र साठे, प्रवीण सुतार, दशरथ दराडे, प्रा.सतीश नागणे, प्रा. डॉ.विकास शिंदे, प्रा. उज्वला शिंदे, प्रा.डॉ. प्रतिभा बिरादार, प्रा. स्मिता फंड, मनोज साठे उपस्थित होते.



### शेळगाव (आर) येथे पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**वैराग, दि. ५ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आज, दिनांक ५ जून २०२६ रोजी बार्शी तालुक्यातील शेळगाव (आर) येथे एकता महिला मंचच्या वतीने गावातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. एकता महिला मंचच्या सदस्यांनी शेळगाव (आर) गावातील मोकळ्या जागा आणि विविध परिसरात पर्यावरणपूरक झाडांची लागवड केली. या उपक्रमात एकता महिला मंचच्या गीतांजली जोशी, रंजना गवळी, मनीषा गवळी, राणी गवळी, संगीता कदम, वैशाली साळुंखे आणि राजेश्री बादगुडे उपस्थित होते.



### कारी येथे वृक्षारोपण व संगोपनाची शपथ

**वैराग, दि. ५ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून बार्शी तालुक्यातील कारी येथील एकता महिला मंचच्या वतीने गावात विविध ठिकाणी उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. या मोहिमेत झाडे लावल्यानंतर सर्व उपस्थित महिलांनी एकत्र येत, 'ही लावलेली झाडे आम्ही स्वतःची मुले समजून जगवू आणि त्यांचे पूर्ण संगोपन करू,' अशी सामूहिक शपथ घेतली. या उपक्रमासाठी एकता महिला मंचच्या प्रमुख कार्यकर्त्या स्वाती जोगदंडकर, सुवर्णा व्हटकर, स्वाती व्हटकर, अंजुम सय्यद, साजिदा सय्यद आणि मनिषा व्हटकर उपस्थित होते.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# शेतीला पूर्ण दाबाने अखंडित वीज द्या; अन्यथा आंदोलन

- आ. नारायण पाटील यांचा महावितरणला इशारा
- ८ जून रोजी मोर्चाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.५ जून-**

करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना पुर्ण दाबाने व अखंडीत वीज देण्याची व्यवस्था करा. वीजेसंदर्भात शेतकऱ्यांनी मागणी केलेले प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवा अन्यथा सोमवार दि. ८ जुन रोजी आपण स्वतः शेतकऱ्यांना बरोबर घेऊन रस्त्यावर उतरुन आंदोलन करणार असल्याचा इशारा आमदार नारायण पाटील यांनी महावितरणला दिला.

वीजेचे प्रश्न प्रलंबित असल्याने आमदार नारायण पाटील यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. सध्या करमाळा तालुक्यातील अनेक गावांना महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या चुकीच्या वीज पुरवठा धोरणांचा फटका बसत आहे. आपण करमाळा मतदारसंघातील वीजेची मागणी व पुरवठा यांचे गणित जुळवण्यासाठी ३३/११ केव्हीए क्षमतेची नवीन सबस्टेशन तसेच ५ एमव्हीए क्षमतेचे नवीन ट्रान्सफार्मर प्राप्त करुन दिले. परंतु तरीही यावरील फिडर आणि लाईनची कामे दिरंगाईने होत आहेत. याचा फटका शेतकऱ्यांना बसत असून पिकांचे नुकसान होत आहे. आमदार कार्यालयाकडून सोमवार दि. ८ जुन रोजी दुपारी १२ वाजता करमाळा येथील तहसिल कार्यालयावर आमदार नारायण पाटील यांच्या नेतृत्वाखाली होणार असलेल्या मोर्चाची तयारी सुरू केली गेली आहे.



## महत्त्वाचे...



### अक्कलकोट आगारातील कर्मचाऱ्यांचा सेवा निवृत्तीबद्दल झाला सत्कार

**अक्कलकोट, दि. ५ जुन-**

अक्कलकोट आगारात ३ वाहतूक नियंत्रक, २ चालक, १ वाहक, १ शिपाई नुकतेच निवृत्त झाले. निवृत्तीनिमित्त त्यांचा आगार व्यवस्थापक खताळ यांच्याहस्ते सत्कार केला. वाहतूक नियंत्रक श्रीमंत खसकी, शिवशरण कलशेट्टी, तोलन बागवान, चालक राजकुमार वाघमारे, सैपन हिप्परगी, वाहक मेजर मणुरे, शिपाई चागले असे ७ जण निवृत्त झाले. यावेळी खताळ यांनी सर्वांना पुढील दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. वाहतूक नियंत्रक श्रीमंत खसकी यांनी एसटी महामंडळामध्ये प्रामाणिक काम केले तर कुठलीच अडचण भासणार नाही. प्रवाशांशी सौजन्याने वागले पाहिजे. २८ वर्षे ८ महिने काम करताना हनगल, घाटगे, रोडगे व चालक, वाहक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनीही मला भरपूर सहकार्य केल्याची कृतज्ञता व्यक्त केली. मदनसिंह घाटगे यांनी आभार मानले.



### खेडभाळवणीमधील महिलांनी घेतली वृक्ष संगोपनाची सामुहिक शपथ

**वैराग, दि. ५ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आज, दि. ५ जून रोजी एकता महिला मंचतर्फे पंढरपूर तालुक्यातील खेडभाळवणी येथे वृक्षारोपण व वृक्ष संगोपनाची सामुहिक शपथ घेण्यात आली. मंचच्या सर्व सदस्यांनी एकत्र येत आपापल्या घरासमोरील मोकळ्या परिसरात वृक्षारोपण केले. केवळ झाडे लावून न थांबता, लावलेल्या प्रत्येक झाडाचे मुलाप्रमाणे संगोपन आणि रक्षण करण्याची सामूहिक शपथही या वेळी महिलांनी घेतली.पर्यावरणाचा बिघडत चाललेला समतोल सावरण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज हा सामाजिक संदेश डोळ्यांसमोर ठेवून एकता महिला मंचच्या खेडभाळवणी शाखेने या उपक्रमाचे आयोजन केले होते. उपक्रमाप्रसंगी एकता महिला मंचच्या प्रियंका दामोदरे, मीनाक्षी साळुंखे, सुरेखा साळुंखे, भामा चंदनशिवे यांच्यासह गावातील इतर महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




### 'सहकारमहर्षि' साखर कारखान्यातर्फे पर्यावरणदिनानिमित्त विविध उपक्रम

**अकलुज, दि. ५ जून -**

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर- अकलूज यांच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आज शुक्रवार दि. ५ जून रोजी शेती विभागीय कार्यालय, लवंग येथे वृक्षारोपण, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (ए.आय.), ऊस शेती चर्चासत्र व सभासद स्मार्ट कार्ड वितरण आदी कार्यक्रम संचालक तथा नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याची वाटचाल प्रगतीपथावर चालू आहे. कार्यक्रमप्रसंगी सयाजीराजे मोहिते-पाटील यांनी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी जनजागृती व्हावी म्हणून वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून दिले. शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कमीत कमी खर्चामध्ये जास्तीत जास्त उत्पादन घ्यावे असे आवाहन केले. कारखान्याने प्रायोगिक तत्त्वावर सभासदांना स्मार्ट कार्डचे वितरण केले असून त्याचे सभासदांना ऊस नोंदणी, बिल तपासणी व योजनांचा लाभ घेण्यासाठी मोठी मदत होणार आहे, असेही सयाजीराजे मोहिते-पाटील म्हणाले.

### पैशाच्या व्यवहारातून तरुणीला मारहाण

**सोलापूर, दि.५ जून-**

पैशाच्या व्यवहारातून एका तरुणीला लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना शुक्रवारी पहाटे २ वाजता होम मैदान परिसरात घडली. अनिता सुनील यादव (वय-३०, रा.जुना एम्प्लॉयमेंट चौक, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणीचे नाव आहे. होम मैदान परिसरातील नॉर्थकोट शाळेच्या पाठीमागील रोडवर नागेश नावाच्या तरुणाने पैशाच्या व्यवहारातून तिला लाथाबुक्क्याने मारहाण केली.त्यात सर्व अंगाला मुकामार लागल्याने ती उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात दाखल झाली.

# समाजकल्याण, दिव्यांग सक्षमीकरणावर भर

## सभापती संस्कृती सातपुते; स्थायी समिती सभेनंतर दिली माहिती

- २७ जूनला माळशिरस ते धर्मपुरी पाहणी दौरा
- आयुष्यमान कार्ड, आदर्श शाळा समाज मंदिर, गुड टच बॅड टच आणि स्वच्छता उपक्रमांना गती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून -**

आगामी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच आरोग्य, शिक्षण, स्वच्छता आणि सामाजिक कल्याणाच्या विविध उपक्रमांना गती देण्याचा निर्धार देऊ. त्याचप्रमाणे समाजकल्याण, दिव्यांग कल्याण यांसह जात प्रमाण वैधता याबाबतचे प्रलंबित प्रश्न एका शिबिराच्या माध्यमातून सोडविणार असल्याची माहिती सभापती संस्कृती सातपुते यांनी दिली.

जिल्हा परिषद स्थायी समितीच्या सभेनंतर प्रसारमाध्यमांशी त्या बोलत होत्या. आषाढी वारी मार्गावरील सुविधा आणि व्यवस्थेचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषदेचे सर्व पदाधिकारी २७ जून रोजी माळशिरस ते धर्मपुरी या मार्गाची संयुक्त पाहणी करणार आहेत. या दौऱ्यात रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा, निवारा व्यवस्था आणि वारकरी सेवेशी संबंधित कामांची तपासणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीत आयुष्यमान भारत योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयुष्यमान कार्ड नोंदणी मोहिमेला वेग देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबविण्यावर भर देण्यात आला.



आदर्श शाळा उभारणीची संकल्पना प्रभावीपणे राबविण्याबरोबरच गावपातळीवर समाजमंदिर निर्मितीस प्राधान्याबाबत चर्चा झाली. ऑगस्ट महिन्यात शाळांमध्ये ''गुड टच- बॅड टच'' विषयावर विशेष कार्यशाळा घेणार आहे. महिला आरोग्याच्या दृष्टीने हिरकणी सॅनिटरी प्रकल्प अधिक प्रभावीपणे राबविणार आहे. आरोग्यदूतांची विशेष बैठक २७ जून रोजी पंढरपूर येथे घेणार असून त्यामध्ये वारीकालीन आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेणार आहे. पर्यावरण संवर्धनासाठी जिल्हाभरात अडीच लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. विविध शासकीय विभाग, ग्रामपंचायती आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून व्यापक वृक्षारोपण मोहीम राबवणार आहे. अकलूज येथील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी जागेची अडचण दूर करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. दिव्यांग कल्याण विभागाच्या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठीही आवश्यक उपाययोजनांवर विचारविनिमयही या सभेत करण्यात आला.

**सभापती काय म्हणाल्या**

- दिव्यांग कल्याण, जात प्रमाणपत्र तसेच प्रशासकीय आणि तांत्रिक अडचणी सोडविण्यावर भर
- विभागाचे काम अधिक प्रभावी आणि गतीने होण्यासाठी पूर्णवेळ समाजकल्याण अधिकाऱ्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा
- अकलूज वसतिगृहासाठी जागेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून लवकरच संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेणार
- वंचित, दिव्यांग आणि गरजू घटकांना योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळण्यासाठी कटिबद्ध

# 'टीम' म्हणून काम केल्यास आषाढी वारी संस्मरणीय

## विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांचा सल्ला

- मागील वारीपेक्षा अधिक चांगल्या सुविधा द्या
- नदीपात्रात दोन ते तीन वॉच टॉवर उभा करावेत
- भाविकांसाठी यंदा ५ हजार ५०० बसचे नियोजन
- रजा घेतल्यास किंवा मोबाईल बंद ठेवल्यास कडक कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जून-**

आषाढी वारी २०२६ यशस्वी व संस्मरणीय करण्यासाठी सर्व शासकीय विभाग प्रमुखांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा. वारकरी, भाविकांना मागील वर्षीच्या वारीपेक्षा यावर्षीच्या वारीत अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी सर्व विभागांनी एक टीम म्हणून काम करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले.



पंढरपूर येथील केपीबी महाविद्यालयाच्या सभागृहात आषाढी वारी २०२६ अनुषंगाने आढावा आयोजित बैठकीत तेली-उगले मार्गदर्शन करत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त पुढे म्हणाल्या की, आषाढी वारी पालखीतळ, विसावा व मुक्कामाची ठिकाणे, पालखी मार्ग ज्या ग्रामपंचायती व नगरपालिकेच्या हद्दीत आहेत त्यांनी पालखी पुढे गेल्यानंतर चार ते पाच तासात त्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवावी. तसेच या ठिकाणी वारकऱ्यांना पिण्याचे उच्च दर्जाचे पाणी मिळाले पाहिजे. तसेच या ठिकाणी कायमस्वरूपी व तात्पुरती शौचालये दिवसातून किमान तीन ते चार वेळेस स्वच्छ केली पाहिजे. यासाठी पुरेसे मनुष्यबाण संबंधित यंत्रणांनी ठेवले पाहिजे. या ठिकाणी प्रकाशव्यवस्था, अग्नि प्रतिबंधक व्यवस्था, आरोग्य पथके आदी ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी गटविकास अधिकारी अमोल जाधव, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे तर मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी वारीच्या अनुषंगाने केलेल्या नियोजनाची माहिती सादर केली.

**यंदा सीसीटीव्हीच्या माध्यमातून हेड काऊंटिंग**

जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी आषाढी वारीच्या अनुषंगाने प्रशासनाने केलेल्या कामाची माहिती दिली. यावर्षी सीसीटीव्हीच्या माध्यमातून हेड काउंटिंग करण्यात येणार आहे. तसेच मल्टी ड्रोन वापर करून सुरक्षा यंत्रणा तसेच हेड काउंटिंगही करण्यात येणार असल्याचे सांगितले. अन्न व औषध प्रशासनातर्फे दहा दिवस अगोदर तपासणी मोहीम राबवणार आहे. अन्न व धान्याचे तसेच प्रसादाचे नमुने घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### दहिटणे येथे एकता महिला मंचच्या वतीने वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ५ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आज, दि. ५ जून रोजी, बार्शी तालुक्यातील दहिटणे येथे एकता महिला मंचच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मंचच्या सदस्यांनी घरासमोरील मोकळ्या जागेत वृक्षारोपण केले.

वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी वृक्षलागवड व जतन काळाची गरज असल्याची भावना महिलांनी व्यक्त केली.

याप्रसंगी एकता महिला मंचच्या प्रमुख सदस्या लक्ष्मी सुतार, आरती कोळी, विश्रांता शेळके यांच्यासह गावातील इतर महिला व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपक्रमाचे दहिटणे गावासह परिसरातून कौतुक होत आहे.

### झरेगाव येथे एकता महिला मंचच्या वतीने वृक्षारोपण; सामूहिक शपथ

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि. ५ जून -**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आज ५ जून रोजी बार्शी तालुक्यातील झरेगाव येथे एकता महिला मंचच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले होते. केवळ झाडे न लावता ती जिवंत ठेवून त्यांचे योग्य संगोपन करण्याचा निर्धार महिलांनी केला. सदस्यांनी आपापल्या घरासमोर वृक्षांची लागवड केली. तसेच झाडांचे संगोपन करण्याची सामूहिक शपथ घेतली. उपक्रमात एकता महिला मंचच्या शितल संकपाळ, लक्ष्मी संकपाळ, अश्विनी कडपे, जयश्री संकपाळ, मंगल पोटभरे यांच्यासह गावातील इतर सदस्या व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मालवंडी येथे ७० हजार रुपयांचा गुटखा जप्त

**एकास अटक; बार्शी, करमाळा निर्भया पथकाची संयुक्त कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ५ जून -**

बार्शी आणि करमाळा निर्भया पथकाने संयुक्त कारवाई करत मालवंडी (ता. बार्शी) येथे ७० हजार १३० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेतले असून बार्शी तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



अंजना कृष्णा सहाय्यक पोलीस अधीक्षक यांना गोपनीय बातमीदारामार्फत मालवंडी गावच्या हद्दीत एका घरात मोठ्या प्रमाणावर गुटख्याचा बेकायदेशीर साठा लपवून ठेवल्याची खबर मिळाली. माहिती मिळताच त्यांच्या आदेशाने करमाळा व बार्शी निर्भया पथकाने दि. ४ जून रोजी दुपारी मालवंडी येथील संबंधित घर आणि गोदामावर अचानक छापा टाकला. छाप्यात वेगवेगळ्या कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू आणि पानमसाला असा एकूण ७०,१३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी मुद्देमालासह आरोपीला ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात आणले. मेहबूब जवाहर आतार (वय ३४, रा. मालवंडी, ता. बार्शी, असे आरोपीचे नाव आहे. उत्कर्षा एखंडे (वय २९ सरकारी नोकरी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

प्रकरणाचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब घाडगे करत आहेत. ही कारवाई निर्भया पथक, करमाळातील पोहेकॉ. मंगेश पवार, पोकॉ. संभाजी पवार, पोकॉ. गणेश गुटाळ आणि पोकॉ. विद्या इंगोले तसेच निर्भया पथक, बार्शीतील पोहेकॉ. बाबासाहेब घाडगे, पोकॉ. हनुमंत पाडुळे आणि चालक पोकॉ. भाऊसाहेब महानोर यांनी केली.

# 'त्या' चोरी प्रकरणातील अर्धा किलो सोने हस्तगत

## चोरटे बारलोणी, कव्हे, वडशिंगेचे तर घेणारा कुर्डुवाडीचा प्रसिद्ध सोने व्यापारी

- लोहमार्ग पोलिसांची यशस्वी कारवाई
- रेल्वेतील पाच कोटीचे सोने चोरी प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. ५ जून**

गतवर्षी ६ ते ७ डिसेंबरदरम्यान सोलापूर ते कल्याण रेल्वे स्टेशनपर्यंत प्रवास करणाऱ्या एका सोने व्यापाऱ्याची बॅग चोरीला गेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी लोहमार्ग पोलिसांनी आरोपीकडून अर्धा किलो सोने हस्तगत केले आहे.

सदर चोरीबाबत सोने व्यापाऱ्याकडून कल्याण रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर सीसीटीव्हीच्या आधारे तब्बल १० चोरांचा शोध घेतला. यात माढा तालुक्यातील बारलोणी, कव्हे, वडशिंगे या गावातील व परिसरातील काही चोरट्यांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले. लोहमार्गच्या पोलीस पथकाने सहा महिन्यांपासून वारंवार छापेमारी करत चार आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून नुकतेच सोमवारी व मंगळवारी तपासादरम्यान कुर्डुवाडी शहरातील एका नामांकित सोने व्यापाऱ्याला दिलेले ५४८ ग्रॅम म्हणजे अर्धा किलो ४८ ग्रॅमचे दागिने परत मिळवण्यात पोलिसांना यश आले आहे. याबरोबरच मुंबई येथून ३०० ग्रॅम, सोलापूर येथून २५० ग्रॅम असे एकूण १ किलो १०० ग्रॅम सोने पोलिसांनी चोरट्यांकडून जप्त केले आहे.

फिर्यादी हे सिद्धेश्वर एक्सप्रेसच्या गाडीमधून झोपून प्रवास करीत असताना ही घटना घडली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर मुंबई लोहमार्गचे पोलिस आयुक्त एम.के.राकेश कलासागर, पोलिस उपायुक्त प्रज्ञा येडगे यांच्या आदेशान्वये वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक चिमणाजी केंद्रे यांच्या विशेष पथकाने चोरट्यांच्या गावामध्ये वेळोवेळी छापे मारले. त्यातून रमेश बाळू डिकोळे, फुलचंद उर्फ परमेश्वर उर्फ सरपंच छगन गुंजाळ, धनराज उर्फ धनंजय उर्फ धन्या साहेबराव गुंजाळ व पुणेकर उर्फ शिवण्या सिताराम डेकोरे या चार आरोपींना पकडले. आरोपींची वेळोवेळी न्यायालयाकडून पोलिस कोठडी निर्माण मंजूर करून सुमारे १ किलो १०० ग्रॅम सोने हस्तगत केले आहे. यातील अर्धा किलो ४८ ग्रॅम सोने हे कुर्डूवाडी शहरातील नामांकित सोने व्यापाराच्या दुकानातून पोलिसांनी जप्त केले आहे. तपासादरम्यान तो नामांकित व्यापारीही गायब असल्याचे पोलिसांना दिसून आले. त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून कुर्डूवाडी शहर व सराफ कट्ट्यांमध्ये पोलिस कारवाईबाबत चर्चा आहे.

**सर्व आरोपी माढा तालुक्यातील**

संबंधित घटनेतील सर्व आरोपी माढा तालुक्याच्या विविध गावातील आहेत. यातील चार आरोपींना ताब्यात घेतले आहे. दिलीप साहेबराव गुंजाळ, हिरा उर्फ दीपक शंकर गुंजाळ, सुरेश उर्फ लाल्या शंकर गुंजाळ, सागर गोपाल डिकोळे, विकास शेषेराव उर्फ शशिकांत डिकोळे व भारत रामा काळे या सहा आरोपींचाही तपास सुरु आहे.